नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.
   वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथें वाग्यज्ञे तोषावें
महाराष्ट्र साहित्य परिषद




अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाचाचे तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३३० / जुलै ते सप्टेंबर २००९



ग्रामीण साहित्यिक
कै. ग.ल. ठोकळ
(जन्मशताब्दी)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आज ही लखपती आर डी योजना में
निवेश करके आप अनजाने ही लखपती बन सकते हैं ।

कुछ विशेष अवसर होते हैं, जिनके लिए विशेष निवेश की आवश्यकता होती है ।

● बेटी का विवाह ● निवेश ● बच्चों की शिक्षा ● सेवानिवृत्ति हेतु



जमा अवधि	मासिक किस्त	परिपक्वता मूल्य
१ वर्ष	8,025	1,00,009
२ वर्ष	3,875	1,00,314
३ वर्ष	2,500	1,00,738
४ वर्ष	1,800	1,00,396
५ वर्ष	1,375	1,00,224
६ वर्ष	1,100	1,00,109
७ वर्ष	925	1,02,235
८ वर्ष	775	1,03,065
९ वर्ष	650	1,01,471
१० वर्ष	575	1,04,119

*०४/०९/२००९ को यथाविद्यमान ब्याज दरों के अनुसार

अब आप प्रतिमाह रु. 550/- के निवेश से वर्ष 20019* में रु. 1,00,989/- प्राप्त कर सकते हैं।

स्त्रोत पर कर कटौती (TDS) की भी चिंत नहीं ।

बेहतर कल के लिए बचत करें !

अपनी निकटस्थ शाखा से संपर्क करें या कॉल करें :

पुणे-सारस बाग : 020-24444921 एवं 24444922

या टोल फ्री नंबर : 1800 425 3555 में कॉल करें ।

www.corpbank.in शर्तें लागू

*अवधि निवेश राशि पर निर्भर

कार्पोरेशन बैंक Corporation Bank

सार्वजनिक क्षेत्र का अग्रणी बैंक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

□ अंक क्र. ३३० : जुलै ते सप्टेंबर २००९

• • •

संपादक :

डॉ. सु. प्र. कुलकर्णी

• • •

सल्लागार मंडळ :

ह. ल. निपुणगे   रत्नाकर कुलकर्णी   डॉ. अ. वा. संगमनेरकर

• • •

संपादन समिती :

डॉ. किसन पाटील   मधु नेने   प्रा. अरुण मैड

पद्माकर कुलकर्णी   प्रा. रा. भ. शिंदे   प्रा. मिलिंद जोशी   स्वाती महाळंक

• • •

प्रकाशक :

डॉ. माधवी वैद्य

प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद

टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०

दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

येथे वाग्यज्ञे तोषावे

महाराष्ट्र साहित्य परिषद

अनुक्रमणिका

मुद्रक-प्रकाशक
डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.

अक्षरजुळणी
मेघा ग्राफिक सर्व्हिसेस,
स.नं. १४/२३/४, घर नं. १५९८,
मोती बेकरीमागे, धायरी, पुणे - ४११ ०४१

मुद्रणस्थळ
जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०४१

किंमत १५/- रुपये

प्रकाशन : सप्टेंबर, २००९

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादन-समिती, सल्लागार मंडळ अथवा प्रकाशक सहमत असतीलच, असे नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

संपादकीय

'गांव–गाडा', ग्रामीण साहित्य आणि कै. ग. ल. ठोकळ

डॉ. सु. प्र. कुलकर्णी

सुमारे ९४-९५ वर्षांपूर्वी 'त्रिंबक नारायण आत्रे' ह्या बीएएलएल्बी झालेल्या सनदी अधिकाऱ्याने अव्वल इंग्रजी दर्जाच्या काळात, शेतकरी आणि शेतमजूर यांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामसमाजजीवन आणि ग्रामसमस्यांचे परखड परीक्षण करणारा 'गांव-गाडा' हा ग्रंथ लिहिला. त्रिं. ना. आत्रे मामलेदार, सवजज्ज आणि दुष्काळविषयक अधिकारी (famine officer) म्हणून महाराष्ट्राच्या अंतरंगात राहिले. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, कर्जत, जामखेडच्या ग्रामजीवनात मामलेदार म्हणून राहिले. खानदेशात अमळनेर, नंदुरबार, चोपडा, यावल इ. ठिकाणी न्यायाधीश ह्या नात्याने राहिले. महाराष्ट्रातील दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या कालखंडात 'दुष्काळविषयक अधिकारी' म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्राच्या ग्रामसमाजजीवनाचे निरीक्षण करताना त्यांनी शेतकऱ्याच्या होणाऱ्या नागवणुकीचे भेदक चित्र उभे केले आहे. ग्रामसमाजरचनेत कुणबी एकीकडे आणि दुसरीकडे त्याच्यावर अवलंबून असणारे बिगरशेतकरी (कारू-नारू, अलवते-गलवते (आलुते-बलुते), दुकानदार, फिरस्ते तसेच 'हक्क-मोहबत-भीक मागणारेही) या वर्गात होते. ह्या रचनेत एकमेव उत्पादक, शेतकरी (कुणबी) हाच होता. कुणब्याला ग्रामसमाजातील सुमारे १० टक्के लोकांना फुकट पोसावे लागत असे. निरर्थक जातिधर्म आणि वतनपद्धती यांनी पोखरलेले ग्रामजीवन- भोंगळ, दरिद्री, दुवळे, परस्परांच्या वैरभावनेत स्वत्वहीन झाले होते. वैश्यवृत्तीचा संपूर्ण अभाव होता; आणि कुणब्याच्या मागे सावकारी थेट स्मशानापर्यंत साथ देई. अशी कुणब्याची सर्व बाजूंनी होणारी कुतरओढ करणारी- ग्रामसंस्कृती होती. ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीला महाराष्ट्राचे अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनी १९५९ साली लिहिलेल्या प्रस्तावनेतील वर नमूद केलेली निरीक्षणे आजही अंतर्मुख करायला लावणारी आहेत. अशा हालाखीच्या अवस्थेतही खेड्यातील लोकांचा मूलभूत साधेपणा व चांगुलपणा, त्यांचे 'निरक्षर शहाणपण' याचेही दर्शन 'आत्रे' यांनी सहृदयतेने दिले आहे. हीच ग्रामीण साहित्याची सामुग्री आहे. तिची बदलती रूपे दुर्दम्य जीवननिष्ठेचे दर्शन घडवितात.

ग. ल. ठोकळांची 'टेंभा' (१९८२) ही त्याच दुर्दम्य जीवननिष्ठेचे वास्तव प्रतीक आहे. ग्रामजीवनाचे भेदक चित्र 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये म. फुले यांनी अधिक कडव्या शब्दात जनतेसमोर उभे केले; आणि 'एका शिक्षणाअभावी' हे घडले असे- रोगनिदानही केले; ते सर्वज्ञात आहे. 'सुधारणेच्या सर्व योजना शहरात सुरकांड्या मारतात व खेड्याच्या गावकुसाबाहेर थबकतात, पण वेशीच्या आत म्हणून फडकत नाहीत;' हे 'आत्रे' यांचे पहिल्या आवृत्तीच्या 'वंदन' ह्या प्रस्तावनेतील उद्‌गार सार्थ आहेत. म. फुल्यांनी शिक्षणाचे महत्त्व पोटतिडकीने सांगितले, शाहू राजांनी तालुक्याच्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे सुरू केली. रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून शिक्षणाची चळवळ उभी केली. खेडे व घर सोडून तालुक्याच्या आणि शहराच्या ठिकाणी ग्रामीण भागातील विद्यार्थी आपले बुजरेपण घेऊन उच्च शिक्षणासाठी धडपडू लागले. अनेक जाणते तरुण ग्रामीण भागात शिक्षणाचा 'टेंभा' घेऊन कार्यरत झाले. त्याचे हृद्य कालचित्रण कै. ग. ल. ठोकळांच्या 'टेंभा' कादंबरीत आहे.

'टेंभा' ही कै. ठोकळांची तीन पिढ्यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. सखाराम, लक्ष्मण आणि गजानन ह्या त्या तीन पिढ्या आपल्या काळातील वादळवाटांवरून जीवनाला कवेत घेण्यासाठी झुंज देतात. सखाराम ठोकळ हे प्रस्तुत कादंबरीकाराचे आजोबा. पुंजाबा पाटलांच्या शेतावर सालकरी म्हणून आपल्या मर्यादेत वारकऱ्याच्या साधेपणाने समाधानी जीवन जगणारे भूमीहीन शेतकरी. मालकाची मर्जी फिरली की, त्या भूमीवर जडलेला जीव काढून घ्यायचा आणि दुसरा मालक शोधायचा ! सखारामाचे शेत गेले आणि बिऱ्हाड आवरून गर्भारबायकोसह कामरगाव-चास-नगरची धर्मशाळा असे मजल-दरमजल करीत असता वडुल्याच्या विठ्ठल मंदिरात सारजा बाळंत झाली. तेथेच-तुळशीराम पाटलाच्या आश्रयाने संसार थाटला.

मुलाला- लक्ष्मणला- शिकवायचेच या जिद्दीने त्याचे नगरला 'ट्रेनिंग' पूर्ण केले. त्यातच नगरशी सोयरीक घडली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

सूनही शिक्षिकाच. भूमीहीन शेतमजुराचा मुलगा आणि सून शिकून शिक्षणक्षेत्रातच काम करू लागले. त्याबरोबरच शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या- संगमेर येथील विद्यार्थी-वसतीगृहाच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले. या काळात, सत्यशोधक तमाशांनीही मने घडली जात होती.शैक्षणिक चळवळीने काळ भारला गेला होता. पुढे ग्रंथनिर्मिती व्यवसायात तिसरी पिढी स्थिरावली. लेखन-वाचन-भांडार, ठोकळ भवनने सरस्वतीच्या दरबारात मानाचे स्थान मिळविले. ह्या आत्मचरित्रात्मक कादंबरीत तीन पिढ्यांचे कालचरित्र आहे. ग्रामसंस्कृतीचे विविध घटक कथानकात गुंफले गेले आहेत. खेड्यातल्या आणि वावरातल्या सकाळ-दुपार-संध्याकाळची दृश्ये आहेत. यल्लम्मा जोगतीण, पोतराज, वासुदेव, माकडवाला, शाळा, शिक्षक, सूक्ष्मजातीयवाद, अस्मानी आणि सुलतानी ग्रामीण बेरकेपणा आणि भाबडेपणा इ. सगळे घटक कादंबरीच्या कथानकाला हातभार लावतात. शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, फुले-आंबेडकर-माटे मास्तर-आगरकर यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्यात मशाल म्हणून नव्हे; तर ग्रामीण जीवनात शिक्षणाचा प्रकाश देणारा 'टेंभा' म्हणून तरी आपल्या आजोबा आणि आईवडिलाकडे श्रेय जाते. त्यांनी दिलेला संघर्ष, हा कुटुंबासाठी प्रकाश आहे. 'टेंभा' ही कादंबरी १९२० ते १९६० च्या कालखंडातील ग्रामसंस्कृतीचे कालचरित्र आहे.

'टेंभा' पूर्वीची ''गावगुंड'' (१९४६) आणि 'ठिणगी' (१९६२) ह्या दोन कादंबऱ्या भिन्न प्रकृतीच्या आहेत. त्यापैकी 'गावगुंड' ला अफाट लोकप्रियता लाभली. कुशाबा चव्हाणची दोन मुले- गुणाजी आणि जयाजी. नाना पाटील यांच्या पत्री सरकारच्या चळवळीने भारला गेलेला गुणाजी दरोडेखोरीच्या वाटेने सामाजिक न्याय शोधू पाहतो; तर जयाजी शेतकी कॉलेजात शिक्षणाची कास धरतो. कायदा हातात घेणाऱ्या गुणाजीच्या वाटेने घरावर-संपूर्ण कुटुंबावर फौजदारी जुलमाचा वरवंटा फिरतोः त्यानंतर हे कथानक एका भीषण सूडकथेची 'फिल्मी' वाटचाल करते. ह्या कादंबरीच्या नऊ आवृत्त्या निघाल्या- इतकी ती लोकप्रिय झाली. 'ठिणगी' (१९६२) चे कथानक लहरी संस्थानिकाच्या 'पार्श्वभूमीवरचे आहे. महाराजांचा 'हुजऱ्या' आपल्या बुद्धिकौशल्याने 'प्याद्याचा फर्जी' कसा होतो त्याचे हे कथानक दिवाळी अंकासाठी लिहिलेले आहे. 'फ्लॅश-बॅक' तंत्रपद्धतीचा येथे वापर केला आहे. ह्या तीन कादंबऱ्यात 'टेंभा' ही खऱ्या अर्थाने ग्रामजीवनाचा आणि ग्रामसंस्कृतीचा आविष्कार आहे. कै. ग. ल. ठोकळ-जन्मशताब्दीच्या निमित्ताने ह्या अंकात त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणे आणि त्यानिमित्ताने ग्रामीण साहित्याचे बदलते रूप अभ्यासणे हा या अंकाचा उद्देश आहे.

ह्या अंकात

ग. ल. ठोकळांच्या बहुआयामी साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा आढावा त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने, म. सा. परिषदेने व्याख्यानमाला आयोजित करून घेतला. त्या व्याख्यानांच्या ध्वनिफितीवरून डॉ. आनंद यादव, श्री.ह.ल. निपुणगे यांचे लेख ह्या अंकात समाविष्ट केले आहेत. श्री. ह. मो. मराठे यांचा लेख काही तांत्रिक कारणामुळे घेता आला नाही.

कै. ग. ल. ठोकळ यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ग्रामीण साहित्यातील स्थित्यंतराची रूपे अभ्यासकांनी टिपली आहेत. डॉ. प्रतिमा इंगोले यांनी बदलत्या ग्रामवास्तवातील 'स्त्री' उभी केली आहे, तर डॉ. वासुदेव मुलाटे यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाने आणि ग्रामजीवनातील आधुनिकीकरणाने महाराष्ट्राच्या ग्रामसंस्कृतीतील अनेकांगी बदल, 'साठोत्तरी ग्रामीण कथा' ह्या त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखातून, वाचकाभिमुख केले आहेत. ग्रामवास्तव हे ग्रामीण बोलीतूनच व्यक्त होते; बोलीचा आविष्कार हा ग्रामीण साहित्याचा आत्मा आहे. हे कितीही खरे असले तरी 'ग्रामीणता' हे एक केवळ स्थितीशील वास्तव नसून बदलत्या काळाबरोबर येणारी परिवर्तने हे त्यातील गतिमान वास्तव आहे. प्रमाणभाषेतूनही ग्रामीण शब्दकळा आपले विलोभनीय रूप दाखविते हे प्राचार्य पंडितराव पवार यांच्या 'कवी अनिलांची जानपद कविता' ह्या लेखाने सिद्ध केले आहे. ग्रामीणत्वाशी निगडित जिचे 'सत्त्व' आहे, त्या बहिणाबाईंच्या कवितेवरील सदाहरित प्रतिक्रियांचा परामर्श घेणारा एक अंश म्हणून पाठविला आहे. त्याचा रेशीमस्पर्श ह्या चर्चेला झाला आहे.

''स्वाईन फ्ल्यू''च्या वातावरणामुळे अनेक प्रकारे विलंब होत गेला; त्यामुळे संदर्भ आणि लेख घेता आले नाहीत; त्याबद्दल दिलगीर आहे. असे असले तरी, ग्रामसंस्कृतीवर आधारित ह्या विशेषांकाचे, रसिकांकडून स्वागत होईल अशी अपेक्षा आहे.

(संपादक)

दि. ०९ सप्टेंबर २००९

७ गायकवाड वसाहत, सावेडी मार्ग, अहमदनगर. संपर्क : ०२४१-२४२९७५५

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठी साहित्यातील ग्रामजीवनाचा ललित आविष्कार : कै. ग. ल. ठोकळ

प्राचार्य राम शिंदे

[मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध जानपद कवी, कादंबरीकार, लघुकथालेखक आणि ख्यातनाम प्रकाशक, कै. ग. ल. ठोकळ यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे मराठी साहित्यसृष्टीत पदार्पण कसे झाले; आणि ग्रामजीवनाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती रसिकमान्य कशी झाली. याचे सिंहावलोकन करणारा हा लेख आहे.

-संपादक]

१९३० साल असावे. अहमदनगर व नाशिक असे जोडजिल्ह्याचे पहिले साहित्य संमेलन नगरच्या सोसायटी हायस्कूलच्या मोठ्या हॉलमध्ये भरले होते. नाशिकचे संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक ह.भ.प. ल. रा. पांगारकर हे संमेलनाचे अध्यक्ष होते. रात्री काव्यगायनाचा कार्यक्रम होता. अनेक ज्येष्ठ आणि नवोदित कवी उपस्थित होते. संगमनेरच्या पेटिट हायस्कूलचे शिक्षक आणि कवी काव्यसंमेलनाचे संयोजक होते. ठराविक स्वरूपाच्या काव्यवाचनामुळे कार्यक्रमात कंटाळवाणेपणा जाणवू लागला होता. संयोजकांनी एका कवीचे नाव पुकारले. एक पोरसवदा कवी व्यासपीठावर जाऊन बसला. श्रोत्यांमध्ये हास्याची खसखस पिकली. कारण हा कवी रंगाने काळासावळा आणि शरीराने चांगलाच गुबगुबीत आणि गोल गरगरीत होता. सभा संमेलनात सहभागी होण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग आणि अनुभव असल्यामुळे तो काहीसा बुजरा झाला होता.



काहीशा धडधडत्या काळजाने त्याने आपल्या कवितेची वही उघडली. आपण 'भिकारीण' ही कविता सादर करणार असल्याचे सांगितले. 'मज दीनेची कीव येऊ द्या काही, घाला हो भिक्षा माई !' ही कवितेची पहिली ओळ त्याने म्हटली अथवा वाचली नव्हे तर साभिनय गायली. सर्व सभा शांत झाली. त्याला धीर आला. देहभान विसरून त्याने ही करुणमय कविता गाऊन त्या दीनदुबळ्या गरीब भिकारणीचे चित्र श्रोत्यांपुढे साकार केले. श्रोत्यांसह स्वतः पांगारकर यांना अक्षरशः गहिवरून आले. सर्वांचे डोळे पाणावले होते. कविता संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला. पांगारकर उठून उभे राहिले आणि डोळे पुशीत म्हणाले, "मी या गुणी कवीला पाच रुपयांचे बक्षिस जाहीर करतो.' श्रोतृवर्गाने टाळ्यांचा कडकडाट करून आपल्या समाधानाची पावती दिली. प्रत्येक कवीने आपली एकेकच कविता म्हणावयाची अशी अट असूनही 'आणखी एक कविता म्हणा' असा श्रोत्यांनी एकच गिल्ला केला. 'तुझ्या मनांत असेपर्यंत काव्य गा', असा पांगारकरांनी आग्रह केला. या पार्श्वभूमीवर एक नव्हे, दोन नव्हे, चार कविता गाऊन हा कवी टाळ्यांच्या कडकडाटात व्यासपीठावरून खाली उतरला. आपल्या साहित्याच्या संदर्भातील पहिल्याच पदार्पणात 'तो आला, त्याने पाहिले आणि त्याने जिंकले' असे सर्वार्थाने म्हणता येईल. पुढे जानपद आणि ग्रामीण साहित्याचा प्रणेता, प्रवक्ता आणि पुरस्कर्ता म्हणून ज्याने मराठी साहित्य शारदेच्या दरबारात आपली नाममुद्रा अमर आणि अक्षर करून ठेवली त्या मुलाचे आणि कवीचें नाव होते- ग. ल. ठोकळ !

यानंतर ठोकळांनी मागे वळून पाहिलेच नाही. याच सुमारास कोल्हापूर येथील अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनात कविवर्य तांबे, ना. घ. देशपांडे, सोपानदेव चौधरी, संजीवनी मराठे प्रभृति ज्येष्ठ आणि नवोदित कवींच्या बरोबरीने ठोकळ यांनीही आपली हजेरी लावली. या संमेलनात कविवर्य तांबे यांचे 'डोळे हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

जुलमी गडे', विदर्भ कवी ना. घ. देशपांडे यांची 'रानारानात गेली बाई शीळ' या गाजलेल्या कवितांबरोबरच ठोकळांची 'रूतला ग सखे, पायाला दुर्भांकुर' ही दुष्यंत आणि शकुंतला यांच्यातील मुग्ध शृंगारभाव व्यक्त करणारी प्रणयमधुर 'रोमँटिक' कविता रसिकांची दाद मिळवून गेली. महाराष्ट्राचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक वा. म.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मडगांव (गोवा) येथील साहित्य संमेलनाच्या अंतर्गत भरलेल्या कवीसंमेलनात 'गरीबाचा पाहुणचार', 'लक्ष्मी', 'गरीबीचा संसार', 'मोटेवरलं गाणं', 'जात्यावरलं गाणं', 'घरधनी' विशेषतः १४ ओळींच्या 'सुनीत' या काव्य प्रकाराची सुनीत हा भाऊ तर ६ ओळींची 'सुनीता' बहिण म्हणून नर्मविनोदी, खट्याळपणा आणि कल्पनारम्यतेने नटलेल्या या सुनीतांच्या रंगदार आणि ढंगदार शैलीत केलेल्या साभिनय काव्यगायनाने हे संमेलनही त्यांनी दणाणून सोडले होते. विनोदाचार्य श्री. कृ. कोल्हटकर यांनी ठोकळांच्या या नर्मविनोदी काव्यगायनावर खूष होऊन त्यांच्या पाठीवरून शाबासकीचा हात फिरविला होता, हे लक्षणीय आहे.

कवितेच्या या विलक्षण वेडामुळे म्हणा, अथवा नादामुळे म्हणा, शिक्षकी पेशातील कडक शिस्तीच्या आपल्या वडिलांच्या नाराजीतून आणि रागातून पदोपदी बोलणी आणि मार खावा लागून आपल्या पाठीचे अक्षरशः धिरडे झाल्याचा, बी.ए. ही ४ वर्षांची पदवी परीक्षा प्राप्त करण्यासाठी तब्बल ९ वर्षांचा कालावधी लागल्याचा आणि त्यासाठी पुणे, बडोदा, नाशिक, कोल्हापूर अशी पायपीट आणि भटकंती करावी लागल्याचा उल्लेख आणि किस्सा ठोकळ रंगवून सांगत असत. तरी या कवितेच्या वेडापायीच ऐन पंचविशीत 'सुगी' हा मराठीतला पहिला प्रातिनिधिक जानपद कवितासंग्रह आणि ऐन तिशीत 'मीठभाकर' हा अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारा आणि ग्रामीण कवितेला मराठी वाङ्मयात स्वतंत्रपणे आणि समर्थपणे प्रस्थापित करून तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा पहिला ग्रामीण काव्यसंग्रह सिद्ध झाला, ही वस्तुस्थिती आहे. 'सुगी'च्या प्रथमावृत्तीला ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक वि. स. खांडेकर यांची 'वानगी' ही मार्मिक प्रस्तावना आहे. तिच्या ४थ्या आवृत्तीच्या निमित्ताने साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा आणि ज्येष्ठ कवयित्री श्रीमती शांता शेळके यांनी आपले मनोगत व्यक्त करणारी प्रस्तावना लिहिली आहे. 'मीठभाकर' या काव्यसंग्रहाची तर सातवी आवृत्ती सिद्ध झाली असून ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक श्री. आनंद यादव यांची 'मराठी ग्रामीण कविता आणि ठोकळ' अशी प्रदीर्घ प्रस्तावना तिला लाभली आहे.

जी गोष्ट काव्यनिर्मितीची तीच गोष्ट ठोकळांच्या इतर गद्य साहित्यलेखनाची. 'मीठभाकर' या काव्यरचनेची उंची यापुढे आपण गाठू शकत नाही, म्हणून ठोकळांनी आपली लेखणी गद्यनिर्मितीकडे वळवली. सातार्‍याकडील ग्रामीण जीवनावर आधारीत 'गावगुंड', इंदूर-माळव्याच्या संस्थानिक जीवनावर 'ठिणगी' आणि आपली जन्मभूमी तसेच तरुणपणाच्या बहुसंख्य काव्यनिर्मितीचा प्रेरणास्रोत ठरलेल्या अहमदनगर जिल्ह्याचे प्रादेशिक वातावरण आणि जनजीवन चित्रित करणारी काहीशी चरित्रात्मक आणि आत्मवृत्तात्मक अशी 'टेंभा' ही कादंबरी. तर 'कडूसाखर', 'सुगंध', 'मोत्याचा चारा', 'पहिले चुंबन', 'क्षितिजाच्या पलिकडे', 'मत्स्यकन्या' आणि ठोकळ गोष्टीचे पांच भाग अशी संख्येने कमी पण गुणवत्तेने रसिकमान्य अशी 'ठोकळमाना'ने त्यांची ग्रंथसंपदा आहे. केवळ एक प्रयोग म्हणून ठोकळ आपल्याच कादंबरीवरील 'गावगुंड' आणि 'कशासाठी पोटासाठी' या नाट्यनिर्मितीच्या धंद्यात पडले आणि त्यात सपशेल आपटीही खाल्ली. पण त्यांच्या इतर गद्यलेखनाच्या तीन ते आठ आवृत्त्या संपन्न झाल्या आहेत. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातीलच नव्हे तर कर्नाटक, उज्जैन इत्यादी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या 'सुगी', 'मीठभाकर', 'गावगुंड' आणि 'ठोकळ गोष्टींचा' वेळोवेळी समावेश झाला आहे.

विशेष म्हणजे जो अहमदनगर जिल्हा ठोकळांच्या पूर्वजांची आणि आईवडिलांची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणून होता. त्याच भूप्रदेशात आपल्या बहुविध साहित्य निर्मितीने, व्यक्तिमत्त्वाने आणि कर्तृत्वाने भूषण ठरलेल्या ठोकळांचा जन्म, बालपण, शालेय शिक्षण आणि विशेष म्हणजे काव्यनिर्मिती घडली; त्याच नगर जिल्ह्यात आणि अहमदनगर येथे ७०वे अखिल भारतीय

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

मराठी साहित्य संमेलन आयोजित झाले, हा एक सुयोग होता, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. किंवहुना ठोकळ हयात असते तर 'आज माझी मायवोली आली नगरच्या माहेराला' या शब्दात त्यांनी आपला आनंद आणि रास्त अभिमान व्यक्त केला असता, असे प्रकर्षाने वाटते.

ग्रामीण साहित्याचा पुरस्कर्ता आणि प्रपितामह थॉमस हार्डी हा ठोकळांचा साहित्य लेखनातील आदर्श आणि स्फूर्तीस्थान. हार्डीने आपल्या कथा-कादंबऱ्यातून त्याचा जन्म भूप्रदेश वॅसेक्स परगाना अशा काही जिवंतपणे आणि समरसतेने शब्दवद्ध केला आहे की; तो ग्रामीण साहित्याचा आद्य प्रणेता आणि प्रवक्ता समजला जातो. ठोकळांनीही नगर जिल्ह्यातील पुणतांवे, अकोले, नेवासे, बेलापूर, घोडनदी, संगमनेर आणि अहमदनगर येथील वास्तव्यावर 'मीठभाकरीतील' बहुसंख्य 'कविता शब्दबद्ध केल्या आहेत. एक अस्सल ग्रामीण कवी म्हणून तर ते मराठी वाचकांना सुपरिचित आहेतच, पण एक उत्कृष्ट कथाकार म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसांत अधिक खोल ठसलेली आहे. १९३९ ते १९८४ या ४५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी सुमारे १५० कथा एकापेक्षा एक अशा सरस काव्यात्म आणि नाट्यमय शैलीत लिहिल्या आहेत. यादृष्टीने ठोकळ यांना 'मराठीतील थॉमस हार्डी' असे सार्थपणे म्हणता येईल.

विशेष म्हणजे आपल्या 'ठिणगी' नंतर २० वर्षांनी तर'गावगुंड' नंतर ३६ वर्षांनी ठोकळांनी 'टेंभा' ही जी आत्मवृत्तात्मक कादंबरी लिहिली ती आपल्या पूर्वजांची आणि नगर जिल्ह्याची पार्श्वभूमी पुढे ठेवूनच. १८८० ते १९३० हा ५० वर्षांचा कालखंड आणि तत्कालिन कौटुंबिक, शैक्षणिक आणि सामाजिक जनजीवन चित्रण करणारा, विशेषतः ठोकळ कुटुंबियातील आजोबा सखाराम, वडील लक्ष्मण आणि अंशतः स्वतः लेखक यांच्या गरिबीच्या, हलाखीच्या, कष्टाच्या, जिद्दीच्या आणि परिस्थितीवर मात करून मशालीप्रमाणे जरी नव्हे तरी थोडाफार का होईना, ध्येयवादाचा प्रकाश देणाऱ्या 'टेंभ्या'प्रमाणे आपल्या परमपूज्य पित्याचे जीवन होते. याचे हळुवार आणि आदरभावाने चित्रण करणारी ही कथा मूळ कामरगाव, सुपे, जामगाव, अहमदनगर, पारनेर, सारोळे, अरडगाव, तीसगाव, शेवगाव, वडूलं, वोधेगाव, कुकाणे, घोडेगाव, संगमनेर, कवठे ही गावे आणि प्रवरा, सीना, गोदावरी या नद्यांचा परिसर. यासंबंधीच्या वस्तुनिष्ठ चित्रणामुळे ग्रामीण चित्रणावरोवरच प्रादेशिक वातावरणाचे समर्पक दर्शन या कादंवरीत प्रकर्षाने घडते. कोकणच्या पार्श्वभूमीवर आपणास अनेक कादंवऱ्या आढळून येतात. नगर जिल्ह्याच्या भौगोलिक पार्श्वभूमीवर 'टेंभा' ही एकमेव कादंवरी असावी. या कादंवरीचा दुसरा भाग लिहिण्याचाही ठोकळांचा मानस होता. पण दुर्दैवाने त्यांचे देहावसान झाल्यामुळे हा योग प्रत्यक्षात आला नाही.

प्रथितयश ग्रामीण कवी, लघुकथा लेखक, कादंबरीकार आणि ख्यातनाम प्रकाशक म्हणून तर ठोकळ मोठे होतेच; पण एक कुटुंववत्सल पुत्र, पती आणि पिता म्हणूनही ठोकळ तथा दादा हे मोठे होते. ओळीने सात मुली झाल्या तरी ते कधी दुःखी कष्टी झाले नाहीत. उलट माहेर आणि सासरचा दुवा आणि ऋणानुबंध जोडण्याचे सत्कार्य परमेश्वर या मुलींच्याद्वारे आपणांकडून करवून घेतो. कन्यादानासारखे दुसरे पुण्य नाही, या शब्दांत मुलींच्या जन्मावावत नाराजी व्यक्त करणाऱ्या बापाला दादा दिलासा देत. सप्तकन्यांच्या पाठीवर पुत्ररत्न झाल्याचा कौटुंबिक आनंद ठोकळ पती-पत्नीला मिळाला. आपल्या या आठव्या अपत्याचे नाव 'कृष्ण' कुमार ठेवण्यात ठोकळांनी समर्पक औचित्य साधले आहे. आपली ज्येष्ठ कन्या विभावरी ते शेंडेफळ माया या सातही लाडक्या कन्यांचे शिक्षण, विवाह आणि सर्वांगीण कल्याण करून दादांनी गृहस्थधर्मांचा उत्तम निर्वाह केला. साक्षात् 'लक्ष्मी'च्या पावलाने आपल्या वैवाहिक जीवनात आलेल्या, आपली धर्मपत्नी सौ. हीरा हिचे स्थान 'हिराकोंदण' या स्वरूपाचे असल्याचा दादांना सार्थ अभिमान होता.

या सातही कन्यांच्या सात जावयांपैकी त्यांची ज्येष्ठ कन्या विभावरी हिच्याशी झालेल्या विवाहामुळे ज्येष्ठ जावयाचा सुयोग लाभलेला मी स्वतःला धन्य समजतो. कारण नागपूर विद्यापीठात विद्यार्थीदशेत असताना माझ्या बी.ए. आणि एम.ए.च्या अभ्यासक्रमात ज्या 'सुगी', 'मीठभाकर' आणि 'गावगुंड' या साहित्यकृतींचा पाठ्यपुस्तक अथवा संदर्भग्रंथ म्हणून परिचय झाला होता, त्याच साहित्यकृतीच्या प्रत्यक्ष निर्मात्याचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

कर्मधर्मसंयोगाने 'जावई' आणि तेही ती.दादांच्या शब्दात सांगावयाचे तर 'माझा नंबर एक'चा जावई या कौतुकाला पात्र होण्याचे सद्‌भाग्य मला लाभले, यापरते समाधान ते कोणते ?

लेखन-वाचनाची आवड हा जसा दादांचा छंद होता तसाच माणसांचा लोभ आणि मैत्री हा त्यांचा स्थायीभाव होता. म्हणूनच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील साहित्यिक-कलावंताचा राबता आणि बैठका दादांच्या सुरुवातीच्या 'लेखन-वाचन भांडार' या लक्ष्मी रोडवरील छोटेखानी दुकानात, आणि पुढे याच ठिकाणी उभ्या राहिलेल्या 'ठोकळ भवन' या आलिशान, प्रशस्त आणि भव्य वास्तूत तसेच टिळक रोडवरील 'कोंदण' या देखण्या वास्तूत, नित्यनेमाने होत असत. 'कोंदण' या पंडित कुलकर्णी यांनी प्रकाशित केलेल्या दादांच्या निवडक लघुकथा संग्रहाला लिहिलेल्या आपल्या कौतुकयुक्त प्रस्तावनेत ठोकळांच्या राहत्या वास्तूचे नाव 'कोंदण' आहे, त्या कोंदणात 'गृहरत्ने' आहेत तर या कोंदणात 'कथारत्ने' आहेत, असे मार्मिक विधान करणाऱ्या साहित्य सम्राट आचार्य अत्रे ते र. वा. दिघे आणि कृ. पा. कुलकर्णी, विदर्भ-नागपूरचे कोलते ते पु. भा. भावे आणि वामन चोरघडे, जळगांव, भुसावळ-खानदेशाचे सोपानराव चौधरी ते के. नारखेडे, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूरचे प्राचार्य एम. आर. देसाई ते 'राजर्षि शाहू महाराज-राजा व माणूस' या स्वतः ठोकळ, संपादित आणि प्रकाशित ग्रंथाचे लेखक कृ. गो. सूर्यवंशी, पुणे येथील ग. ह. पाटील, डॉ. सरोजिनी बाबर, गो. नी. दांडेकर, शंकरराव खरात आणि शंकर पाटील ते आनंद यादव, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे दत्तो वामन पोतदार, डॉ. रा. शं. वाळिंबे, ग. वा. बेहरे आणि प्रा. भीमराव कुलकर्णी ते म. श्री. दीक्षित, मूळ नगरचे पण पुण्यात स्थायिक झालेले पितृतुल्य वि. द. घाटे ते प्रकाशक जगताप, कारले आणि जोशी लोखंडे, रयत शिक्षण संस्थेचे शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील ते विवेकानंद शिक्षण संस्थेचे बापू साळुंखे, महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते मा. यशवंतराव चव्हाण ते बाळासाहेब देसाई अशा एक ना दोन साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकारणातील मान्यवर व्यक्तींचा या ठोकळ मित्रपरिवारात नामनिर्देश करता येईल. सुरूवातीला शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी स्कूलमधील पुस्तकाची विक्री करणारा सर्वसामान्य माणूस आणि शिवाजीनगर येथील दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरापासून ते टिळक रोडवरील आलिशान 'कोंदण' बंगला आणि लक्ष्मीरोडवरील 'ठोकळ भवन' ह्या भव्य वास्तू लक्षात घेता, सरस्वतीपुत्र ते लक्ष्मीपुत्र अशी ठोकळांची वाटचाल निश्चितच कौतुकास्पद आहे, या शब्दात ज्येष्ठ नेते कै. काकासाहेब गाडगीळ आणि कै. बाळासाहेब देसाई यांनी ठोकळांच्या या असामान्य कार्यकर्तृत्वाबद्दल शाबासकी दिली आहे.

पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे क्रियाशील सदस्य, कार्यवाह आणि कार्याध्यक्ष म्हणून दादांचा दोन तपांचा सक्रीय सहभाग हा वादातीत होता. १९८१ पुणे येथे संपन्न झालेल्या परिषदेच्या अमृत महोत्सवाच्या संपन्नेत तर त्यांचा सिंहाचा वाटा होता. याशिवाय कऱ्हाड येथील तमाशा परिषदेचे अध्यक्ष, पुणे येथील पु. मा. भावे यांच्या अध्यक्षतेखाली १९७७ साली भरलेल्या ५२व्या वादळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि १९८२ साली कोल्हापूरच्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून दादांना मानसन्मान मिळाले. जळगांव येथील १९८४ साली संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या तत्कालीन पदाधिकारी आणि मित्रांच्या आग्रहाखातर आपली उमेदवारी जाहीर करूनही साहित्यबाह्य गटबाजीच्या राजकारणामुळे त्यांना या निवडणुकीत अपयश आले.

दादांच्या या निवडणुकीच्या संदर्भातील एक निवडणूकपूर्व आणि दुसरी निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या मुलाखतीतील मनोगताचा उल्लेख करावासा वाटतो. आपण या निवडणुकीस का उभे आहोत ? या बद्दलच्या आपल्या मुलाखतीत 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, खेड्यापाड्यातून व ग्रामीण विभागातून शेतकरी, कामकरी व दीनदलित समाजातील जी नवीन पिढी सुशिक्षित होऊन पुढे येत आहे व साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रातही ही नवीन पिढी व नवोदित लेखक निर्माण होत आहेत, त्यांच्यापुढे मी जी दीर्घकालीन साहित्यसेवा आणि माझ्या आयुष्यभराच्या वाचन-लेखन-चिंतनातून

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

जे वैचारिक संचित मी जोडले आहे, ते या नव्या पिढीला व लेखकांना सादर करण्याची माझी तीव्र इच्छा आहे व त्यासाठी मला ही संधी हवी आहे' ही त्यांची उत्कट इच्छा आणि पराभवानंतर आपणास काय वाटते ? या आपल्या दुसऱ्या मुलाखतीत 'मी जे-जे करावयाचे योजिले होते, ते-ते आजवर मला मिळाले आहे. जीवनाचा प्रत्येक क्षण मी आनंदाने, आशावादी वृत्तीने व रसिकतेने उपभोगला आहे. मला लेखन व प्रकाशन व्यवसायावर मिळालेली परिपूर्णता फारच थोड्यांच्या वाट्याला येते. पण या निवडणुकीतील अपयशाचे शल्य, खंत आणि खेद मनात जरूर आहे, ते कशाला नाकारू ? मात्र 'न मे कर्मफले स्पृहा' या गीतासंदेशाप्रमाणे हे निराशेचे क्षणिक पटल दूर होईल. एव्हाना ते झालेही' या शब्दात आपला निग्रह व्यक्त केला आहे.

तथापि, जळगाव साहित्य संमेलनाचा सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर वर्ष सहा महिन्यातच कविवर्य बोरकर आणि ठोकळ तथा दादा महाराष्ट्र शारदेच्या दरबारातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मानकऱ्यांचे (अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापुरते वंचित आणि उपेक्षित राहिलेल्या मानकऱ्यांचे) एकापाठोपाठ निधन व्हावे, यासारखा दैवदुर्विलास आणि शोकांतिका ती कोणती ? शेवटी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. आपल्या मृत्यूपूर्वी आपली शेवटची कादंबरी 'टेंभा' लिहून दादांनी मातृ-पितृऋण आणि नगर जिल्ह्याच्या आपल्या जन्मभूमीचे ऋण जसे फेडले तसेच प्रकाशन क्षेत्रातील आपल्या ५० वर्षांच्या वाटचालीतील उण्यापुऱ्या ४०० ग्रंथांच्या प्रकाशनाने आपली सामाजिक बांधिलकी व्यक्त करून समाजऋण फेडले. आपल्या ह्या प्रकाशन व्यवसायातील शेखरीभूत व 'कळस' ठरेल असा ग्रंथ म्हणजे दादांनी आपल्या मृत्यूपूर्वी 'राजर्षि शाहू महाराज', 'राजा आणि माणूस' हा श्री. कृ. गो. सूर्यवंशी लिखित ६५० पृष्ठांचा ग्रंथराज प्रकाशित केला. आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारात अग्रणी ठरणाऱ्या राजर्षि शाहू महाराजांविषयीच्या कृतज्ञता बुद्धीने दादांनी संपादित आणि प्रकाशित केलेला हा ग्रंथराज महाराष्ट्र सारस्वताचे सुंदर लेणे आणि भूषण ठरेल, असा अभिप्राय अनेक मान्यवरांनी दिली आहे. हा अमोल ग्रंथ दादांनी तन, मन आणि धनाने सिद्ध केला आहे. 'राजर्षि शाहू महाराजांनी गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी ज्या सुविधा निर्माण केल्या त्याचा मलाही फायदा झाला आणि म्हणूनच मला आयुष्यात माझ्या पायावर ताठ उभे राहता आले.' ह्या राजर्षि शाहू महाराजांच्या विषयीच्या कृतज्ञता भावनेने दादांनी हा ग्रंथ प्रकाशित करून आपल्या साहित्यसेवेची जणू सांगता केली. या संदर्भात 'कवी, कथाकार, कादंबरीकार, साहित्यिक आणि इतर प्रकाशन ग्रंथांचा प्रकाशक म्हणून मराठी वाचक आणि महाराष्ट्र मला जरी विसरला तरी 'राजर्षि शाहू महाराज', 'राजा आणि माणूस' या ग्रंथांचा प्रकाशक म्हणून महाराष्ट्र सारस्वताने माझे स्मरण केले तरी मला पुरेसे आणि समाधानाचे आहे', या शब्दात दादांनी आपले हे साहित्यिक इच्छामरणच जणू लिहून ठेवले आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राने १९६२ साली दिवाळी अंकातील वाचकांना सर्वाधिक आवडलेल्या दहा कथा कोणत्या, याबद्दल वाचकांचा कौल मागविला होता. १९६२ ते १९६७ अशी पाच वर्षे हा उपक्रम सुरू होता. ह्या पाच वर्षात रसिक वाचकांनी ठोकळांच्या पहिल्या दोन वर्षात तीन-तीन कथा म्हणजे सर्वाधिक कथा सर्वाधिक मताने तर निवडल्या होत्याच पण ह्या पाच वर्षात त्यांच्या एकूण १५ कथा निवडून आपल्या सर्वाधिक पसंतीचे शिक्कामोर्तब केले होते.

आळंदी येथील ६९व्या भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा आणि 'ठोकळ व्यक्ती आणि वाङ्मयाच्या' रसिक चाहत्या ज्येष्ठ कवयित्री श्रीमती शांता शेळके यांना आवडलेल्या आणि त्यांनीच संपादित केलेला ठोकळांच्या निवडक कथांचा एक आकर्षक, देखणा आणि सर्वांगसुंदर असा लघुकथासंग्रह, दादांचे सुपुत्र आणि त्यांच्या प्रकाशनाचा वसा आणि वारसा निष्ठापूर्वक चालविणारे उमेदीचे प्रकाशक कृष्णकुमार ठोकळ यांच्या 'ठोकळ प्रकाशना'कडून प्रकाशित झाला. आजही ठोकळ साहित्याची वाचक मान्यता आणि रसिक मान्यता सिद्ध करणारा हा एक दुर्मिळ योग आहे.

प्राचार्य राम शिंदे
'तुषार' रघुवीर सोसायटी,
मुकुंदनगर, पुणे ४११ ०३७.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

ठोकळांची जानपद कविता : एक दृष्टिक्षेप

डॉ. आनंद यादव

[पांढरपेशांनी ग्रामीण कविता लिहिली; ती बांधावरून शेती पाहण्यासारखी होती. ग्रामजीवनाचे अनुभव नसलेले कवी ग्रामीण नस सोडून, केवळ ग्रामीण ढंगाने शब्दांची मोडतोड करून ग्रामीण काव्य झाले असे मानीत. परंतु ठोकळांनी ग्रामसंस्कृतीची नाडी ओळखली होती – संपादक]

व्यासपीठावरील सन्माननीय मंडळी आणि अतिशय जाणकारीने मसापच्या हॉलमध्ये नेहमीच श्रोतृवर्ग आलेला असतो. अशा श्रोतृवर्गासमोर बोलताना माझ्या मनावर नेहमीच ताण येत असतो असा हा जाणकार श्रोतृ वर्ग आहे.

मित्र हो ! ग. ल. ठोकळ यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने ही जी चार व्याख्याने होणार आहेत. त्या व्याख्यानाचे पहिले पुष्प माझ्या हस्ते गुंफले जाणार आहे, हे मी माझे भाग्य समजतो. ठोकळांनी आपल्या आयुष्यामध्ये १९३२-३३ पासून म्हणजे वयाच्या २२-२३व्या वर्षापासून कवितेला प्रारंभ केलेला आहे, असे दिसते; आणि तेव्हापासून तो तसाच कवितांमध्ये शेवटच्या काही कविता ज्या आहेत; त्या ६३-६४ सालामधल्या आहेत. म्हणजे हा कवी सतत त्याने कथा लिहिल्या, कादंबऱ्या लिहिल्या, इतर काही उद्योग, व्यवसाय केले, नोकरी केली. पण कवितेला आरंभापासून तो अखेरपर्यंत कधीही सोडलेली नाही. ती सतत त्यांच्याबरोबर वावरत असताना आपल्याला दिसते. माझे भाग्य असं की, मी पुण्यात (१९६०-६१) मध्ये आलो त्यावेळी त्यांचे दुकान लक्ष्मीरोडला होतं आणि तिथे ते संध्याकाळी बसलेले असत आणि हा ग्रामीण कवी म्हणून मला माझ्या विद्यार्थीदशेपासून अतिशय आवडता होता. म्हणून मी त्यांच्याशी नेहमी लगट करून मोकळेपणाने वागत असे, अनेक वेळेला संध्याकाळी आम्ही फिरायला इकडं तिकडं जात असू आणि आपल्या कवितेची स्फुरणं आपणाला कशी झाली हे ते अतिशय मोकळेपणाने त्या काळामध्ये मला सांगत असत. मी पुष्कळवेळेला काही निमित्ताने त्यांच्या घरीही गेलो आहे. सारं घर जवळून बघितलेले आहे. हे सगळं पाहण्याच्या पाठीमागे माझी ही भूमिका होती की एक ग्रामीण साहित्यिक खेड्या-पाड्यातून स्वतःच्या बळावर पुण्यासारख्या ठिकाणी येऊन प्रस्थापित झालेला आहे. कथा लिहितो, कविता लिहितो, कादंबरी लिहितो. यशस्वी प्रकाशक आहे. लोकसंपर्क मोठ्या प्रमाणावर आहे, असा हा कवी ! त्यांची कविता मी वाचत असे. त्या कवितेनं त्याकाळात मला एक फार मोठा 'कॉन्फिडन्स' दिला. 'कॉन्फिडन्स' अशा प्रकारचा होता की, त्यावेळी मी त्यांच्या 'मीठ-भाकर' मधल्याच कविता प्रामुख्याने वाचत होतो.

ती मला, माझ्यासारख्या खेड्यातून शहरात आलेल्या एका तरुण मुलाला आपलीशी, आपल्या घरातील आहे अशी वाटत होती. मला त्या काळात वाचा फुटत होती. कारण एका खेड्यात वाढलेला मुलगा मी सतत शाळेमध्ये मात्र तोंडाला कुलूप लावून बसत असे. त्या काळातील जी जुनी मंडळी होती. ती सगळी मंडळी मला- 'शुद्ध बोल, गाढवासारखा कसेही उच्चार करू नकोस.' तुम्हाला सांगतो, शुद्ध बोलायचे म्हणजे काय बोलायचे ते माहितीच नव्हते मला त्या काळात ! त्यामुळे मी असा मुक्यासारखा त्या शाळेत बसत होतो. तिसरीला असताना मला त्यांची एक कविता अभ्यासक्रमात आली होती. 'या बसा पाहुणं', 'गरिबीचा पाहुणचार'. त्यांनी मला म्हणून दाखवली होती. ती मला वेगळीच वाटत होती. ते असे आम्ही बाहेर फिरायला गेल्यावर म्हणत असे. 'या बसा पाहुणं असा राम राम घ्या' तिचा असा तो ठेका होता.

'घोंगडी टाकली इथं, बसा की वर, बसा की वर
अनमान करू नका, समजा हे आपुलं घर.'

त्याचा जो ताल आहे, तो त्यांच्या तोंडूनच ऐकण्याचं भाग्य मला मिळालं. त्या काळामध्ये ! आणि त्यामुळे मला आमच्या ग्रामीण भाषेचा हळूहळू अभिमान वाटू

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

लागला. हे सुद्धा कवितेत येऊ शकतं, असे त्यावेळी मला प्रथम जाणवलं. मित्रांनो! असा एक फार मोठा 'आत्मविश्वास' अतिशय अनौपचारिकपणाने, सहजपणाने देणारा हा कवी ! बोलायला येत नव्हतं तो मी मराठीचा प्राध्यापक झालो. पुण्यासारख्या ठिकाणी आणि त्यातल्या त्यात म्हणजे पुणे विद्यापीठातून मराठीचाच प्राध्यापक म्हणून नंतर शुद्ध बोलायला येत होते, व्यवस्थित शुद्ध लिहायला येत होतं वगैरे वगैरे आणि ते काही खास मला अवघड वाटत नव्हतं, पण मला माझ्या जीवनामध्ये साहित्यात प्रवेश करायला जे कोणी मला आपलं माणूस हवं होतं, ते मला ठोकळ यांच्या निमित्ताने मला त्या काळात मिळालेलं होतं, हे मी माझं भाग्य समजतो. अशा ह्या कवीच्या कविता नंतर मी आवडीने वाचू लागलो. १९३६ साली त्यांनी 'सुगी' हा कवितासंग्रह संपादित केला. म्हणजे वयाच्या २२-२३ व्या वर्षी १९०९ चा त्यांचा जन्म आहे. आपल्या लक्षात येईल त्या काळात या कवीने 'सुगी' हा कवितासंग्रह संपादित करावा. मराठी साहित्याची जाण एकूण त्या ग्रामीण कवितेविषयी त्यांना जे वाटत होतं, ग्रामीण समाजाविषयी त्यांना जे वाटत होतं. ते सगळं त्यांना त्या वयात आठवत होतं; आणि करावंसं वाटत होतं. त्या काळात 'सुगी' हा ऐतिहासिकदृष्ट्या, वाङ्मयाच्या दृष्टीनं संपादित करून एकत्रित संग्रहीत केले आहेत आणि मराठीमध्ये हे थोडंसं जरा विषयांतर होईल असे वाटेल. पण मला ते सांगितलंच पाहिजे की, हे मराठीमध्ये प्रथमच प्रकरण येतंय. त्यावेळी ग्रामीण हा शब्दच नव्हता. खेड्यातील कविता असा शब्दप्रयोग होता. अन् यातील ज्या कविता आहेत त्या अगदी जुन्या काळातील कविता आहेत. नुसत्याच रविकिरण मंडळाच्या शैलीच्या नव्हे; तर मोठमोठे जे कवी आहेत त्या काळातील त्यांच्या कविता म्हणजे सोपानदेव चौधरी या मंडळीपासून किंवा ना. घ. देशपांडे यांच्यापासून असे जुने अनेक कवी यांच्या कविता संग्रहामध्ये घेतलेल्या दिसून येतात; आणि या कविता ग्रामीण घेतलेल्या आहेत. त्यावेळी ग्रामीण शब्दप्रयोग, ग्रामीण साहित्य, ग्रामीण कविता हा प्रकार मराठी साहित्यामध्ये माहितीच नव्हता. खेड्यातील कविता, कथा हा शब्दप्रयोग होता. हे सगळं लेखन, तो जो काळ आहे १९२० च्या आसपास. या काळामध्ये मराठीचे जे साहित्य होतं. त्यापैकी आपण इथं कथा कवितांवरच बोलू आणि प्रामुख्यानं मी कवितेपुरतंच बोलणार आहे. ही १९२० पूर्वीची जी कविता होती ती प्रामुख्यानं रविकिरण मंडळकालीन कविता होती. म्हणजे कवी यशवंत, श्री. बा. रानडे, कवी गिरीश ही जी मंडळी होती ती प्रामुख्यानं नागर कविता लिहिणारी होती. पुण्यातील मंडळी होती. पुणे हे विद्येचे माहेरघर असल्यामुळे साहित्याची परंपरा निर्माण झाली होती. या परंपरेमध्येच कळत नकळत इंग्रजी वाङ्मयाचं अनुकरण, आणि ते वाचून तशाच प्रकारच्या आपण कविता लिहाव्यात, कथा लिहाव्यात, कादंबऱ्या लिहाव्यात अशी धारणा होती. ती काही भारतीय साहित्य परंपरेतील नाही, त्याच काळामध्ये जी कविता होती ती सर्वसामान्य मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवनावरची होती. इथला साहित्यिक प्रामुख्याने मध्यमवर्गीय, पांढरपेशा. जन्माला इथंच आलेला, इथंच नोकरी करणारा, इथंच शिकणारा असा साहित्यिक या परंपरेतील कथा, कविता मात्र नागर स्वरूपाची होती. नागरी जीवनावरची ती कथा, कविता होती. अधून-मधून काही मंडळी जी बाहेरून इथे स्थायिक झालेली होती; ती आपल्या खेड्यातील आठवणी येतात म्हणून खेड्यावर कविता लिहायचे आणि तेवढ्यापुरतीच ती खेड्यातील कविता मर्यादित होती. पण ते जे खेडं होतं ते मध्यमवर्गीय, पांढरपेशांचं खेडं होतं. म्हणजे त्यामध्ये जो अनुभव होता; तो खेड्यातील पांढरपेशा लोकांचा. बांधावरून शेती पाहणे अशा प्रकारचा अनुभव होता. त्या पांढरपेशा व्यक्तीनं आपल्या दृष्टीकोनातून पाहिल्या आहेत. त्या सगळ्या कविता यशवंतांनी जो एक ३०-४० कविता या संग्रहामध्ये एकत्रित आणून 'सुगी' हा संग्रह प्रसिद्ध केला आहे. आज तो वाचताना अनेक प्रकारच्या गमती, त्रुटी या संग्रहामध्ये मला दिसतात. उदाहरणार्थ-

'न्याहरीचा वकुत होइल, मैतरनी बिगी बिगी चला'

न्याहरीचा वेळ ही नीटपणे माहिती नसेल. तर किती घोटाळे उडतात हे आपल्याला त्यामध्ये दिसून येते. म्हणजे मैत्रिणी बिगीबिगी चालतात. दिस डोईवर येईल असे कवी म्हणतोय. न्याहरीचा वक्त होईल. आता न्याहरीचा वक्त जो आहे तो दिस डोइवर आल्यावर नसतो. तो भाकरीचा वकुत असतो. म्हणजे न्याहरी,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

भाकरी आणि संध्याकाळी जेवण असा तो सगळा प्रकार असतो. तर तो कवी म्हणतो की 'दिस डोईवर येईल मैत्रिणी बिगीबिगी चाला.' म्हणजे न्याहरीचा वकुत कधी होतो हेही त्यावेळच्या मंडळींना माहिती नव्हता, त्यातील तुम्हाला उदाहरणं सांगतो.

या संग्रहामध्ये 'मोटेवरील सुंदरी' नावाची कविता आहे. आता मोटेवर कधी सुंदरी असते का ? मला प्रश्न पडतो. मोट काही बायकांनी मारायची वस्तू नव्हे; तर ती वस्तू पुरुषांची आहे. अन् मग ही सुंदरी मोट कशी मारते. आणि बैलांच्या अंगावरून कशी सुंदर हात फिरवते. मोट मारताना कुठलाही शेतकरी बैलांच्या अंगावर हात फिरवत नसतो. अशा अनेक त्रुटी या कवितांमध्ये आहेत: कारण ते जीवनच नीटप्रकारे माहिती नसल्यामुळे हा घोळ होताना आपल्याला दिसतो. तर काही कविता मी मुद्दाम आपल्यासाठी म्हणून मी सांगतो आहे.

कवी यशवंतांची कविता आहे. (संदर्भ १२५ पान) शब्द मात्र त्यांनी ग्रामीण वापरायचे म्हणजे शुद्धशब्दांची मोडतोड केली की ग्रामीण शब्द होतात. अशी त्यांची धारणा होती. तसं नाही. ग्रामीण बोली, त्याचे शब्द, व्याकरण, भाषा हे वेगळेच असतात. पण ह्यांची कल्पना अशी झालेली असते की त्यांनी केलेले काय 'न्याहारीचा वकुत होईल' म्हणजे न्याहारी हा शब्द आपला आहेच. पण त्यांनी तो ग्रामीण माणूस 'न्यारीचा वकुत होइल' असे लिहलेय. पण तो 'न्यारीचा वकुत होइल' असे कधीच म्हणत नाही. व्याकरणातल्या, शुद्धलेखनातल्या या गोष्टी आहेत मी इथे सांगत बसत नाही. आणि मग ते नाही न राहता ते न्हाही राहत. म्हणजे ही मधलं 'ह' इकडे येते. आणि तिकडे इ शिल्लक राहतं आणि इकडं ते न्हाही असं होतं. अशा शब्दांच्या गमतीजमती आहेत. 'नांगुर सुटीच्या आत' आता नांगराची जी सुटी होते ती दिस डोइवर आल्यावर होते; आणि ही न्याहारी घेऊन चाललेली आहे. 'नांगुर सुटीच्या आत पोचाया होइ तीत' म्हणजे तिथे पोचायला कधी पाहिजे नांगरसुटीच्या आत. तर नांगराची सुटी १२ वा. होत असेल तर हिच्या न्याहारीचा वेळ कसा काय सांभाळता तुम्ही 'सोडतील हात बैलाला धुंदील नजर कोणाला' मग ते नांगुर सोडले बिडले की मग ती कोणाला बघणार. अहो तो न्याहरीचा वकुत. अहो तो थांबवून बैलाला विश्रांती द्यायला तो थांबवावा लागतो आणि थोडीशी न्याहरी करावी लागते. ते सोडावं लागत नाही. तर अशा अनेक त्रुटी आहेत. आणखी काही कविता आहेत. 'घामाने शिंपुन मळा पेरतो जो कधी जोंधळा' कधीही पेरायचे नसतं. तुम्हाला वाटेल तेव्हा. 'घामाने शिंपून मळा' घामाने मळा शिंपुन एक मराठीचा प्राध्यापक म्हणून सांगतोय, कवी म्हणून सांगतोय. 'शिंपने' ही जी क्रिया आहे. ही सुखद आहे. 'घामाने शिंपने' याला ग. ल. ठोकळांनी सरळ उत्तर दिलं आहे. 'घाम गाळूनी'. घाम गाळतो आपण घाम शिंपत नाही. पण या कवींना काही माहितीच नाही. मध्यम वर्गीय पांढरपेशी कवी. 'घामाने शिंपत मळा पेरतो कधी जोंधळा' मग त्याला मोत्याची कळा येते, असं काहीतरी त्या कवितेमध्ये त्यांनी तेथे म्हटले आहे. आणि तपशिलाच्या अनेक चुका या कवींच्या मध्ये झालेल्या आहेत; असे आपल्याला निश्चितपणे जाणवते. याच्या पाठीमागे त्यावेळी एक स्थिती होती मराठी साहित्याची ! ती अशीच होती. मध्यमवर्गीय पांढरपेशी मंडळीच प्रामुख्यानं त्या काळामध्ये साहित्य लिहीत होते. खेड्यातील साहित्य हे त्या मंडळींना मौजमजेचे असे वाटत होते. पण अशा अनेक त्रुटी जरी असल्या तरी त्यांनी खेड्यातील कविता हा प्रकार रूढ केला, चालू केला. ह्याच्यामध्ये अनेक त्रुटी असल्या, विसंगती असल्या तरीसुद्धा कविता सुरू झालेली आहे. ग्रामीण कविता मराठी कवितेत येऊ लागली ती त्या काळामुळे आणि ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपण 'मीठ-भाकर' या संग्रहाकडे वळावे. ग. ल. ठोकळांचा 'मीठ-भाकर' हा काव्यसंग्रह आहे. ह्या कवितांचा 'टोन' जरी नागरी असला तरी त्यातील ग्रामीण ढंगानुसार वाचल्या तर आणखीन वेगळ्या व त्यातील ज्वलंतपणा प्राप्त होतो. सगळ्या कविता जातीवृत्तबद्ध आहेत. मुक्तछंदात नाहीत. हे ज्यांना चाल लावता येत नाही अशा कविता त्यात नाहीयेत. सगळ्या चालीच्या आहेत. कारण वृत्तांना, मात्रांना, जातींना, गण वृत्ताच बंधन असतं आणि तशा प्रकारच्या कविता यासंबंध कवितासंग्रहामध्ये असल्याचं तुम्हाला दिसून येतात. हा १९३८ सालचा संग्रह आहे. या संग्रहामध्ये ठोकळांनी अनेक प्रकारे त्यातील काही उद्गार माझ्या प्रस्तावनेतही घेतले आहेत असे मला वाटले. कारण 'मीठ-भाकरला' माझी प्रस्तावना १९७८ ची आहे. १९७८ च्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आवृत्तीमध्ये ती आलेली आहे. मधील सगळा ग्रामीण कवितेचा इतिहास ह्या प्रस्तावनेमध्ये आहे. त्यामध्ये तुमच्या असे लक्षात येईल की, पहिली खरी वास्तववादी ग्रामीण जीवनाशी आतून संबंधित असलेली अशी कविता ठोकळांनी लिहिलेली आहे. ही सगळी कविता जी आहे ती वाचताना तुमच्या लक्षात येईल की काही जरी झालं तरी त्याकाळामध्ये कविता ही जातिबद्ध, वृत्तबद्ध कवीला मराठी भाषेतले कोणतेही शब्द वापरायला परवानगी असते त्यामुळे बरेच कवी आहेत की ते म्हणतात, 'घामाने शिंपतो मळा पेरतो जरी जोंधळा मोत्याची पसरे कळा ते अन्न ब्रह्म वितरीते', आता हे शेतकऱ्याला कधी कळणार आहे का ?

आम्हालाही त्या काळात ते कळत नसे. आणि हे कळणार कसं ? पण हे कवी त्या काळात वापरत असत. त्यातल्या मतितार्थ जो काही आहे तो ते घेत असत. शेतकऱ्यालाही सुसंस्कृत भाषेतूनही समजून घेण्याचा प्रयत्न ते करीत असत.

गाच गळ्यावर मोटेवरच्ये मंजुळवाणी गीत गड्या
हौश्या बाळ्या बैल चालतील तालावरती घेत उड्या
करकर वाजे मकरावरचे चाक लावुनि सूर गोड
थारोळ्यामध्ये पडता पाणी मिळेल थापेची जोड

आपण ते सगळं ऐकलं की वा वा ! काय छान आहे, काय अनुप्रास आहे, काय यमकं आहेत काय शब्दयोजना आहे, काय कल्पना आहे असं वाटतं. पण माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या मुलाला- सगळं चुकलं मास्तर ! तिसरीला आम्हाला ती कविता होती आणि मास्तर शिकवत होते; पण मास्तरांना ही काय त्यातल्या कल्पना माहीत नव्हत्या कारण मास्तरही कुणी जोशी, परांजपे असे होते. खेड्यातले होते; पण स्वतःचे असे काही त्यांना माहिती नव्हते. म्हणाले 'मूर्खासारखं काहीतरी बडबडू नको !' मोठा कवी आहे तो कसा काय चुकेल ? मी म्हटलं 'मला माहीत नाही- पण हे चुकलेय!' आता ते म्हणाले, काय चुकलेय ? आता तो कवी त्या मोटकऱ्याला जे सांगतोय तर ते चुकीचे आहे म्हटलं, 'मोटेला बांधलेल्या बैलाला उड्या मारत चालता येत नाही मास्तर ?' खेड्यातला असल्यामुळे मी असेही 'बोललो की, एवढंच नाहीतर मोट ओढताना बैलांच्या पाठीमागून लेंड्या पडतात. शेणाचे पू पडतात. इतकी ती मोट ताकद लावून ओढावे लागते. म्हटलं पुढे पण थोडं चुकलंय.

गहू हरभरा मका जोंधळा पिऊन पाणी डुलतील
खळ्यातून मग धान्यांच्या उंच उंच राशी पडतील

वाचायला, ऐकायला श्रोत्यांना बरं वाटतं; पण यात काय चुकलंय अहो यात रब्बीची, खरिपाची पिकं एकाच ठिकाणी घातलीत त्या मास्तराला तरी कुठे माहीत होतं की कुठली खरिपाची, रब्बीची पिकं. त्यांना पुन्हा समजून सांगितलं. अशा अनेक चुका सुगीमध्ये आहेत. माहिती नसल्यामुळे पण त्यात ग्रामीण भागातील निसर्गाचं प्रेम जे दाखवलं आहे. ते प्रेम त्या कवीने आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. त्या जीवनाची जी आस्था दाखविली आहे. त्यामुळे 'मीठ भाकर' या संग्रहाला वेगळ्याच प्रकारची कळा प्राप्त झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर ग. ल. ठोकळांची कविता अस्सल वाटते. ह्या माणसाने खेडं पाहिलेलं आहे. त्या माणसाने खेडं अनुभवलं आहे.

बारके, बारके तपशील ह्या माणसाला माहिती आहेत. व त्यांनी प्रत्येक कवितेत ते दाखविले आहेत. अशा पार्श्वभूमीवर मराठी साहित्यामध्ये पहिल्यांदाच ग्रामीण साहित्याला ग. ल. ठोकळांच्या 'मीठ भाकर'मुळे प्रतिष्ठा मिळाली आहे. त्या नंतरच्या काळामध्ये अनेक कवी लिहू लागले आहेत. कवी गिरीश, कवी यशवंत, रानडे ही मंडळी ग्रामीण लिहीत होती. तपशीलाच्या अनेक चुका होत होत्या आणि त्याची कल्पना त्यांनाही नव्हती. पण तरीसुद्धा त्यांनी ती वाट जी मोकळी केली आहे. ती मला माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची वाटते. ठोकळांच्या कवितांबद्दल पुष्कळ काही बोलता येईल. माझ्या दादांनी म्हणजे ठोकळांनी माझ्याकडून १९७८ सालीच प्रस्तावना लिहून घेतली. त्यामध्ये मी ठोकळांची काय भूमिका होती हे मी सर्व त्या प्रस्तावनेत सांगितले आहे. मित्रहो, आपण त्याविषयी पुष्कळ बोलू शकतो, पुष्कळ उदाहरणे आहेत. अन् त्या उदाहरणात रमायला बरं वाटतं. पण फार त्यातून विस्तार होऊ नये. त्या कवितेचं मराठी साहित्यात किती स्थान आहे तेवढं मी माझ्या परिनं सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपण शांत चित्तानं माझे विचार ऐकून घेतले, साहित्य परिषदेने मला माझे विचार मांडायची संधी दिली. त्याबद्दल मी परिषदेचे व आपले आभार मानतो. धन्यवाद !

डॉ. आनंद यादव
'भूमी', कलानगर, पुणे सातारा रस्ता, पुणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

ग. ल. ठोकळ– साहित्यहृदयी प्रकाशक

ह. ल. निपुणगे

[ठोकळांचे ग्रंथप्रेम त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाने भारलेले होते; म्हणूनच त्यांनी ग्रंथनिर्मितीचा व्यवसाय अत्यंत जिव्हाळ्याने केला. त्यांच्या प्रकाशक व्यक्तिमत्त्वाचे हे सहृदय लेखन. – संपादक]

विसाव्या शतकात, विशेषतः १९३० नंतर पुण्यात आणि मुंबईत ज्या प्रकाशन संस्था उदयाला आल्या त्यामध्ये 'ठोकळ प्रकाशन, पुणे' ह्या संस्थेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

मूलतः शिक्षक असलेल्या कै. ग. ल. ठोकळ यांनी १९४६ च्या सुमारास 'श्री लेखन वाचन भांडार' या नावाने लक्ष्मी रोडवर गणपती चौकात पुस्तक विक्रीचे दुकान सुरू केले; आणि नंतर अल्पावधीतच प्रकाशन व्यवसायातही पदार्पण केले.


कै. ग. ल. ठोकळ

माझी आणि दादा (कै. ग. ल. ठोकळ) यांची ओळख १९६२ च्या सुमारास झाली. त्यावेळी प्रकाशन आणि पुस्तक विक्री व्यवसायात त्यांचे पाय घट्ट रोवले गेले होते.

मी त्यावेळी वोरा आणि कं. प्रा. लि. या मुंबईच्या कंपनीच्या पुण्याच्या मराठी विभागात अमरेंद्र गाडगीळ यांच्याबरोबर काम करीत होतो. गाडगीळ यांच्याकडे कै. गो. नी. दांडेकर यांच्या 'आईची देणगी' या पुस्तकाचे सर्व हक्क होते; आणि त्यांना पुस्तकांची नवी आवृत्ती प्रकाशित करावयाची होती. त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मी दादांच्या दुकानात गेलो.

दुकानाचे काउंटर छान होते. खालील बाजूला बरीचशी पुस्तके लावली होती. तेथे एक प्रौढ गृहस्थ डेस्कच्या मागे बसले होते. मी त्यांना विचारले, "ग. ल. ठोकळ आहेत का ?"

"आत या, इकडून असे वर जा. तिथे 'दादा' बसलेले आहेत."

मी जिन्याने वर गेलो. समोर सोनेरी फ्रेमचा चष्मा घातलेले, गोल चेहऱ्याचे एक हसतमुख गृहस्थ बसले होते. त्यांच्या समोर काचेचे भव्य टेबल होते. आणि ते उंच पाठ असलेल्या फिरत्या खुर्चीवर बसले होते. टेबलावर टेलिफोन आणि पानाचा चकचकीत डबा होता.

मी दारातूनच विचारले, "दादा, आत येऊ का ? मी निपुणगे, अमरेंद्र गाडगीळ यांच्याकडून आलो आहे."

मी त्यांना 'दादा' या घरगुती नावाने संबोधल्याने त्यांना बरे वाटले असावे. "या, या ! बसा !" त्यांनी मोकळे हसून माझे स्वागत केले.

मी त्यांना कशासाठी आलो ते सांगितले. ते लगेच हसून म्हणाले, "आईची देणगी ना ? अवश्य प्रकाशित करू. ही चांगली पुस्तके कितीतरी दिवस उपलब्ध नाहीत! गो. नी. दांडेकरांची ही पुस्तके आजच्या मुलांनी वाचलीच पाहिजेत अशीच आहेत !"

मग त्यांनी माझी थोडी चौकशी केली. गप्पा-टप्पा झाल्या. मी निघालो. दादांची ती मूर्ती माझ्या मनावर एवढी ठसली की, मी वेळोवेळी त्यांच्याकडे जाऊ लागलो. 'आईची देणगी' पुस्तकांचे प्रकाशन त्यांनी यथावकाश केलेच.

जून १९६३ मध्ये मी वोरा कंपनीची नोकरी सोडली. आणि माझे स्वतःचे पुष्पक प्रकाशन सुरू केले.

माझे खऱ्या अर्थाने पहिले प्रकाशन 'रेखन आणि लेखन' लेखक म. ग. पातकर साधारण सप्टेंबर १९६३ मध्ये प्रकाशित केले. त्या पुस्तकाच्या प्रती घेऊन मी दादांच्याकडे गेलो. त्यांनी माझे स्वागत केले.

"तू एक ना एक दिवस प्रकाशक होणार असं मला वाटलंच होते." ते दिलखुलास हसून म्हणाले.

"छान काढलंस पुस्तक !" त्यांनी पुस्तक मनःपूर्वक चाळले. पुढे म्हणाले, "खाली ५ प्रती दे ! कमिशन काय देणार ?"

"२५ टक्के !" मी भीत भीतच म्हणालो.

"ठीक आहे ! कॅशमेमो कर ! पैसे लगेच घेऊन जा ! आणि हे बघ प्रकाशन व्यवसायात फार धीर धरावा लागतो. व्यापाऱ्यांना २५टक्के आणि शाळांना १२.५ टक्के कमिशन ही सध्याची रीत आहे. ती तू कसोशीने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

पाळ! पुस्तके ही आपल्या गतीनेच खपत असतात. जास्त कमिशन दिल्याने पुस्तके जास्त खपतात हा समज चुकीचा आहे ! पुस्तक आपल्या गुणांवर खपते !'' आणि माझी पाठ थोपटून त्यांनी मला शुभेच्छा दिल्या.

ग. ल. ठोकळ यांनी मुळात पुस्तकांचे दुकान जरी सुरू केले असले तरी त्यांचा कल प्रकाशने करण्याकडेच होता. मुळात शिक्षक असल्याने (बी. ए. बी.टी.) त्यांना साहित्याची चांगलीच जाण होती. क्रमिक पुस्तके विद्यार्थांना शिकविल्याने त्यातील उणिवा त्यांना समजत होत्या. म्हणूनच त्यांनी प्रथमतः दुसरी-तिसरीसाठी शालेय पुस्तके प्रकाशित केली. 'भारताचा नवा इतिहास' १०वी साठी (कृ. पां. कुलकर्णी व न. रा. पारसनीस) प्रकाशित केला. आणि त्यानंतर त्यांनी अनेक क्रमिक पुस्तके प्रकाशित केली. त्या पुस्तकांना मागणीही चांगली असे. अनेक लोकल बोर्डांना, पुढे जि.प.ला ही पुस्तके लावून घेण्याचे काम असे. तसेच हायस्कूलची क्रमिक पुस्तके मोठमोठ्या शिक्षण संस्थांना लावून घेण्याची गरज असे. दादांनी हे जिकीरीचे काम अत्यंत यशस्वीपणे केले; आणि आपला आर्थिक पाया मजबूत केला. त्यांनी डी.एड्.,बी.एड्. साठीही अनेक पुस्तके प्रकाशित केली. सहकारी ट्रेनिंगसाठी तसेच कॉलेजसाठीही त्यांनी अनेक पाठ्यपुस्तके प्रकाशित केली.

शालेय पुस्तकांच्या विक्रीतून मिळालेला नफा उत्तमोत्तम साहित्य प्रकाशित करण्याकडे त्यांनी वळविला.

'ऐतिहासिक शब्दकोश'-भाग १ व २ य. न. केळकर हे त्यांनी प्रकाशित केले. अशा प्रकारच्या कोशांना मागणी फारच कमी असते. पण प्रकाशन व्यवसायात असे कोश प्रकाशित करणे गरजेचे असते, ते ग. ल. ठोकळ यांनी केले.

'लोकनाट्याची परंपरा' वि. कृ. जोशी 'उर्दू काव्याचा परिचय' सेतु माधवराव पगडी 'साहित्य संचार' डॉ. वि. भि. कोलते- केशवसुत समीक्षा ही त्यांची संदर्भ-समीक्षेची प्रकाशने नोंद घेण्यासारखी आहेतच.

त्यावेळी त्यांनी शेतीविषयक पुस्तकेही प्रकाशित केली. 'माझी शेती भाग १ व २' तु. ग. तेली ही पुस्तके जशी शेती विषयाच्या विद्यार्थ्यांला तसेच सामान्य वाचकालाही उपयुक्त ठरली.

'गावगुंड', 'ठिणगी' या सारख्या स्वतःच्या कादंबऱ्या तर त्यांनी प्रकाशित केल्याच. पण 'चक्र' मंगेश पदकी, 'वेडी बाभळ', 'आग्यामोहोळ' या रंगनाथ देशपांडे यांच्या कादंबऱ्याही त्यांनी प्रकाशित केल्या. त्यावेळी या दोन्ही कादंबऱ्या खूपच गाजल्या.

ग्रामीण साहित्यिक र. वा. दिघे हे त्यांचे अत्यंत आवडते लेखक. 'सराई', 'आई आहे शेतात !', 'सोनकी', 'हिरवा सण', 'वसंतराव आणि चाळीस चोर', 'निसर्गकन्या रानजाई' या कादंबऱ्या प्रकाशित केल्या. या लेखकांशिवाय प्रभाकर तामणे, वि. शं. पारगावकर, माधव कानिटकर, श्रीपाद काळे, कविता नरवणे यांच्याही कादंबऱ्या प्रकाशित केल्या.

काव्यसंग्रह प्रकाशित करण्यातही ते मागे नव्हते. 'मीठ भाकर', 'सुगी' ह्या त्यांच्या स्वतःच्या काव्यसंग्रहांबरोबरच त्यांनी के नारखेडे (शिवार), ग. ह. पाटील (लिंबोळ्या), सोपानदेव चौधरी (सोपानदेवी) यासारखे अनेक काव्यसंग्रह प्रकाशित केले. काव्यसंग्रहाच्या मर्यादित खपाचे भय त्यावेळीही होतेच. पण ठोकळांनी काव्यसंग्रह मोठ्या प्रमाणात प्रकाशित केले.

मधला काळ विशेषतः विसाव्या शतकाचा उत्तरार्ध-या काळात कथासंग्रहाची मागणी खूपच कमी झाली होती. त्यावेळी त्यांनी स्वतःच्या कथासंग्रहांबरोबरच (ठोकळ गोष्टी भाग १ ते ५) प्रभाकर तामणे, सरोजिनी बाबर, बाबूराव पाटील, र. वा. दिघे, माडगूळकर-खांडेकर यांनी संपादित केलेली 'मराठी ग्रामीण कथा' असे अनेक कथासंग्रह प्रकाशित केले.

प्रकाशन व्यवसायातील विविध क्षेत्रातील विविध विषयांवरील पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. बाल-कुमारांसाठी अनेक चरित्रांची पुस्तके प्रकाशित केली. त्यामध्ये 'मानवतेचे पुजारी' ना. घ. पाटील, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' मधुकर केंचे, 'बारा ज्योतिर्लिंगे', 'महाराष्ट्रातील किल्ले' शं. रा. देवळे, 'संत तुकाराम महाराज' पां. बा. कवडे वगैरे अनेक महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत.

पुस्तकांच्या प्रकाशनामध्ये जसे त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले, तसेच पुस्तकांच्या विक्रीसाठीही मनःपूर्वक प्रयत्न केले. लक्ष्मीरोड वरील गणपती चौकातील त्यांची जागा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाचाचे तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

त्यामानाने फारच लहान होती. पुस्तकांची मांडणी उत्तम प्रकारे करता यावी. आपल्याबरोबरच इतर प्रकाशकांची पुस्तके मोठ्या प्रमाणात विकता यावीत; त्यांचा 'डिस्प्ले' चांगल्या प्रकारे करता यावा, हे त्यांच्या डोक्यात अनेक वर्षे घोळत होतेच. तसा त्यांचा प्रयत्नही चालू होताच.

त्याकाळीही १९६७च्या सुमाराच्या आसपास लक्ष्मी रोडवर इमारत बांधणे सोपे नव्हते. पण ग. ल. ठोकळांनी जुने घर विकत घेऊन तेथे आलिशान तीन मजली इमारत उभी केली. 'ठोकळ भवन' या त्यांच्या भव्य इमारतीचे उद्घाटन त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते झाले.

या इमारतीच्या तळमजल्यावर पुस्तक विक्रीचे भव्य काउंटर सुरू झाले. शालेय क्रमिक पुस्तकांबरोबरच सर्व प्रकाशकांनी प्रकाशित केलेले ललित वाङ्मय एका छत्राखाली उपलब्ध करून दिले. त्याचबरोबर नकाशे व इतर शालेय साहित्यही विक्रीसाठी होतेच.

पुस्तकविक्रीच्या या दालनाने अनेक छोट्या मोठ्या प्रकाशकांना आपली पुस्तके विकण्याची- मांडण्याची- प्रदर्शित करण्याची मोठी सोय ग. ल. ठोकळ यांनी करून दिली.

वरच्या मजल्यावर प्रकाशन संस्थेचे कार्यालय-ठोकळ प्रकाशनाचा स्टॉक अशी सोय होती. तेथेच दादांचे प्रशस्त 'चेम्बर' होते. येथे आनंद यादवांसारखे अनेक नामवंत साहित्यिक येत जात असत. साहित्यिक गप्पा रंगत असत.

हा सर्व प्रकाशन आणि पुस्तक विक्रीचा व्याप सांभाळत असताना दादांनी आपल्या कथालेखनाकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. त्यांचे लेखनही सतत चालू होतेच.

महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठीही दादांनी खूप काम केले. सन १९६८ ते १९७३ पर्यंत ते परिषदेचे कार्यवाह होते. त्यावेळी त्यांनी परिषदेसाठी मोठी जागा मिळवून भव्य इमारत बांधण्याचे स्वप्न पाहिले होते. तसा प्रयत्न करून टिळक रोड वरील एक जागा त्यांनी हेरली. ती जागा परिषदेला मिळविण्यासाठी प्रयत्न केले; पण ते जमले नाही. असो.

पुणे येथील १९७७ सालच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. कै. पु. भा. भावे अध्यक्ष होते. एम्.ई.एस्. महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या साहित्य संमेलनात निर्माण झालेल्या अभुतपूर्व परिस्थितीला त्यांनी मोठ्या धैर्याने तोंड दिले आणि संमेलन यशस्वी केले.

ग. ल. ठोकळ जसे यशस्वी लेखक-प्रकाशक होते तसेच ते उत्तम संपादकही होते. मंगल वाचन माला ही कै. वि. स. खांडेकर यांच्या सहकार्याने संपादित केलेली त्यांची पाठ्यपुस्तके अतिशय यशस्वी ठरली. या संबंधात प्रकाशक रा. ज. देशमुख यांच्याशी निर्माण झालेल्या रॉयल्टी संबंधीच्या वादाला ते खंबीरपणे सामोरे गेले.

ग. ल. ठोकळ यांचे एक वैशिष्ट्य सांगायचे म्हणजे वयाची साठ वर्षे पूर्ण होताच त्यांनी व्यवसायाची सर्व सूत्रे आपले चिरंजीव कृष्णकुमार ठोकळ यांच्या हवाली करून व्यवसायातून संपूर्ण निवृत्ती घेतली; आणि केवळ लेखनाकडे लक्ष केंद्रित केले. त्यानंतर ते दिवाळी अंकांसाठी कथालेखन करीत असत. 'टेंभा' ही कादंबरीही त्यानंतरच लिहून ती प्रकाशित केली.

वयाची साठी पूर्ण होताच व्यवसायातून निवृत्त होणे, ही फार अवघड गोष्ट असते; पण ती ग. ल. ठोकळांनी केली. हे नमूद केलेच पाहिजे.

२६ मे २००९ (२६ मे १९०९ ते २६ मे २००९) रोजी त्यांची जन्मशताब्दी होती. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाला विनम्र अभिवादन!

❖❖❖

ह. ल. निपुणगे
३८१ अ/१, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरभाष : २४४८३०६२

नाट्यरूप विशेषांकांविषयी निवेदन

प्रस्तुत अंक नाट्यविशेषांक म्हणून प्रसिद्ध होणार होता. अनेक लेखकांचे लेखही प्राप्त झाले आहेत. परंतु 'नाट्यरूप' ह्या विषयावरील मागविलेले लेख प्राप्त होत आहेत. नाट्यरूपास कारणीभूत होणाऱ्या घटकांवर आधारित लेखांची अपेक्षा आहे. संहिता आणि नाट्यरूप यात अनेक नाट्यधर्मी घटक आहेत. त्यावर आधारित लेख यावेत अशी अपेक्षा आहे.

– संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

खास म.सा. पत्रिकेच्या वाचकांना रौप्यमहोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त 'प्रतिमा प्रकाशनाची' खालील पुस्तके प्रथमच मोठ्या सवलतीत

रु. ९११०/- किंमतीची ही सर्व पुस्तके रु.४५५५/- ला सवलतीत रजिस्टर पोस्टाने घरपोच मिळवा.

कथासंग्रह

१. चित्रमाधुरी : डॉ.म.वि. गोखले रु. ९०
२. परंपरा : पु.भा.भावे रु. ९०
३. प्रतारणा : पु.भा.भावे रु. ११०
४. सार्थक : पु.भा.भावे रु. ११०
५. साडी : पु.भा.भावे रु. ९०
६. ठरीव ठशाची गोष्ट : पु.भा.भावे रु. १००
७. तो एक सागरपक्षी : सतीश कळमकर रु. ७०
८. कथांतर : प्रा वसंत केशव पाटील रु. १६०
९. आठवणीतल्या गोष्टी: प्रा.भगवंतराव देशमुख रु. १२०
१०. जरा जाऊन येतो: दि.बा.मोकाशी रु. १६०
११. उन्हांतलं चांदणं: सौ.सुनंदा गोरे रु. १४०
१२. अशी ही माणसं: श्री.के.अक्षीकर रु. १४०

कादंबरी

१. माझे मिथ्याचे प्रयोग : प्रा.रघुनाथ कडाकणे रु. ४८०
२. ऑक्टोपस : लक्ष्मीकांत देशमुख रु. १८०
३. आग : प्रा.बाबुराव बागूल रु. १००
४. कालचक्र : वि.शं.पारगावकर रु. १३५
५.अंतरिता : वि.शं.पारगावकर रु. ९५
६. सात सक्कं त्रेचाळीस:किरण नगरकर रु. २००
७. तिढा : श्रावण मोडक रु. २५०
८. हलफनामा : डॉ.यशवंत देशपांडे रु. १००

ललित

१.पान चुना तंबाखू: प्रा.काशिनाथ वाडेकर रु. १४०
२. मुळा मुठेच्या तीरावरुन: म.श्री.दीक्षित रु. १३५
३. लय आणि सय : शेखर कानेटकर रु. १२०

नाटक

१. मि.जीना : अनुवाद : मंगला वैष्णव रु. १००
२. आघात : प्रा.कुमार देशमुख रु. ५०
३. आकाशपक्षी : प्रा.कुमार देशमुख रु. ७५
४. नाट्यधर्मी मराठवाडा:प्रा.त्र्यंबक महाजन रु. २००

संगीत

१. संगीत यात्रा: रोचना भडकमकर रु. १२५
२. रागदारी संगीतातील सौंदर्यस्थळे : रोचना रु. १३०
३. संगीत यात्रा : बंदीश विभाग: भडकमकर रु. २५०
४. तबकडी ते तबकडी:प्रसन्नकुमार अकलूजकर रु. १६०

संकीर्ण

१.अर्थ आणि अन्वयार्थ: डॉ.गंगाधर पानतावणे रु. १६०
२.भक्तिशोभा : डॉ. विलास खोले रु. १४०
३.भिवा ते बोधिसत्त्व: डॉ. राजाभाऊ भैलुमे रु. २५०
४.आयुर्वेदीय बालविज्ञान: सौ.शुभदा वेलणकर रु. १२०
५.परदेशी शकुन कल्पना: डॉ.म.वि.गोखले रु. १००
६.बालशिक्षण बालसाहित्य: विविध आयाम डॉ.मंदा खांडगे रु. २२५
७. संमेलनाध्यक्ष प्रा.रा.ग. जाधव: संपादक - अरुण पारगावकर रु. ३५०
८. स्वराज्य:दिशा आणि दर्शन:सु.श्री.पांढरीपांडे रु. २२५
९. उर्दु राष्ट्रीय कविता: डॉ.मीर इसहाक शेख रु. १००
१०.पोलादी पुरुष सरदार पटेल: विश्वास भोपटकर रु. २७५
११. अस्मितादर्श सूची: डॉ.मीरा घांडगे रु. ३५०

समीक्षा

१. संस्कृतीसमीक्षेची तिसरी भूमिका : डॉ.श्रीपाल सबनीस रु. ९०
२. अनुराधा पाटील यांची कविता:सं.दादा गोरे रु. २५०
३. मराठी शाहिरी पोवाडा : डॉ.विश्वनाथ शिंदे/डॉ.हिंमाशु स्मार्त रु. २२५
४. स्त्री विकासाचे नवे क्षितीज: डॉ.स्वाती कर्वे रु. ९००
५. नवपार्थहृद्गत : राजीव साने रु. ३००
६. खानदेशातील अहिराणी स्त्री-गीते : प्रा.डॉ.सौ.उषा व्ही. सावंत रु. ९५
७. स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने : डॉ.विद्युत भागवत रु. ५५०

रक्कम पाठविण्याचा पत्ता

प्रतिमा प्रकाशन
१३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्ट.
पुणे - ४११०३० Tel. २४४७८९०८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बदलते ग्रामीण स्त्री-जीवन आणि साहित्य

डॉ. प्रतिमा इंगोले

[स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामसंस्कृतीला वेगळे वळण लागले. या वळणावर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अस्मितेचे रस्ते मिळाले. त्यामुळे ग्रामसंस्कृतीचा चेहरामोहरा बदलला. बदलत्या ग्रामसंस्कृतीने स्त्रीलाही आत्मभान मिळाले. शहरी जीवनाचे पडसाद खेड्यातही उमटले. बचतगटाच्या माध्यमातून ती संघटित झाली. आपले स्वतंत्र अस्तित्व शोधू लागली. तरी तिच्या दुःखाचे व्यापलेले परीघ साहित्यात कितपत आले; याचा शोध घेणारा हा लेख. -संपादक]

ग्रामीण जीवन पूर्वापारपासून साहित्याचा विषय ठरत आले आहे. ग्रामीण जीवनाचे चित्रण ठसठशीत व जोमदार असलेले साहित्य वाचकांच्या पसंतीस उतरलेलेही दिसते आहे. तरीही स्वातंत्र्यानंतरचे ग्रामीण साहित्य मात्र अतिशय वेगळे वाटते. त्याला कारण स्वातंत्र्यानंतर बदललेले ग्रामजीवन आणि संपूर्ण समाजात घडून आलेले परिवर्तन, हेच आहे. त्यामुळे ग्रामीण चित्रण असलेल्या साहित्याचे सरळ सरळ दोन टप्पे पडतात. स्वातंत्र्यपूर्व कालखंड की ज्यातील साहित्य रंजकतेबरोबरच स्वप्नाळू आणि गांधीवादी विचारांचा प्रभाव जाणवणारे असेच होते. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील ग्रामीण चित्रण असणारे साहित्य वास्तववादी, जीवनसन्मुख आणि चिंतनशील असे आहे. त्यामुळे ग्रामजीवनाचे बदलते रूप त्यातून प्रतिबिंबित होताना दिसते आहे.

खेड्यापाड्यातून शिक्षणाला सुरुवात झाली. आणि ग्रामीण भागातील तरुणांची एक पिढी शिकून तयार झाली. त्यातील काही संवेदनक्षम माणसांनी आपल्या परिसराचे चित्रण करणाऱ्या साहित्याची निर्मिती केली. लेखकांची नवी पिढी उदयास आली. त्यातून बदलत्या ग्रामीण स्त्रियांचीही चित्रणे येत गेली. शेती आणि शेतीपूरक व्यवसाय ग्रामसंस्कृतीचे मूलाधार होते. शेतीची अर्थव्यवस्था हीच भारतीय अर्थव्यवस्था होती. पण स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना आल्या. हरित-क्रांती सुरू झाली. त्याचबरोबर बदललेले युगही गावागावात शिरले. शहरांचा वाढता प्रभाव ग्रामसंस्कृतीवर घाले घालू लागला. लोक शेतीला दुय्यमस्थानी मानू लागे. खेडी ओस पडू लागली. खेड्यातील माणसांचे जगणे मरणप्राय यातनांनी ग्रासून गेले. शहरे चकचकीत तर खेडी ओबडधोबड बनू लागली. ग्रामसंस्कृती नासून गेली.

खेड्यातील शिक्षित तरुण नोकरी पसंत करू लागले. प्रसंगी शेती विकून शहराचा रस्ता पकडू लागले. काही राजकारणात शिरले. ग्रामव्यवस्था आणि ग्रामसंस्कृती त्यांना टाकाऊ वाटू लागली. शहरी जीवनात भ्रष्टाचार शिरला. राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भ्रष्टाचाराचे महामेरू तयार झालेत. तेच लोण झिरपत खेड्यापर्यंत आले. सततची नापिकी, निसर्गाची अवकृपा, रेव्हेन्यूचा भ्रष्टाचार, शेतीचे वाटणीमुळे झालेले तुकडे, पिकांचे पडणारे भाव, सावकारांचे कर्ज, त्याचे वाढणारे चक्रवाढव्याज, निराशेचं राज्य, व्यसनाधीनता, स्वाभिमानाची ऐशीतैसी, ह्या गोष्टींनी शेतकरी त्रस्त झालेत. आत्महत्येचा पर्याय स्वीकारू लागले. मानहानीपेक्षा मरण बरे, असे दुष्टचक्र सुरू झाले.

महात्मा फुल्यांनी या देशातील स्त्रियांच्या प्रश्नांची जाण पहिल्यांदा समाजाला करून दिली. लोकांना विचारप्रवण करण्यासाठी तशी कृतीही करून दाखविली. डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना व हिंदू कोडबिलाच्या रुपाने भारतीय स्त्रीला कायदेशीर हक्क प्रदान केले. स्त्रीपुरुष समानता आणि द्विभार्या प्रतिबंधक कायद्याद्वारे संरक्षण दिले. त्यामुळे गेल्या दीडदोनशे वर्षात भारतीय स्त्रीजीवनात अनेक स्थित्यंतरे घडली. त्याला ग्रामीण भागही अपवाद नाही. स्वातंत्र्य आंदोलनातही स्त्रियांनी विशेषतः ग्रामीण भागातील स्त्रियांनी सामुदायिकरित्या भाग घेतला. तरीही ग्रामीण भागातील स्त्रियांचे हलाखीचे जगणे बदलले नाही. 'पाप्युलेशन क्रायसीस' कमिटीने ९९ देशातील स्त्रियांच्या दर्जाविषयी आपल्या संशोधनातील निष्कर्ष मांडले, त्यात भारतातील स्त्रियांचा दर्जा अतिशय खाली होता. या संशोधनात भारताचा क्रमांक ७९वा लागला. 'अतिशय वाईट' असे भारतीय स्त्रियांच्या दर्जाबद्दल या संशोधनात म्हटलेले आहे. हे ग्रामीण स्त्रीचे वास्तव आहे. बलात्कार, क्रूर मारहाण, कुपोषण, बेरोजगार, बालविवाह, परावलंबित्व, पुरुषांची व्यसनाधीनता, पुरुषांचा नाकर्तेपणा आणि आता आत्महत्या ह्या सर्वांच्या घेऱ्यात ग्रामीण स्त्री सापडली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

चेंगरली आहे. तरीही चिवटपणे झुंजते आहे.

आजपर्यंतच्या दलित-ग्रामीण साहित्याचा प्रवाह वगळता मराठी साहित्यात स्त्रियांच्या या प्रश्नांचे चित्रण फारच अभावाने आले होते. कदाचित स्त्रियांच्या प्रश्नांवरील साहित्य वाचून स्त्रिया सजग होतील. असेही भय येथील पुरुषप्रधान संस्कृतीला वाटले असावे. त्यामुळेच त्यांच्या साहित्यातील स्त्री नटवी, दागदागिने, कपडे यांचा शौक असणारी, गाडी बंगल्यांचा हव्यास बाळगणारी, आपल्याच सारख्या दुसऱ्या स्त्रीचा संसार उद्ध्वस्त करणारी, आपल्या देहाचे चोचले पुरविणारी, अशीच जास्त आढळते. खरे तर ! या देशातील उपेक्षितांच्या, दुःखितांच्या दुनियेत अधिक उपेक्षित घटक म्हणजे स्त्री. पण मराठी साहित्यातही तिच्या नशिबी तीच उपेक्षा आली आहे. बरेच लेखक स्त्रीला मन, अंतःकरण वा भावना आहेत हेच नाकारतात. पण साहित्याच्या दरबारी ग्रामीण साहित्याचा प्रवाह रूजू झाल्यानंतर स्त्रीचे यथार्थ चित्रण थोड्याफार प्रमाणात साहित्यात येऊ लागले आहे. या समाजात मुलीला वाढवताना ती मानसिक व शारीरिकदृष्ट्या दुर्बल होईल अशा पद्धतीने तिला घडविले जाते. उलट पुरुषांची घडण मात्र तो निगरगट्ट होईल अशी केली जाते. साहित्यातील स्त्री पुरुषांच्या हातातील बाहुले असावी; अशीच तोपर्यंत दिसून येत होती. तिची घडण त्यांच्या डोळ्यांनी, त्याला अनुकूल अशीच केली जात असल्याची चित्रणे साहित्यातही उमटत होती. साहित्यातही ती दुय्यम स्थानीच होती. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याचा अभाव तिथेही कायम होताच.

याला अपवाद स्त्रियांच्या लेखनाचा आणि ग्रामीण आणि दलित साहित्यातील लेखनाचा म्हणावा लागेल. सावित्रीबाई फुलेंच्या साहित्यात पहिल्यांदा स्त्रीचे वास्तव चित्रण बघायला मिळाले. ब्राह्मण स्त्रीलाही पेशवाई नकोशी झाली होती, ह्याचे धीटपणे त्या चित्रण करतात. तर महात्मा फुले 'शेतकऱ्याचा आसूड' उगारतात. ह्याच काळात ताराबाई शिंदे 'स्त्री-पुरुष तुलना' करताना दिसतात. पण नंतरच्या कालखंडात ग्रामीण वास्तव झपाट्याने बदलताना दिसते आहे. ते कुणाच्याही संवेदना बधिर करणारं आणि त्याचबरोबर माणुसकीला काळिमा फासणारंही आहे. गावोगावी राजकारणाचा नंगानाच सुरू आहे. तारुण्य झेंडे उचलण्यात बरबाद होते आहे.

मधल्या काळात बदलत्या ग्रामीण स्त्रीजीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न अनेकांनी केलेला दिसून येतो. त्यात पां. श्रा. गोरे, वहिणाबाई चौधरी, वामनराव चोरघडे, वि. भि. कोलते, गाडगे बाबा, तुकडोजी महाराज ह्यांचा उल्लेख करावा लागतो. विदर्भाबाहेर र. वा. दिघे, श्री. म. माटे, ग. दि. माडगूळकर, सरोजिनी बाबर, ग. ल. ठोकळ, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, शंकर पाटील ह्यांचे लेखन ह्यादृष्टीने पूर्वसूरींचे म्हणता येईल. त्यानंतर मात्र स्त्रीजीवन वास्तव व यथार्थपणे साहित्यात येऊ लागले. उद्धव शेळके ह्यांच्या 'धग'मधील कौतिक, रा. रं. बोराडे ह्यांच्या 'पाचोळा' मधील पारवती, बाजीराव पाटील यांच्या 'भंडारवाडी'तील भागाबुली, आनंद यादव 'झोंबी'तील 'तारा', नारायण सुर्वेच्या कवितेतील स्त्रिया, अण्णाभाऊ साठेंच्या कथेतील नायिका आपआपले प्रश्न घेऊन साहित्यात अवतरल्या. नंतरही आनंद पाटील, मधू मंगेश कर्णिक, द. ता. भोसले, भास्कर चंदनशीव, वासुदेव मुलाटे, बा. ग. केसकर, मधुकर वाकोडे, मनोहर तल्हार, केशव बोबडे, यांसारखे लेखक ग्रामीण बदलते स्त्रीजीवन चितारण्याचा प्रयत्न करताना दिसतात. अशिक्षित बहिणाबाईंनीही ते यथार्थ चितारले.

ग्रामीण स्त्रीजीवन झपाट्याने बदलले ते या नंतरच्या समकालीन काळातच. समकालीन शब्दाची व्याख्याच मुळी 'समकालीन वर्तमान जीवनाच्या वास्तव चित्रणाबरोबरच त्या जीवनामागील स्थितीचे विश्लेषण करणे, व्यक्ती-समाज-परिस्थिती यांचे परस्पर संबंध, ताण-तणाव यातून राजकारण, समाजकारण, जागतिक संदर्भाचेही भान असलेले साहित्य हे समकालीन साहित्य होय."(१) अशी करण्यात येते. युग बदलले आणि जाणिवाही बदलल्या, परंतु हे बदल माणसांचे नैसर्गिक आणि स्वाभाविक आयुष्य पांगळे करणारे ठरले. समकालीन लेखकांनी बदलत्या वास्तवाचा आणि बदलत्या खेड्यांचा तिथल्या माणसांचा, स्त्रियांचा, बदलत्या मानसिकतेचा कधी उपहासात्मक तर कधी कारुण्यपूर्ण असा तिरकस, आणि चौकस वेध घेतलेला दिसत असला तरी पुरेसे बदलते स्त्रीजीवन रेखाटले गेले आहे असे आपण म्हणू शकत नाही. फार तर हिमनगाचा जसा एक अष्टमांश भागच पाण्यावर दिसतो व सात-अष्टमांश भाग पाण्याखाली असतो, असेच आपण स्त्रीचित्रणाबात फार फार तर म्हणू शकतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बदलत्या ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण आणि समकालीन लेखक यांचा विस्तृतपणे आढावा घेणे, मर्यादित पृष्ठसंख्येच्या लेखात आणि वेळात शक्य वाटत नाही. हा तसा प्रबंधाचाच विषय होऊ शकतो. त्यामुळे त्यातल्या त्यात विदर्भापुरता आणि तेही कथेपुरता विचार करणे प्रस्तुत लेखात शक्य आहे.

"ग्रामीण कथा लिहिताना साधारणतः त्या कथेमध्ये आविष्कृत होणाऱ्या कथानुभवाची नेमकी प्रकृती कुठली, शैलीचे, निवेदकाचे, आविष्काराचे कुठले माध्यम त्या कथानुभवाला अधिक संपन्नता आणू शकेल. अनुभवाची प्रसरणशीलता किती, नेमक्या कुठल्या स्थानावर तो अनुभव अधिक प्रभावीपणे व्यक्त होऊ शकेल आणि संपूर्ण कथा मांडणीमागील आशय, त्या अनुषंगाने अभिव्यक्त होणारा त्या लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन कुठला, या संपूर्ण घटकांची एक निश्चित आणि सजग दृष्टी असणे आवश्यक आहे." (२) अशी दृष्टी असणारे विदर्भातील कसदार लेखक केशव बोबडे त्यांच्या खेड्यातील वास्तव्यामुळे काहीसे उपेक्षित राहिले आहेत. पण बदलत्या स्त्रीजीवनाचा धांदोळा त्यांची कथा ताकदीने घेते.

त्यांचा 'एक सावली कडूनिंबाची' हा कथासंग्रह (१६ नोव्हेंबर २००१) लेखकाचे नाव वगळून वाचला तर एखाद्या स्त्रीने लिहिला असावा असे वाटण्याइतपत बदललेल्या ग्रामीण स्त्रीचे वास्तव चित्रण त्यात आलेले आहे. "माऽऽवं भूक लागली वं" अशा भुकेपायी कळवळणाऱ्या लेकीला "आता चूप राह्यतं काऽऽ का देऊ रट्टा !" असा दम भरणरी माय म्हणजे आपल्या फाटक्या संसाराला जागोजाग ठिगळं लावणाऱ्या लेकुरवाळ्या माऊल्यांची प्रतिनिधी." अवतीभोवतीच्या प्रगतीमुळे आता ग्रामीण जीवनातही परिवर्तन होत आहे. गतानुगतिक जीवन जगणाऱ्या आणि मर्यादांच्या वहिवाटी पाळणाऱ्या ग्रामीण स्त्रियांना नवविचारांचे वारे स्पर्शून जात आहेत. हितकारक अशा काही गोष्टी त्या स्वीकारताहेत. हळूहळू ग्रामीण जीवन बदलत आहे. केशव बोबडे या बदलाची नोंद घेताना दिसतात."(३) घरचे अपार दारिद्र्य. त्यामुळे "म्या माह्यावालं मायांग सफा करून घेतलं. आता ना आपल्याले पोरगं ना पोरगी. एकटी रेणुकाच सुखी राह्यली म्हंजे बस झालं." असे श्रीपतीची बायको देवकी म्हणते. "बदलत्या-ग्रामजीवनाचे नि तेथल्या काळसापेक्ष व्यावहारिक परिवर्तनातील बदल अलिकडच्या ग्रामीण कथेत फारसे आढळत नाहीत. एक तर बहुतेक ग्रामीण कथाकार विस्थापित जीवनशैलीच्या चक्रव्यूहात भोवंडत असतात. बालपणी शालेय जीवनात अनुभवलेले खेडे त्यांच्या स्मरणात असते. नोकरी व्यवसायादि कारणांनी त्यांचा खेड्यांशी असलेला संपर्क तुटलेला असतो आणि मग त्या पौगंडावस्थेत अनुभवलेल्या अनुभवांचे रवंथ करीत तत्कालीन भावमूल्यांचा गिलावा आपल्या कथाशयाला ते देत राहतात. दरम्यान खेड्यातील जीवनमूल्ये, भावमूल्ये बदललेली असतात, आणि या बदलत्या जीवनाचे चित्रण करण्यात ते अक्षम ठरतात. केशव बोबडे यांच्यासारखे जे कथाकार ग्रामीण जीवनाच्या परिघातच आपल्या उभ्या आयुष्याची वाटचाल करतात ते बदलत्या काळानुसार ग्रामजीवनात घडत गेलेल्या बदलांची समर्पक चित्रणे करण्यात यशस्वी होतात."(४) असे या संग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ. मधुकर वाकोडे म्हणतात. त्यादृष्टीने हा कथासंग्रह प्रत्येक अभ्यासकाने वाचायलाच हवा. कारण केशव बोबडे स्त्रियांच्या अंतःकरणातील भाषा बोलतात. त्यांच्या हृदयात शिरण्याचा प्रयत्न करतात. त्यांची 'पारध' कथा वाचून तर पुरुषजातीनं अख्ख्या स्त्रीजातीचीच पारध केल्याचं जाणवत राहतं.

बाबाराव मुसळे यांनी बदलत्या खेड्यातील बदलते स्त्रीजीवन रेखाटताना, कितीही विकासाच्या योजना आल्यात तरी ग्रामीण स्त्रीची कोंडी कायमच राहते याचे प्रभावी चित्रण अनेक कथांमधून केलेले आहे. त्यांच्या 'विहीर' नावाच्या कथेत आपल्या आजारी वडिलांना घोटभर पाणी मिळावे म्हणून आपली इज्जत घालवावी लागणारी कुमारिका आहे. गावोगावी नळयोजना सुरू होऊनही खेड्यातील कुमारिकेला सोसावा लागणारा अत्याचार आणि पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा वाईट दृष्टिकोन ह्या कथेत दिसून येतो. त्यांच्या कित्येक नायिका जगणे असह्य झाले म्हणून मरण स्वीकारताना दिसतात आणि बदलत्या खेड्याचा एक विदीर्ण चेहरा ठसठसीत करतात. 'नगरभोजन'मधील सखू अशीच परित्यक्ता, जिचा भावजई दुस्वास करते. तरीही ती भावाच्या भल्यासाठी रात्रीअपरात्री उष्ट्या पत्रावळी शोधून भावाच्या नगरभोजनाची पूर्ती करण्याचा प्रयत्न करते. तर 'कारभारी'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाचाचे तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

कथेतील 'नरमदी' आपल्या जेठाचे कारभारीपण आणि जेठानीचे ऐदीपण मोडून काढून त्यांना काम करण्याची दीक्षा देते. कुटुंबही राखते; आणि नवऱ्यावरील आणि आपल्यावरील अन्याय युक्तीने दूर करते. 'नरमदी' बदलत्या स्त्रीचे यथार्थ प्रतिनिधित्व करते.

बदलत्या स्त्रीजीवनाचे सशक्त चित्रण करणाऱ्या कथालेखिका डॉ. प्रतिमा इंगोले त्यांच्या साहित्याचा विचार केला तर, त्यातील बहुतांशी कथा ह्या स्त्रियांच्या भोवती फिरताना दिसतात. त्याला कारणही तसंच आहे. आणि ते म्हणजे स्त्रियांचं पिचलेपण समजावून घेण्यासाठी त्यांच्याजवळ असलेलं संवेदनशील स्त्रीहृदय. लेखन करीत असताना वस्तुस्थितीची जाणीव त्यांनी कुठलाही मुलाहिजा न ठेवता करून दिली आहे.'' (५) ग्रामजीवनाचे, तेथल्या निसर्गाचे, भौगोलिक वातावरणाचे, तेथल्या जनजीवनाचे, आणि संस्कृतीचे बदलत जाणारे चित्र नेटक्या शब्दात त्या चितारतात. आंतरिक बदल म्हणजे मूल्यात्मक बदल किंवा परिवर्तन. या दिशेने प्रतिमा इंगोले यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, याबरोबरच मानवी व वैज्ञानिक जीवनमूल्यांचा शोध घेण्याचा एक प्रयत्न केला आहे.''(६)

डॉ. अंजली सोमण या संदर्भात म्हणतात ''आपल्या बहुसंख्य कथांमधून प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण स्त्रीच्या दुःखाचा वेध घेतला आहे. त्यातील स्त्री दुःखाचा पोत वेगळा आहे. स्त्रीच्या दुःखाचे चित्रण करताना, मनोवेध घेताना सामाजिक घटनांकडे त्या तितकेच लक्ष पुरवितात. केवळ पुरुषप्रधानतेवर भर न देता परिस्थितीने पिचलेल्या स्त्रियांचे दुःख त्या मांडतात. त्यामुळे त्यांच्या कथेत आर्थिक, सामाजिक, आशय व या पातळ्यांवरील ग्रामीण स्त्रीची अभावग्रस्तता ही खणखणीतपणे व्यक्त होते.

वऱ्हाडी ग्रामीण कथेचं बलस्थान सदानंद देशमुखांची कथा आहे. बदलत्या स्त्री जीवनाचं परिपूर्ण चित्रण त्यांच्या पहिल्या 'अंधारबन' कथासंग्रहापासूनच त्यांच्या कथांतून येत गेलेलं दिसून येते. 'तिखटकुटी' ही कथा शेवंताच्या दारिद्र्याचा आलेखच मांडताना दिसून येते. ''ग्रामीण स्त्रीचे दुःख आपल्या कथांतून देशमुख अतिशय हळुवारपणे रंगवतात. बंदिस्त कुटुंबव्यवस्था आणि ग्रामजीवनातील अभावग्रस्तता या दोहोंमुळे स्त्रीचे दुःख अधिकच गहिरे होते. मात्र आपल्या कथांमध्ये स्त्री-दुःख एकसूरी पद्धतीने न मांडता देशमुख स्त्रीच्या दुःखाचे सूक्ष्म आणि वेगवेगळे पदर दाखवत राहतात.''(९) ग्रामीण जीवनातील स्त्री शोषणाचेही चित्रण 'डूख', 'पोटमारा', 'पतन' सारख्या कथांतून देशमुखांनी केले आहे. 'डूख' कथेतील गीता दीराच्या वासनेची शिकार होते. सुमतीची मैत्रीण तिला आधार देऊ बघते. पण तत्पूर्वीच तिला उद्ध्वस्त व्हावे लागते. 'पतन'कथेतील कुमारीवर तिचा बापच घाला घालतो. त्यात सुमा बळी पडते. सदानंद देशमुखांची कथा ''गाय, गावातील विविध स्वभावधर्मांची माणसे, तिथला निसर्ग, मधून येणारा दुष्काळ, राज्यकर्त्यांचे गावातील पुढाऱ्यांचे दुर्लक्ष, आपल्याच स्वार्थात चूर असणारी सत्ताधारी माणसे, आणि राजकारण, अर्थकारण या कोंडीत बकाल जीवन जगणारी, कष्टाळू माणसे, यामधून सदानंद देशमुख एकूण वास्तवालाच जिवंत करतात.''(१०) पण स्त्रीजीवन मात्र वरील विषयांच्या अनुषंगानेच येते. स्वतंत्रपणे त्याचा घेतलेला वेध क्वचित जाणवतो.

बदलत्या स्त्रीजीवनाचे समर्थ चित्रण अरुणा सबाने यांच्या 'अनुबंध' आणि 'अथांग' या दोन्ही कथासंग्रहातून सडेतोड भूमिकेतून आलेले आहे. त्यांच्या 'अवचित' कथेतील 'मंजुळा' दारूच्या व्यसनापायी बरबाद झालेल्या नवऱ्याचा संसार सावरते. कष्ट करून शेतीतून उत्पन्न काढते. मुलाबाळांना शिकवते. संपूर्ण कुटुंबाला टेकू देऊन सावरते. तर 'सातबारा' कथेतील 'मैना' शेतीसाठी कर्ज हवे म्हणून सातबारा काढण्यास पटवाऱ्याकडे जाते. तिचा नवरा लुळापांगळा असतो. पटवारी तिची अडवणूक करतो. माझ्यासोबत राहिलीस तरच सातबारा देईन म्हणतो. ती त्याला शरण न जाता लढा देते. अर्थात त्यात तिचे कर्ज बुडते. पण पटवाऱ्याला धडा शिकविते. नव्या लेखिकांमध्ये अरुणा सबाणे धीटपणे बदलत्या स्त्रीचे चित्र रेखाटण्यात आघाडीवर आहेत.

विदर्भात ग्रामीण स्त्रीजीवन चितारणाऱ्या व खेड्यात वास्तव्य असणाऱ्या शैलजा गावंडे ह्या लेखिकेने ग्रामीण बदलते स्त्रीजीवन बारकाव्याने चितारले आहे. त्यांचे 'मोगरा' आणि 'मधुमालती' असे दोन कथासंग्रह आहेत. त्यांचा ग्रामजीवनाशी संबंध असल्यामुळे अनुभवांचा अस्सलपणा दिसून येतो. ग्रामीण स्त्री, स्त्री आहे म्हणून त्रस्त असते. शिवाय आर्थिक बाजूही कमकुवत असणारी असते. त्याशिवाय राहणं खेड्यात असल्यामुळे सुखसोयी नसतातच. वर ग्रामसंस्कृतीतील पुरुष लटका अहंकार जोपासतो आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

तो निभावण्यासाठी स्त्रीला हत्यार किंवा बळी बनवतो ह्या सर्वांचे विदारक चित्रण शैलजा गावंडे करताना दिसतात. त्यात बदलती स्त्रीरुपेही आढळतात.

अनुराधा वऱ्हाडे ह्यांच्या 'आठवणीतील पाचोळा' संग्रहातील स्त्रिया पाहू जाता, त्यात काही सुखवस्तू तर काही काबाडकष्ट करणाऱ्या आहेत. शहरी जीवनाचं अनुकरण खेड्यात होऊ लागलं आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्री भांबावून जाते आहे. हे विश्व तिला नवीन आहे. गजरा अशीच भांबावलेली दिसते. पारावती मात्र इरसाल ग्रामीण स्त्रीचा नमुना. जी चतुर तर आहेच पण नवे शोधण्याची, जाणून घेण्याची, नवे अनुभव घेण्याची व त्यासाठी स्वतःला बदलण्याची तिची तयारी आहे. लक्ष्मी सुखवस्तू घरची स्त्री. स्वतःचे अपत्य नाही म्हणून पाळणाघर सुरू करते. कमळी लग्नाच्या दिवशीच सावकाराच्या मुलाच्या वासनेला बळी पडते. आणि जीव देते. कथेतील वातावरण मात्र वास्तव आहे आणि त्याला नेटकी भाषाशैली सहाय्यभूत ठरते आहे. वऱ्हाडेंच्या ग्रामीण कथांच्या भाषाशैलीत ठसका आहे. त्यामुळे ती उठावदार झालेली दिसते आहे.

'सोनरवासच्या कथा' नावाचा आणि नावातच गाव दडलेला प्रेमानंद दामोदर ह्यांचा संग्रह बदलते ग्रामीण स्त्रीजीवन यथाशक्ती चित्रित करताना दिसतो. बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतरही स्त्रिया नवस बोलतात, हेल टाकतात, सगुण पाहतात. बुवाबाजीत अडकतात. अशा कर्मकांडात अडकलेल्या स्त्रियांना मार्ग दाखविणारा हा आशावादी संग्रह आहे.

ह्याशिवाय सुप्रिया अय्यर, मंजुषा सावरकर, नरेंद्र इंगळे, विजय पाटील, लक्ष्मी कमल गेडाम, आणखी कितीतरी नव्या दमाचे लेखक बदलती ग्रामीण स्त्री रेखाटण्याचा प्रयत्न करीत आहेत. एवढे मात्र नक्की, आतापर्यंत अस्पर्श असणाऱ्या स्त्री दुःखाच्या कितीतरी परी समकालीन ग्रामीण साहित्यिकांनी चितारल्या आहेत. त्या त्या समस्येवर ती कशी तोडगा काढते. आपले कुटुंब सावरून धरते हेही तिने यथाशक्ती मांडले आहे. ग्रामीण स्त्रीलाही आता आत्मभान येते आहे. राजकारणात राखीव जागांमुळे तिला बाहेर पडता येऊ लागले आहे. पुरुषी खाचाखोचा ती शिकू लागली आहे. बचतगटांमुळे संघटित होऊ लागली आहे. एकमेकींचा दुस्वास करणे सोडून परस्पर सहचर्य मैत्रीभाव जोपासू लागली आहे. ग्रामीण साहित्यामुळेही स्त्री प्रभावित होते आहे. प्रबोधनाची कास धरते अहे. ही ग्रामीण साहित्याची फार मोठी फलश्रुती आहे.

निष्कर्ष

१) स्वातंत्र्यानंतर ग्रामसंस्कृतीचा विकास होण्याऐवजी ती नासून गेली. गांधीजींचा 'खेड्याकडे चला' नारा व्यर्थ ठरला.

२) खेडोपाडी मानहानीपेक्षा मरण बरे असे दुष्टचक्र सुरू झाले.

३) महात्मा फुलेंनी आणि डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीला संरक्षण दिले.

४) 'पॉप्युलेशन क्रायसीस कमिटीने' ९९ देशातील स्त्रियांच्या दर्जाविषयी संशोधन केले. त्यात भारताचा नंबर ७९ वा लागला.

५) पूर्वीच्या मराठी साहित्यातील स्त्री नटवी होती.

६) महात्मा फुले, सावित्रीबाई, ताराबाई शिंदे ह्यांनी स्त्रीचे यथार्थ चित्रण केले. अशिक्षित बहिणाबाईंनीही ते केले.

७) समकालीन काळात ग्रामजीवन झपाट्याने बदलले. त्यात स्त्रीजीवनही आले.

८) आजपर्यंतच्या साहित्यात स्त्रीजीवनचित्रण हिमनगासारखेच झाले आहे.

९) ग्रामीण स्त्रीजीवन चितारण्यास सजगदृष्टी आवश्यक.

१०) केशव बोबडे बदलत्या स्त्रीजीवनाचा धांदोळा ताकदीने घेतात.

११) कितीही विकासाच्या योजना आल्यात तरी ग्रामीण स्त्रीची कोंडी कायम राहते असे चित्रण बाबाराव मुसळे करतात.

१२) बदलत्या स्त्रीचे सशक्त चित्रण करणाऱ्या, डॉ.

प्रकाशित झाला

मराठी वाङ्‌मयाचा इतिहास

खंड ७वा भाग १ला

१९५० ते २०००

संपादक : प्रा. रा. ग. जाधव

कार्यकारी संपादक : डॉ. वि. भा. देशपांडे

पृष्ठे डेमी ७००, मूल्य रु. ७००/-

मागणीसाठी संपर्क :

प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

प्रतिमा इंगोले या महाराष्ट्रातील लक्षणीय कथालेखिका होत.

१३) सदानंद देशमुख ग्रामीण वास्तवाला जिवंत करतात पण स्त्रीजीवन त्याला पूरक म्हणून रेखाटतात.

१४) अरुणा सबाणे, शैलजा गावंडे आणि डॉ. अनुराधा वऱ्हाडे ग्रामीण स्त्री जीवन व त्यातले बदल व बारकावे चितारतात.

१५) बौद्धधर्म स्वीकारलेल्या खेड्यातील ग्रामीण स्त्रीच्या मानसिकतेत फारसा बदल झालेला दिसून येत नाही. **(कथेच्या माध्यमातून)**

१६) नवीन लेखकांची पिढी बदलत्या स्त्रीचे ग्रामीण जीवन रेखाटण्यात पुढे येते आहे.

१७) अस्पर्श असणारे कितीतरी विषय, स्त्री दुःखाच्या नानापरी समकालीन ग्रामीण साहित्यिकांनी चितारल्या आहेत.

१८) ग्रामीण स्त्रीला आत्मभान येते आहे.

१९) राजकारणातील प्रवेशामुळे ती धीट झाली आहे.

२०) बचतगटांमुळे संघटित होऊन लढा देऊ लागली आहे.

२१) परस्पर सहचर्य व मैत्रीभाव जोपासू लागली आहे.

२२) ग्रामीण साहित्य वाचून ग्रामीण स्त्रीने प्रबोधनाची कास धरली आहे. ही ग्रामीण साहित्याची फार मोठी फलश्रुती आहे. (संदर्भ मागे आहेत.)

संदर्भसूची

१) स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य - डॉ. शोभा नाफडे, पृ. २१२

२) आगळे अनुभवविश्व डॉ. प्रतिमा इंगोले - डॉ. सुलभा हेर्लेकर व डॉ. प्रज्ञा आपटे, पृ. १८.

३) एक सावली कडूनिंबाची - केशव बोबडे - प्रस्तावना - डॉ. मधुकर वाकोडे, पृ.

४) एक सावली कडूनिंबाची - केशव बोबडे - प्रस्तावना - डॉ. मधुकर वाकोडे, पृ.

५) स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य - डॉ. शोभा नाफडे, पृ. २३९

६) स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य - डॉ. शोभा नाफडे, पृ. २६३

७) लचांड - सदानंद देशमुख - प्रस्तावना - डॉ. वासुतेव मुलाटे, पृ. ८

संदर्भग्रंथ सूची

१) हजारी वेलपान - डॉ. प्रतिमा इंगोले - तिसरी आवृत्ती - १९९७ सोनल प्रकाशन.

२) पानावरील रेषा - श्रीमती विमलाबाई कुकडे - प्र. आ. - १९९५ सोनल प्रकाशन.

३) जखम मनावरची - अरुणा सबाणे - १९९४.

४) अथांग - अरुणा सबाणे - १९९६.

५) अनुबंध - अरुणा सबाणे - आकांक्षा प्रकाशन - २००५.

६) मोगरा - शैलजा गावंडे - १९९२, संघमित्रा प्रकाशन नागपूर.

७) मधुमालती - शैलजा गावंडे - १९९९, जनसाहित्य प्रकाशन अमरावती.

८) आठवणीचा पाचोळा - डॉ. अनुराधा वऱ्हाडे - १९९४, साकेत प्रकाशन.

९) साद देती स्वप्नकळ्या - लक्ष्मी कमल गेडाम २००२.

१०) शिवार फेरी - लक्ष्मी कमळ गेडाम - २००३.

११) सोनरवासच्या कथा - प्रेमानंद दामोदर - सोनल प्रकाशन - २००२.

१२) डांगोरा - मंजुषा सावरकर, जनसाहित्य प्रकाशन - २००४.

१३) अंधारबन - सदानंद देशमुख - कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद - १९८६.

१४) लचांड - सदानंद देशमुख - मेहता पपब्लिकेशन्स हाऊस - १९९३.

१५) उठावण - सदानंद देशमुख - शब्दालय प्रकाशन.

१६) महालूट - सदानंद देशमुख -मेहता पब्लिकेशन, पुणे - १९९५.

१७) मोहरलेला चंद्र - बाबाराव मुसळे - मेहता प्रकाशन, पुणे - १९९२.

१८) झिंगू लुकूलुकू - बाबाराव मुसळे - मेहता प्रकाशन, पुणे - १९९३.

१९) नगर भोजन - बाबाराव मुसळे - जनशक्ती वाचक चळवळ प्र. २००९.

❖❖❖

डॉ. प्रतिमा इंगोले

अ-३१, फुलोर, नारायणनगर, दर्यापूर

जि. अमरावती-४४४८०३. मोबा. : ९८५०११७९६९

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

बहिणाबाईंची कविता : काही प्रतिक्रियांचा परामर्श

इंद्रजित भालेराव

'बहिणाबाईंची गाणी' या पुस्तकाची पहिली आवृत्ती परचुरे प्रकाशनाने प्रकाशित केली. आता बाजारात उपलब्ध असलेली आवृत्ती मुंबईच्या सुचित्रा प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. पुस्तकाचे निर्मिती मूल्य चांगले असून आता पुस्तक सर्वत्र उपलब्ध आहे. या प्रकाशनाच्या मालक सुचित्रा चौधरी असून त्या बहिणाबाईंच्या नातसून, सोपानदेवांच्या सूनबाई आहेत.

या अकराव्या आवृत्तीत आचार्य अत्रे, सोपानदेव चौधरी, मालती किर्लोस्कर, पद्मा लोकूर, इंदिरा संत, सदा कऱ्हाडे, वसंतराव जोगळेकर, प्रभा गणोरकर यांचे लेख, बोरकरांची बहिणाबाईवरची कविता, बोरकर आणि पु. ल. देशपांडे यांची पत्रे यांचा समावेश आहे. पु. लं. नी आपल्या पत्रात म्हटलंय, 'कवितेचे दळण अनेकांनी मांडले; पण सुखदुःखाच्या जात्यात स्वतःचे जीवन भरडले जात असताना त्या श्रमाचे सामवेद करून गाणारी बहिणाई एखादीच' यातल्या बोरकरांच्या कवितेतल्या काही ओळी अशा आहेत,

माझे आई बहिणाई तुझ्या मुखे वेद बोले
बोल तुझे गाता गाता माझे पाझरती डोळे
चूल, जाते, शेत, औत, वीट, राहट व मोट
कसे वाचलेस त्यात सारे गीता भागवत
तुझ्या साध्या सोप्या शब्दी कशी पालवती श्रुती
जाग लागताच कशी हात जोडतात पाती ?
तुझ्या साध्या उत्तराने योगी होतो निरुत्तर
नेणिवेतली शाणीव अशी कशी लोकोत्तर ?
देव तुझ्या ओटीपोटी देव तुझ्या कंठी ओठी
दशांगुळी उरलेला देव तुझ्या दहा बोटी
त्यांना भरवी गे घास दुधी मोडून भाकर
बोलेन त्या अक्षरात उमटू दे बीजाक्षर

या पुस्तकात दुर्गा भागवत यांनी लिहिलेल्या बहिणाबाईवरच्या लेखाचा समावेश असायला हवा होता. म्हणजे मग या पुस्तकाला आणखी संदर्भ प्राप्त झाला असता. दुर्गाबाईंचा लेख 'आस्वाद आणि आक्षेप' या डिंपल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाविष्ट आहे. आनंद यादवांच्या 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' या पुस्तकातही यादवांचा बहिणाबाईंच्या कवितेवर एक छान लेख आहे. तोही या पुस्तकात घेतला असता तर बरे झाले असते.

या पुस्तकाला आचार्य अत्रे यांनी लिहिलेल्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेतला पहिलाच परिच्छेद फार महत्त्वाचा आहे. तो असा,

''एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाबाईच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत महाराष्ट्राला लागला. शास्त्राप्रमाणे वाङ्मयात शोध क्वचितच लागतात. सोळा वर्षांपूर्वी मराठी साहित्यात असाच एक मौल्यवान् शोध लागला. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' प्रसिद्ध झाली तेव्हा. लक्ष्मीबाई सारखाच बहिणाईचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दा-शब्दांतून प्रतिभा नुसती झिरपते आहे. असे सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे आणि मौज ही आहे की, जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्यांचे तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने हे सारे रचलेले आहे. हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे.''

इंदिरा संत यांनी बहिणाबाईंच्या स्मृतिदिनी ३ डिसेंबर १९७६ रोजी लोकसत्तेत लिहिलेल्या लेखात म्हटले आहे,

''एकोणीसशे बावन्न साली बहिणाबाईंच्या कवितांची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली, त्याचवेळी माझा आणि त्यांचा एक अतूट मनबंध निर्माण झाला. त्यांनी मला काय दिले आणि मी त्यांच्यापासून काय घेतले हे सांगणे शब्दापलीकडचे आहे. त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्यावर मान्यवर रसिकांनी, कवींनी, समीक्षकांनी त्यांना 'निसर्गकन्या' म्हणून गौरविले. त्या निसर्गकन्या आहेतच, पण केवळ निसर्गकन्या नाहीत, त्या भूमिकन्या आहेत. सर्वार्थाने भूमिकन्या आहेत.

कवितेचे पुस्तक वाचताना मला नेहमी वाटते की, आपण झुळझुळ वाहणाऱ्या निर्मळ प्रवाहाच्या काठाशी बसलो आहोत; आणि तळातील रंगीबेरंगी रेती, दगड गोटे आणि प्रवाहाचे तरंग यात अगदी गुंतून जात आहोत. बहिणाबाईंच्या गाण्याचे पुस्तक वाचताना निराळेच वाटले, त्या निर्मळ प्रवाहात आपण लहरी सांभाळत एखाद्या फुलमाळेसारख्या वाहत चाललो आहोत.''

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

इंदिरा संतासारख्या प्रतिभासंपन्न कवयित्रीने हे भाष्य केलेले असल्यामुळे त्याला आगळेवेगळे महत्त्व आहे. निसर्गकन्येपेक्षा बहिणाबाईंना भूमिकन्या म्हणावे, हे निरीक्षण तर थोरच आहे. बहिणाबाई आणि इंदिरा संत यांचे देणे-घेणे हिरिताचं होतं हे खरं.

'सप्तसरिता' (१९८२) या स्त्रियांच्या कवितांचे संपादन करणाऱ्या मालती किर्लोस्कर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत बहिणाबाईविषयी लिहून ठेवले आहे की, "लक्ष्मीबाईंचे चिरंजीव श्री. देवदत्त टिळक यांनी सांगितले आहे की, त्यांच्या मातोश्री या बहिणाबाई चौधरींना आपली बहीण मानीत. या बहिणीबहिणीत मनाचा प्रांजलपणा, साधेपणा, खेळाडूवृत्ती, अस्तिक्य भाव अशा किती तरी गुणात साम्य आहे. पण साहित्य गुणात मात्र बहिणाई वडील बहीण शोभतात, यात सुतराम शंका नाही.

कवीला आपण द्रष्टा मानतो. द्रष्ट्याचे असे गुण कवयित्रीत मला फक्त बहिणाबाई जवळ आहेत असे वाटते. वस्तुतः प्रेम हा विषय अनादि कालापासून कवितेचया क्षेत्रात अग्रक्रमाने येतो. बहिणाबाईंनी प्रेकवितेची एक ओळही लिहिली नाही, पण जे लिहिले ते मौलिक आणि आशयघन म्हणूनच द्रष्ट्याच्या पदवीवर त्यांचा हक्क पोचतो."

सुप्रसिद्ध कवयित्री पद्मा लोकूर यांनी बहिणाबाईंच्या कवितेचे वर्णन बहिणाबाईंच्याच शब्दात 'जागेपणी पडलेले स्वप्न म्हणजे ही कविता' असे लिहून ठेवले आहे,

"ही कविता इतकी श्रीमंत, इतकी आशयगर्भ, इतकी सफाईदार आणि सर्वांत म्हणजे इतकी मधुर आहे की भल्याभल्यांनी तोंडात बोट घालावे; आणि या बाईंच्या व्यक्तिमत्त्वाची बारव किती खोल आहे, गहिरी आहे याबद्दल कल्पना लढवाव्यात.

बहिणाबाईंच्या कवितेचा एक खास रंग आहे. मातीचा, पानाफुलांचा, ग्रामीण जीवनाचा, खानदेशी वऱ्हाडी भाषेचा घमघमणारा सुवास त्यांच्या कवितेतल्या प्रत्येक ओळीला येतो. ही कविता फक्त त्यांची, त्यांचीच आहे. कुठल्याही पढीकपणाचा तिला पुसटसा स्पर्श नाही.

बहिणाबाई तुमच्या आमच्या लेखी न शिकलेल्या, अशिक्षित पण त्यांनी एक सर्वात मोठा ग्रंथ बारकाईने वाचला होता तो म्हणजे जीवनग्रंथ ! त्यातून त्यांनी स्वतःसाठी म्हणून एक हृदयंगम तत्त्वज्ञानही तयार केले होते. ते सुशिक्षितांनाही मान खाली घालायला लावेल, विचारप्रवण करेल."

१ ऑगस्ट १९९८ साली लिहिलेल्या सदा कऱ्हाडे यांच्या बहिणाबाईंवरच्या लेखात भडकपणा टाळून निखळ वाङ्मयीन निकषावरही बहिणाबाईंची कविता कशी श्रेष्ठ ठरते ते दाखवून दिलेले आहे,

"बहिणाबाईंची गाणी ही एकूणच मराठी काव्यातील अपूर्व निर्मिती आहे. वाचन-लेखनासाठी अक्षरांची ओळख, शब्दांची दाट मैत्री अन् वाक्य रचनेचा दृढ परिचय असावा लागतो. आधुनिक भाषाविज्ञानाच्या दृष्टीने अथवा परिभाषेत सांगायचं तर साहित्य ही भाषिक निर्मिती असते; आणि त्यासाठी साहित्यिकाजवळ भाषिक क्षमता असावी लागते. अनुभव हे साहित्याचं- त्यात काव्यं ही आलीच- मूलद्रव्य असतं. भाषा हे साहित्याचं माध्यम असतं. अनुभवाच्या भाषिक अभिव्यक्तीला म्हणजेच भाषेच्या माध्यमातून होणाऱ्या अभिव्यक्तीलाच साहित्यकृती असे म्हणतात. साहित्य ही एक भाषिक कृती असते. ध्वनी, पदबंध (शब्द) आणि वाक्य हे भाषेचे मूलभूत घटक असतात. भाषिक निर्मिती म्हणजे या मूलभूत घटकांच्या आधारे वेगवेगळी भाषिक रूपे तयार करण्याची क्षमता म्हणजे भाषिक क्षमता. 'बहिणाबाईंची गाणी' वाचताना अथवा ऐकताना सतत प्रभावीपणे जाणवते, ती बहिणाबाईंची भाषिक क्षमता. ध्वनी, शब्द आणि वाक्य या घटकांच्या साह्याने बहिणाबाईंनी इतकी विविध, विपुल, विचित्र आणि विलक्षण भाषिक रूपे कशी घडविली याचेच आश्चर्य वाटते. अक्षरओळख नसताना आणि प्रारंभी म्हटल्याप्रमाणे वाचन-लेखन करण्याची शक्यता नसतानाही बहिणाबाई अशी भाषिक रूपे निर्माण करू शकल्या म्हणजेच एका अर्थी काव्यनिर्मिती करू शकल्या, ही मराठी साहित्यातील एक अपूर्व व अकल्पित घटना आहे.'

...'आभाळ' आणि 'धरती' ह्या निसर्ग प्रतिमांचा आशय बहिणाबाईंच्या अनेक गाण्यात प्रसरणशील बनतो. उदाहरणार्थ,

धर्तीवरली हिर्वय
गेली उडत उडत
अरे उडता उडता
झाली निंयी आभायात

कवी केशवसुतांनी 'नवा शिपायो' या कवितेत समतेच्या विचारमूल्यांचा उद्घोष करताना म्हटले, "कोठेही जा पायाखाली तृणावृता भू दिसते. नीलांबर ते" पण नीलांबर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(निळे आभाळ) आणि तृणावृता भू (हिरवी धरती) यांच्यातले अद्वैत केशवसुतांना उमगले नसावे. ते निरीक्षण, अडाणी, श्रद्धाशील आणि श्रमशील बहिणाबाईंना उमगलं असावं. गोविंदाग्रजांनी प्रेमकविता लिहिली 'जन्माला आलेल्या जीवाचे जगणे असेच असते सापेक्ष प्रेमावरी' हे उत्तर त्यांच्या पुढंही होतं आणि 'जीवाचे सापेक्ष प्रेम म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधातील लौकिक प्रेम'. पण निसर्गाशी एकात्म होऊन प्रत्ययाला येणारे अलौकिक प्रेम गोविंदाग्रजांना जाणवलंच नाही. बहिणाबाईंच्या गाण्यात कुठंही लौकिक प्रेम भेटत नाही. भेटते ते अलौकिक प्रेम. अलौकिकलाच त्या लौकिकाचं रूप देतात.''

बहिणाबाईंच्या कवितेचं नेमकं वाङ्मयीन रूप ओळखून शिक्षित प्रतिभावंत कवींशी बहिणाबाईंची तुलना करून त्यांचं मोठेपण नेमकं कशात आहे त्या वर्मावरच सदा कऱ्हाडे यांनी बोट ठेवलं आहे. बहिणाबाईंच्या कवितेचा अन्वय लावताना कऱ्हाडे यांनी केलेला आणखी एक अंदाज मला महत्त्वाचा वाटला. तो असा-

''पतिनिधनानंतरचं भवितव्य त्यांचं त्यांनाच कळलं होतं. कर्तृत्वाची जाणीव झाली होती. जबाबदारीची जाणीव झाली होती. रडण्याची सवय सोडून देण्याचा निर्धार केला आणि 'रडण्याला हरवण्याचा' मार्ग सापडला. तो मार्ग म्हणजेच गाणी रचण्याचा. हा अन्वयार्थ बरोबर असेल तर 'बहिणाबाईची गाणी' वैधव्यप्राप्तीनंतरच्या काळात रचली गेली असावीत. स्वतःचे दुःख विसरायचे, मुलांचे संगोपन करायचे, त्यांना दुःखाची झळ लागू द्यायची नाही. म्हणून बहिणाबाईंनी स्वतःला सतत कष्टात, शेतीच्या कामात गुंतवून ठेवले. एका अर्थाने काळ्या धरणीशी दृढ नाते जोडले. धरतीशी नाते जोडता जोडताच आभाळाशीही नाते जोडले.''

प्रभा गणोरकर या आजच्या महत्त्वाच्या कवयित्री. त्या जशा कवी म्हणून श्रेष्ठ तशाच समीक्षक म्हणूनही श्रेष्ठ आहेत. मोजकेच पण मूलभूत स्वरूपाचे समीक्षालेखन त्यांनी केलेले आहे. बहिणाबाईंच्या कवितेतल्या ग्रामीणत्वाची चर्चा करताना त्यांनी आपले लक्ष एका नव्याच गोष्टीकडे वळवले आहे. बहिणाबाईंची कविता ही मराठीतली एकमेव खरीखुरी ग्रामीण कविता कशी आहे हा आपला मुद्दा पटवून देताना त्या म्हणतात.

''बहिणाबाईंची कविता ही खऱ्या आणि संपूर्ण अर्थाने ग्रामीण कविता आहे. एवढेच नव्हे तर ती सर्व अर्थाने पहिली आणि एकमेव ग्रामीण कविता आहे. मराठीत प्रसिद्ध झालेली बव्हंशी ग्रामीण कविता ही शहरी संस्कृतीचा परिचय झालेल्या, शहरी संस्कृतीचे संस्कार लाभलेल्या आणि शहराच्या संपर्कात आल्यावर गावाचे मोठेपण जाणवलेल्या कवींनी लिहिलेली कविता आहे. नुसती ग्रामीण कविताच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण साहित्यच शहराविषयीच्या प्रतिक्रियेतून निर्माण झालेले आहे. स्मरणरंजनात्मक आणि हळवे आहे. मुख्य म्हणजे ते शहरातल्या लोकांसाठी निर्माण झालेले आहे. या साहित्यिकासमोर असलेला वाचक गावातला नसून शहरातला आहे. एकेकाळी हा वाचकही गावात राहिलेला असला तरी हे ग्रामीण साहित्य वाचताना मात्र तो शहरीच आहे. बहिणाबाईंची कविता ही अशा एकूण शहराच्या सावलीपासून दूर आहे. एखाद्या स्वयंभू ग्रामदेवतेसारखी ती ग्रामीण आहे; आणि तिच्यापुढे असणारा श्रोताही ग्रामीण आहे. जो श्रोता आहे, वाचक आहे, तिचे सत्त्व आहे. तिचे वेगळेपण आणि एकमेवाद्वितीयत्व या ग्रामीणत्वात आहे. तिचे अस्तित्वच मुळी या ग्रामीणत्वाशी निगडित आहे. किंबहुना बहिणाबाई आसोदे गावी जन्मून जळगावात जगल्या, एकही दिवस शाळेत गेल्या नाहीत, त्यांच्या अस्सल खानदेशी बोलीवर शालेय शिक्षणाचे, ग्रांथिक भाषेचे संस्कार झाले नाहीत; म्हणूनच ही कविता निर्माण होऊ शकली.

अर्थात् काव्यनिर्मितीला एवढेच लागते असे नव्हे; अन्यथा बहिणाबाईसारख्या लाखो स्त्रिया आजही खेडोपाडी आहेत; पण ग्रामीण भागातून लिहिली जाणारी कविता मात्र त्यांची नाही. बहिणाबाईंना काव्यप्रतिभेचे देणे लाभले आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांची कविता ही कविता आहे. घरोघरी, जात्यावर दळताना, बायका उत्स्फूर्तपणे गात असत त्या, आता लोकसाहित्यात ज़मा होणाऱ्या लोकगीतांसारख्या काव्याहून बहिणाबाईंची कविता वेगळी आहे. कारण तिच्यामागे 'काव्य' निर्मितीची जाण आहे. 'कविता' ही कविता कशामुळे ठरते याचे अक्षरशः दुर्मिळ, विरळ, लक्षावधीमध्ये एखाद्यालाच असते ते उपजत ज्ञान आहे. बहिणाबाईंनी श्रद्धापूर्ण अंतःकरणाने काढलेले उद्‌गार- 'माझी माय सरसोती माले शिकवते बोली' अगदी खरे आहेत.

काव्यप्रतिभेचे सर्वांत मोठे लक्षण म्हणजे कवितेतील रूपक निर्मिती होय. बहिणाबाईंच्या कवितांत ही रूपके प्रतिमा ओळीओळीत भरभरून आहेत.''

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बहिणाबाईंच्या कवितेची आणखी काही वैशिष्ट्य सांगताना तिच्यात देशीपणाचा आणि जीवनदृष्टीच्या परंपरानिष्ठतेचा खास उल्लेख करताना प्रभा गणोरकर यांनी लिहिले आहे,

"धरणी, वारा, आभाळ, पाऊस, ऊन यांच्या आधाराने वाढलेली बी, बियाणे, मोट, नाडा, शेत, खळे, बैल, नांगर, वखर, बोरी, बाभळी, निंबोणी, चूल, तवा, भाकरी, भाजी, विस्तव, फुंकणी, पाखरे, झाडे, वेली, देव या साऱ्यांशी रक्ताच्या, हाडामासांच्या नात्याने बांधलेली ही अस्सल देशी कविता आहे. आधुनिक जीवनजाणिवांचा, यंत्रादि साधनांचा तिला स्पर्शही नाही, एकेकाळी केवळ खेड्यातच असणारी, आता जवळ जवळ लोप पावलेली, शुद्ध ममत्वाने भरलेली, मायेची पाखर घालणारी सर्वसमावेशक जीवनदृष्टी या कवितेतून प्रतिबिंबित होते. स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनाशी ती अतूटपणे बांधलेली आहे. आत्माविष्कारातून ती उत्स्फूर्तपणे उमटलेली असली; तरी समूहमनाशी, समाजाशीच तिचे दृढ नाते आहे. ग्रामीण विश्वाचे हे वैशिष्ट्य असते. एकाकीपणा, एकटेपणा, आत्ममग्नता, व्यक्तिकेंद्रत्व ही आधुनिकतेने निर्माण केलेली प्रणाली होय. खेड्यात ती अस्तित्वात राहूच शकत नाही. खेड्यातले जीवन हे समूहाने जगण्याचे जीवन होय. बहिणाबाईंच्या कविता त्यामुळेच समूहाशी संवाद साधताना दिसतात."

१९८० साली बहिणाबाईंच्या जन्मशताब्दीच्या वर्षी जळगावच्या सार्वजनिक वाचनालयाने आनंद यादव यांचे बहिणाबाईंच्याकवितेवर एक व्याख्यान आयोजित केले होते. पुढे ते 'केसरी'च्या रविवार पुरवणीत छापून आले. 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव' या समीक्षेच्या पुस्तकात यादवांनी या भाषणाचा समावेश केलेला आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचे उद्गाते असल्यामुळे यादव यांच्या भूमिकेला एक विशिष्ट महत्त्व आहे. १९८० साली आनंद यादव यांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा' ग्रामीण साहित्य विशेषांकही संपादित केला होता. तो बराच वादग्रस्त ठरला होता. त्या अंकाच्या सुरुवातीला यादवांनी बहिणाबाईंचा फोटो छापून तो अंक शताब्दीच्या निमित्ताने बहिणाबाईंना अर्पण केला होता. त्यातून बहिणाबाई विषयीच्या भावना व्यक्त करून झाल्या होत्या. भाषणातही त्यांनी बहिणाबाईंच्या कवितेचा गौरवच केला आहे. लेखरूपात छापलेल्या या भाषणाचे शीर्षकच मुळी, 'पहिली मराठी ग्रामीण कवयित्रीः बहिणाबाई चौधरी' असे आहे. या लेखातली यादवांची निरीक्षणे महत्त्वाची आहेत. ते म्हणतात-

"बहिणाबाईंचा जन्म लक्षात घेता १९१५ च्या आसपासच तिच्या मुखातून तिची कविता बाहेर पडली असली पाहिजे असा अंदाज करता येतो. या काळात म्हणजे १९१५ ते १९२५ च्या काळात तिची कविता 'होईल' तशी प्रसिद्ध होत गेली असती तर एकूणच जानपद किंवा ग्रामीण मराठी कवितेला अतिशय वेगळे वळण लागण्याची शक्यता होती. तिला वाट पुसत १९२५ नंतर जन्माला आलेल्या 'रविकिरण मंडळ' कालीन कवितेला जावे लागले असते अन्यथा ती जगू शकली नसती.

१९२५ नंतर अनेक मराठी कवी ग्रामीण कविता लिहू लागले होते. पण तिला खरी अंतर्यामीची प्रेरणा लाभली नव्हती. अनेक व्याज प्रेरणांनी व कारणांनी ती जन्माला येत होती. त्यामुळे बहिणाबाईंच्या कवितेत आणि या ग्रामीण कवितेत मूलभूत फरक पडतो. तिची परंपरा वेगळी आहे.

बहिणाबाई ही आजच्या 'आधुनिक' कवयित्रींत बसणारी नाही. ती लोककवयित्री आहे. तिचा संबंध मराठी ग्रामीण लोकगीतांच्या परंपरेशी, संत साहित्यपरंपरेशी आहे, तरीही तिने स्वत्व जोपासले आहे."

१९८२-८३ च्या दरम्यान डॉ. मधुकर वाकोडे यांनी सत्यकथेच्या दिवाळी अंकात बहिणाबाईंच्या कवितेवर एक टिपण लिहिले होते. त्यात त्यांनी बहिणाबाईंची कविता लोकसंचितातूनच आलेली आहे. त्यात बहिणाबाईंच्या प्रतिभेचा वाटा किती ? असा प्रश्न उपस्थित केला होता. वाकोडे स्वतः लोकसाहित्याचे मोठे विद्वान अभ्यासक आहेत. त्यामुळे नंतर अनेकांनी त्यांच्या मतांची गंभीरपणे दखल घेतली. आनंद यादव यांचा पुढील उतारा वाकोडे यांच्या प्रश्नाला उत्तर देणारा आहे.

"बहिणाबाईंच्या कवितेवर लोकगीतांचा व संत-साहित्याचा परिणाम झाला असे म्हटले जाते. ते मान्य करण्यात काही वावगे आहे असे नाही. 'आदिमाया' या कवितेतील कल्पनाविलास जुन्या भारुडांची आठवण करून देतो, तर 'माहेर', 'माहेराची वाट' या सारख्या कवितेतील संकेत व अनुभवांची सरणी लोकगीतातील वाटते. अधून-मधून अशा खुणा पुढेही कुठे कुठे दिसतात. पुष्कळवेळा लोकगीतातील कल्पना, ओळी कमी-अधिक फरकाने येतातही. पण म्हणून काही बिघडत नाही. कारण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बहिणाबाईंच्या कवितेत स्वत्त्वाचा फार मोठा वाटा आहे. 'मराठी' परंपरेतील ती एक लोककवयित्री आहे. हे एकदा नीटपणे लक्षात घेतले की; सगळ्या आक्षेपांचे निरसन होईल असे वाटते.

बहिणाबाईंच्या कवितेला प्रामुख्याने अष्टाक्षरी छंद लाभलेला आहे. तिची बहुतेक सर्व कविता खास मराठी छंदातच अवतरते. 'आखजी' या कवितेला लाभलेला छंद तर मराठी ज्या भाषेपासून जन्मली त्या प्राकृतोद्भव भाषेतून आलेला दिसतो. इतका तो खास मराठी छंद आहे.

ही कविता श्राव्य असल्याने आणि लोकसंस्कृतीचा वारसा जपणारी असल्याने तिच्यात लोकमानस प्रतिबिंबित झालेले आहे. म्हणून लोकमानसाच्या पातळीवरच ती अनुभवावी लागते. कवितेतील व्यक्ति-मनाची प्रतिमात्मक बांधणी, आत्मनिष्ठ, अंतर्मुख व संयत आविष्कार, उत्कट मनाच्या अनेक स्तराची गुंतागुंत इत्यादी कलावादी आधुनिक कवितेची लक्षणे तिच्यात असतीलच असे नाही; सापडले तर योगायोग म्हणावा लागेल.

कवितेत बोलणे हाच बहिणाबाईंचा छंद असल्यामुळे आणि ती जन्मभर त्याच गावात राहिल्यामुळे तिच्या कवितेत एका गावचे त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह संपूर्ण चित्र साकार झालेले आहे. एखाद्या विस्तृत ग्रामीण कादंबरीत एखादे गाव साकार झाल्यावर मनासमोर जे चित्र तेथील व्यक्ती-व्यक्ती संबंध, तेथील निसर्ग, शेती, वर्षभराचे ऋतुमान, सण, रीतीरिवाज, धर्मप्रसंग, घटना जशा आपल्या मनासमोर उभ्या राहतात; तसेच एक ग्रामचित्र बहिणाबाईंची कविता वाचून संपविल्यावर आपल्या मनासमोर ठसठशीतपणे उभे राहते. एवढेच नव्हे तर त्या ग्रामजीवनाचा अन्वयार्थही ती आपल्या तळहातावर आवळ्याप्रमाणे ठेवते. बहिणाबाई ही ग्रामीण वळणाची पहिली भाष्यकार कवयित्री वाटते.

मराठीतील आजच्या ग्रामीण कवींनी तिच्या कवितेचे हे विशिष्ट रूप ध्यानात घ्यावे. ग्रामीण लोकगीत आणि आधुनिकतेने प्रभावित झालेली आजची कविता; यांचा समन्वय साधून बहिणाबाईंच्या कवितेला वाट पुसत पुढे जाता येण्यासारखे आहे. बहिणाबाईनंतर ग्रामीण कविता त्यामुळे अधिक समृद्ध होणार आहे.''

आनंद यादवांचे, बहिणाबाईंच्या कवितेवरचे हे भाष्य आणि ही निरीक्षणे, अनेकार्थांनी महत्त्वाची आहेत. बहिणाबाईंच्या कवितेतल्या छंदाविषयी, समग्र ग्रामचित्रणाविषयी, काव्यदृष्टीविषयी यादवांनी नोंदविलेली मते महत्त्वाची आहेत. बहिणाबाईंच्या कवितेतला गाव एक नसून दोन आहेत. आसोदे आणि जळगाव अशा दोन गावची माणसे आणि शिवार बहिणाबाईंच्या कवितेत आलेले आहे, तरीही यादवांनी काढलेल्या निष्कर्षात काही फरक पडत नाही. कारण महाराष्ट्रातली सगळी कृषिप्रधान गावं सारखीच आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी ग्रामीण कवींचे बहिणाबाईकडे यादवांनी वेधलेले लक्ष तर फारच महत्त्वाचे आहे. पण तसे घडलेले मात्र दिसत नाही.

बहिणाबाईंच्या कवितेच्या झंझावाताने महाराष्ट्र झपाटून गेला. आपल्याकडे कित्ता गिरवण्याचा प्रकार फार असल्यामुळे नंतर जागोजागच्या अनेक बहिणाबाई उगवल्या आणि जिरूनही गेल्या. बहिणाबाईंच्या कवितेचा कोंभ मात्र तरारतोच आहे. तो अस्सल असल्यामुळे त्याला मरण नाही हेच खरे !

भाषेच्या बाबतीत 'संमत' (संस्कृत-मराठी-तमिळ) सिद्धांत मांडणाऱ्या आणि भारतीय मिथ्यांचा मागोवा घेणाऱ्या विश्वनाथ खैरे यांनी 'साहित्य मिथ्य साहित्य' या नावाची चौसष्ट पानांची एक पुस्तिका लिहिली आहे. त्यात एक नवाच विचार खैरे यांनी मांडला आहे. या विचारांची पुष्टी करण्यासाठी खैरे यांनी बहिणाबाईंच्या 'येहरीत दोन मोटा' आणि 'उचलला हारा' या दोन कवितांचा व साप आणि मोट याविषयीच्या बहिणाबाईंच्या कवितेतील इतर संदर्भाचा फार चांगला उपयोग करून घेतला आहे.

या पुस्तिकेच्या शेवटी विश्वनाथ खैरे आणि त्र्यं. वि. सरदेशमुख यांची दीर्घ चर्चा दिलेली आहे. त्यातही बहिणाबाईंच्या कवितेचे संदर्भ आहेत. इथे विश्वनाथ खैरे यांनी बहिणाबाईंच्या कवितेचे वेगळेच आकलन मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि तो आपल्या दृष्टीने फार मोलाचा आहे.

पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख, ज्ञानदेव अध्यासनाचे अध्यक्ष, संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक आणि तुकोबाच्या रक्ताचे वारसदार सदानंद मोरे यांनाही बहिणाबाई महत्त्वाची व तुकारामाच्या परंपरेतली वाटली. 'तुकाराम दर्शन' नावाची एक प्रदीर्घ लेखमाला त्यांनी साप्ताहिक सकाळमधून लिहिली होती. नंतर त्या लेखमालेचे पुस्तक झाले त्याला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. या पुस्तकात पृ. क्र. ५३० वर ते लिहितात,

''बहिणाबाईंच्या कवितेवर वारकरी संस्कृतीचे आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

तुकोबांचे सखोल संस्कार झालेले असल्याचे स्पष्टपणे जाणवते. 'सर्व सुखाचे आगर बाप रुखुमा देवीवर' असे म्हणणाऱ्या ज्ञानदेवांच्या शैलीत 'नांगर नांगर । सर्व सुखाचे आगर' असे त्या सांगून जातात.

येहरीत दोन मोटा दोन्ही मधी पाणी एक
आडोयाले कनाचाक दोन्ही मध्ये गती एक
उतरणी चढणीचे नाव दोन धाव एक

बहिणाबाईंच्या या ओळी 'दो ओठी एक गोठा । दो दांडी एक श्रुती' असे सांगणाऱ्या ज्ञानदेवांच्या अनुभवामृताशी नाते सांगणाऱ्या आहेत. वारकरी संस्कृतीच्या खुणा बहिणाबाईंच्या काव्यात ठाईठाई आढळून येतात. दिंडी व विठ्ठल मंदिरावरील कविता याची उदाहरणे आहेत. तुकोबांनी जाखई-जोखई सारख्या स्थानिक देवतापेक्षा 'बळीया माझा पंढरीराव' असे म्हटले. बहिणाबाईंनी देखील 'कोनोड' सारख्या स्थानिक देवतेपेक्षा 'खरा देवामधी देव पंढरीचा पांडुरंग' असेच म्हटले आहे.

विठोबा हे महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य गरीब शेतकऱ्यांचे दैवत आहे. त्याची भक्ताकडून कशाचीही अपेक्षा नाही. हे बहिणाबाई तुलना करून सांगतात,

सोन्यारुप्यानं मढला मारवाड्यांचा बालाजी
शेतकऱ्यांचा इठोबा पानाफुलामधी राजी
अरे पांडुरंगा तुझी कशी भक्ती करू सांग
तुझ्या रूपा आड येतं सावकाराचं रे सोंग

सावकारावर लिहिण्यासाठी बहिणाबाईंना सामाजिक बांधिलकीचा वेगळा उद्घोष करावा लागत नाही. 'जेवढी जीवनाची प्रचीती, तेवढी कवितेची व्याप्ती' हे साधं सरळ सूत्र आहे. बहिणाबाईंची गाणी ही काही रानावनातली गाणी नाहीत. ती प्राण्यापाखरांची वर्णने नाहीत. पानाफुलांची कौतुके नाहीत. ती अस्सल कविता आहे.''

आता सर्वात शेवटी आपण दुर्गाबाई भागवत यांची बहिणाबाई यांच्या कवितेविषयीची प्रतिक्रिया पाहणार आहोत. त्यांनी ही प्रतिक्रिया फार पूर्वी साधना साप्ताहिकाच्या १९ सप्टेंबर १९५३ रोजी प्रकाशित झालेल्या अंकात व्यक्त केलेली आहे 'बहिणाबाईंची गाणी' हे पुस्तक नुकतेच तेव्हा प्रकाशित झाले होते. आज त्या पुस्तकाविषयी ज्या भावना आहेत, त्या तेव्हा असण्याचे कारण नव्हते, तरी दुर्गाबाईंनी जे भाष्य केले आणि भविष्य वर्तविले ते खरे ठरले आहे. दुर्गाबाईंविषयी काही वेगळे सांगण्याची गरज पडू नये. तेव्हा दुर्गाबाईंनी लिहिलेले आहे,

''आधुनिक मराठी वाङ्मयात कितीतरी वाङ्मयरत्ने आहेत; परंतु त्यातही जिवंत मराठी मनाचे स्पंदन ज्यात स्पष्टपणे जाणवते असे वाङ्मय विरळ आहे. अगदी ठोकळ व मोजकीच उदाहरणे सांगायची झाल्यास. टिळकांच्या गीतारहस्यात विजिगीषु मराठ्यांची ईर्षा दृष्टीस पडते. ज्ञानकोषात डॉ. केतकरांच्या विद्येचा शोध प्रतीत होतो. आपट्यांच्या कादंबऱ्यात सामाजिक जाणीव अतिशय तीव्र संवेदनातून कलात्मक रूप धारण करती झाली आहे. लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांनी तर संस्कारक्षम मराठी मन असे काही रंगवले आहे की त्याला तोड नाही. या पुस्तकांच्या बरोबरीने मानाचे स्थान 'बहिणाबाईंच्या गाण्यां'चे आहे, असे मला वाटते.

'बहिणाबाईंची गाणी' हे किती लहानसे पुस्तक. केवळ नव्वद पानांचे. मोठ्या टाइपात छापलेले. चौतीस गाणी, चौतीस स्फुट ओव्या आणि पाचसहा ओळींत एकेक बसणारी अशी एकोणीस व्यक्तिचित्रे एवढाच काय तो याचा देह. पण हा चिमुकला सुबक देह अमर्याद चैतन्याने रसरसलेला आहे. ज्याप्रमाणे विधात्याच्या सृष्टीतले झाड ऊन, पाऊस, थंडी यांचा मारा सहन करून यातूनच आपले जीवनसत्त्व शोषून घेऊन ठराविक कळी फुलाफळांनी बहरते, अगदी आपोआप बहरते, त्याचप्रमाणे शेतकरी पेशाच्या या निसर्गकन्येचे मन आयुष्यातल्या साऱ्या सुखदुःखांची अनुभूती घेऊन कणाकणातून पुष्पित झाले आहे.''

वरील मजकूर लिहिला तेव्हा दुर्गाबाई विदुषी नव्हत्या आणि बहिणाबाईंना आजचे माहात्म्य नव्हते पण टिळक, केतकर, आपटे, लक्ष्मीबाई यांच्या रांगेत दुर्गाबाईंनी बहिणाबाईंना बसवले आहे. त्यांचे पंचावन्न वर्षांपूर्वीचे हे भाष्य आज खरे ठरले आहे. बहिणाबाईंची कविता आज मराठी संस्कृतीचा अपरिहार्य भाग बनली आहे. ही गोष्ट पंचावन्न वर्षांपूर्वी दुर्गाबाईंनी ओळखिली, हा त्यांच्या द्रष्टेपणाचा भाग आहे.

बहिणाबाईंच्या कवितेविषयी माहितीपर पुस्तके पुष्कळ लिहिली गेली आहेत.. त्यांचा आढावा घेण्याचे काही कारण नाही. त्यात काही नवा आशय मांडलेला नसतो. बहिणाबाईंच्या कवितेचा एखादा नवाच कोपरा उजळणाऱ्यांचीच आपण वर दखल घेतली आहे. ❖❖❖

(लवकरच प्रकाशित होणाऱ्या बहिणाबाईंवरील पुस्तकातून)

इंद्रजित भालेराव

एकनाथनगर, परभणी-४३१४०१ फोन : ०२४५२-२२५५८५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाचले तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

साठोत्तरी ग्रामीण कथा

डॉ. वासुदेव मुलाटे

[सत्तेच्या विकेन्द्रीकरणाने ग्रामसंस्कृती आमूलाग्र बदलली. त्याचे पडसाद ग्रामीण साहित्यातही उमटणे अपरिहार्य होते. ह्या, सुमारे ५०-६० वर्षांतील स्थित्यंतराचा ग्रामीण कथेतून दिसणारा आविष्कारालेख' आणि भवितव्याची चाहूल प्रस्तुत लेखकाने अभ्यासली आहे. त्याचे हे उद्‌बोधक शब्दचित्र... – संपादक]

एखाद्या कालखंडातील साहित्यामधून किंवा त्याच्या विशिष्ट साहित्यप्रकारामधून प्रकट झालेल्या जीवनाचे स्वरूप समजून घ्यावयाचे असते, तेव्हा त्याचे प्रत्यक्ष जीवनातील स्वरूप प्रथम लक्षात घेणे गरजेचे असते. याशिवाय कुठल्याही लेखनाचा विचार करीत असताना ते लेखन ज्या जीवनविश्वाचा आविष्कार करीत असते. त्या जीवनविश्वाचे आकलन लेखकाला कसे आणि कितपत झाले हे पहाणेही आवश्यक असते. विशिष्ट कालखंडात लेखन करणारा लेखकही एका विशिष्ट परिस्थितीत आणि सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक वगैरेच्या पर्यावरणात लेखन करीत असतो. तो स्वतःच त्या पर्यावरणाचा जसा एक साक्षीदार असतो तसाच एक संवेदनशील, सर्जनशील, सृजनशील घटकही असतो. म्हणून भोवतीच्या पर्यावरणाचा त्याच्या आकलनावर, दृष्टिकोनावर परिणाम होत असतो; आणि त्या सर्वांच्या परिपाकातून त्याच्या आविष्काराचे स्वरूप बनत-घडत गेलेले असते. मराठी ग्रामीण कथेच्या संदर्भातही हाच विचार करावा लागतो. ग्रामीण माणसाचे कृषिकेंद्रित जीवन त्याची संस्कृती, त्याच्या भोवतीचा परिसर आणि वातावरण, परिस्थिती या सर्वांमधून त्याचा घडत जाणारा मनःपिंड, परिस्थितीमधून निर्माण होणारे विविधांगी प्रश्न, काळानुरूप घडत गेलेली ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरे आणि परिवर्तन या सर्वांचे यथायोग्य असे आकलन ग्रामीण कथालेखकाला होणे आवश्यक आहे.

सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीच्या रेट्यातून जसा लेखक घडत असतो तशीच त्याची मानसिकताही निर्माण होत असते. लेखकांप्रमाणेच समाजाचीही एक मानसिकता निर्माण होत असते. यासाठी विशिष्ट कालखंडातील प्रत्यक्षातील काही महत्त्वाच्या घडामोडी, सामाजिक, राजकीय, आर्थिक वगैरे उलथापालथी, स्थित्यंतरे, परिवर्तने यांचा वेध घेत साहित्यातील वास्तवाचा शोध घ्यावयाचा असतो. विशेषतः ग्रामीण साहित्य प्रवाहासारख्या जीवनवादी, परिवर्तनवादी साहित्याच्या संदर्भात तर हे आवश्यकच आहे.

१९६० नंतरच्या ग्रामीण कथेतील वास्तवाचा वेध घेताना याच मार्गाचा अवलंब करावा लागतो. यासाठी सर्वसाधारणपणे या कालखंडाचे तीन टप्पे गृहीत धरून हा अभ्यास करणे सोयीचे होईल. ते औचित्याला धरूनही होईल. यातील पहिला टप्पा हा १९६० ते १९७५ या कालखंडाचा समजूयात; तर दुसरा टप्पा हा त्या नंतरच्या कालखंडाचा म्हणजे १९९० पर्यंतचा असेल, तर तिसरा टप्पा हा नंतरच्या काळाचा असेल.

१९६० साल म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळून एक तप उलटून गेलेले होते. कलेच्या अभिवृद्धीच्या-विकासाच्या दृष्टीनेही स्वातंत्र्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण स्वातंत्र्यातच कलेला, तिच्या आविष्काराला अधिक धुमारे फुटतात. १९६० साल आणखी एका कारणाने महत्त्वाचे आहे; ते म्हणजे महाराष्ट्र राज्याची स्थापना. भाषावार प्रांतरचनेच्या धोरणातून मराठी भाषकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. ही घटना मराठी माणसाच्या भाषिक अस्मितेला उजाळा देणारी होती. दुसऱ्या बाजूला शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीतून ग्रामविकासाच्या अनेक दिशा उजळून निघण्याची शक्यता निर्माण करणारा हा काळ होता. लोकशाही आणि सार्वत्रिक निवडणुकांमुळे बहुजनसमाजाला सत्तेतील आपल्या सहभागाची आणि हक्कांची जाणीव झालेली होती. नवे नेतृत्व उदयाला येऊन ते राजकीय पदे व सत्तास्थाने मिळविण्यासाठी धडपडू लागले. पंचायत राज्याच्या माध्यमातून सत्तेच्या विकेंद्रीकरणास १९६२ साली महाराष्ट्रात प्रारंभ झाला. कुळकायद्यासारख्या कायद्याची अंमलबजावणी, विविध लोकोपयोगी योजना, नवे तंत्रज्ञान, पाणीपुरवठा व जलसिंचनाच्या योजना, सहकारीतत्त्वांवर विविध संस्था

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

व पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची निर्मिती, रस्ते-वाहतुकीची साधने यात वाढ झाली. शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामधून छोट्या छोट्या गावीही शिक्षणाची केंद्रे निर्माण झाली. या सर्वांमुळे ग्रामीण जीवनात परिवर्तनाची एक नवी लाट आली. पण त्याच बरोबर काही नवे प्रश्न आणि ताण-तणावही यातून निर्माण झाले. उदाहरणार्थ, सामाजिक न्याय-समता बंधुता यांचे अर्थ हरवून गेले आहेत की काय असे वाटावे अशाही काही दुर्दैवी घटना या काळात घडल्या. त्यातून दलित-शोषित समाजाचा उद्रेक प्रदर्शित होऊ लागला. अशा एका वैशिष्ट्यपूर्ण वातावरणात १९६० नंतरची ग्रामीण कथा अवतरत होती.

या कथेच्या निर्मितीकारांमध्ये जे कथाकार होते ते बहुतांशी बहुजनसमाजातून आलेले व शेतकरी, शेतमजूर, अलुतेदार-बलुतेदार यांच्या घरांतून आलेले होते. ते कथेच्या माध्यमातून त्यांच्याच घरातील दारिद्र्य शोषण आणि त्यापोटी भोगावे लागणारे भोग, जातिव्यवस्था आणि परयंपरागत रूढी-पद्धती यातून निर्माण होणारे ताणतणाव आणि दुःखाचे पाझर यांना शब्दबद्ध करीत होते. अशा लेखकांमध्ये प्रामुख्याने उद्धव शेळके, आनंद यादव, रा. रं. बोराडे, सखा कलाल, द. ता. भोसले, महादेव मोरे, मनोहर तल्हार इ. लेखक होते.

गावगाड्यातील पारंपरिक व पिढीजात चालत आलेले व्यवसाय व उद्योग नवीन संक्रमणाच्या काळात मोडीत निघू लागले. या मोडतोडीत होरपळून निघणारे जीव शहराकडे धाव घेऊ लागले. मिळेल ती कष्टाची कामे तिथे करून उपजिविका करू लागले. या समाजवास्तवाचे आणि दुखऱ्या मनाचे दर्शन उद्धव शेळके यांच्या कथांमधून घडते. 'शिळान अधिक आठ कथा', 'वाणगी' या त्यांच्या संग्रहातील कथा याहष्टीने अभ्यासता येतील. ग्रामीण जीवनातील असहायता, दैवाधीनता, दारिद्र्य भोगण्याची मूकवृत्ती यांचेही प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथांमधून आलेले आहे. ग्राम व्यवस्थेत गरीब-दलित स्त्रियांची अब्रू कशी असुरक्षित असते; किंबहुना ती त्यांच्या चैनीची वस्तू असते; हे प्रखर सत्य त्यांच्या 'दाद' सारख्या कथेतून त्यांनी मांडले आहे. शेळके नुसत्या दारिद्र्याचेच चित्रण करतात असे नव्हे; तर दारिद्र्यातही एकमेकांना जपणारी, त्यांच्यासाठी दुःख करणारी, धीर देणारी, नात्यागोत्याचे बंध जपणारी माणसेही चितारतात. 'ग्रामीण' ही संज्ञा केवळ परिसरावर, भौगोलिकतेवर अवलंबून नाही, तर सबंध जीवनपद्धती, आचार-विचार आणि भाववृत्ती, संस्कृतीवर ती अवलंबून आहे, याचा प्रत्यय त्यांच्या कथा वाचून येतो.

अगतिक, लाचार, निरूद्देश, अर्थशून्य, अत्यंत उपेक्षित जीवन जगणारी माणसे आनंद यादवांच्या कथेतून भेटतात. या माणसांच्या वाट्याला गरीब शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःखभोग आलेले आहेतच; परंतु त्याच्या जोडीला समाजाकडून टिंगलटवाळी, तिरस्कार आणि नियतीने लादलेले वृद्धत्व, पोरकेपण, नपुंसकत्व, खुळेपण, अपंगत्व, वैधव्य अशा प्रकारच्या वेदनाही आलेल्या आहेत. सखोल उत्कट व तरल कष्टमय, दरिद्री ग्रामीण जीवन त्यांच्या कथेतून गोचर होते. 'मोट' आणि 'इंजिन' या दोन भिन्न प्रकृतीच्या कथा असल्यातरी ग्रामीण जीवनातील परिवर्तनाच्या खुणा अधोरेखित करणाऱ्या कथा आहेत. यादवाच्या 'खळाळ' आणि 'मातीखालची माती' या संग्रहातील कथांमधून साकार झालेले ग्रामीण वास्तव ग्रामीण समाज मनाचे प्रतिबिंब दर्शविणारे आहे.

रा. रं. बोराडे यांच्या कथेतून ग्रामीण समूहमनाचे चित्रण येते. समाजात रहात असताना माणसाच्या मनाची कोंडी होते. ते घुमसत रहाते. दुःखी होते; परंतु ज्यामुळे मनाची कोंडी होते, दुःख भोगावे लागते, त्या समाजातून फुटून वेगळे होण्याचे त्याच्या मनातही येत नाही. रूढी, परंपरा, चालीरीती, मानापमानाच्या अनेक पद्धती यामुळे हा कोंडमारा, हे दुःख येते, तरीही ते झुगारून बाहेर पडावे, नाकारावे असे या माणसांना वाटत नाही. वाटले तरी ते प्रत्यक्षकृती करू शकत नाहीत. म्हणून अपरिहार्यपणे आलेल्या दुःखभोगांना झेलीत ते आयुष्य कंठीत असतात. याचे चित्रण त्यांच्या 'नातीगोती' सारख्या कथासंग्रहातील कथांमधून येते. तर स्त्रीमनाच्या घुसमटीचे दर्शनही ते अनेक कथांमधून प्रभावीपणे घडवितात. 'पेरणी', 'भेग', 'उताराची वाट' सारख्या त्यांच्या कथा उदाहरणादाखल सांगता येतील.

सखा कलालांच्या लेखनात विषयवैविध्यही आहे. तशा त्या कुटुंबाच्या कथा आहेत. संसारातील दुःख टिपणाऱ्या त्यांच्या कथेतून मनातील द्वंद्व किंवा अस्वस्थतता अत्यंत सामर्थ्याने टिपलेली दिसते. 'ढग'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

सारख्या त्यांच्या कथासंग्रहातील कथा यादृष्टीने लक्षणीय आहेत.

चंद्रकुमार नलगे यांच्या कथेतून ग्रामीण माणसे, ग्रामीण परिसर, त्या परिसरातील बोली, वातावरण अवतीर्ण होते. 'पंढरीची वाट' ह्या संग्रहातील त्यांच्या कथा ग्रामजीवनातील अंधश्रद्धा आणि दंतकथा यांचा आधार शोधतात.

ग्रामीण जाणीवांची अस्सलता आणि चिंतनशीलता द. ता. भोसले यांच्या कथेतून व्यक्त होते. ग्रामीण स्त्रियांची विविध रूपं आणि त्यांच्या भावसमस्या लक्षात घेण्यासारख्या आहेत. 'अन्न', 'पाळत', 'पाऊस' या संग्रहांमधील त्यांच्या कथा अभ्यासनीय आहेत.

महादेव मोरे यांचे कथाविश्व पूर्वसुरींच्या ग्रामीण कथालेखकांपेक्षा वेगळे आहे. किंबहुना त्यांच्या बरोबरीने लेखन करणाऱ्यांपेक्षाही ते वेगळे आहे. निपाणी आणि निपाणीतील तंबाखूच्या व्यवसायात काम करणारी, राबणारी मंडळी त्यांच्या कथेतून प्रामुख्याने येतात. याशिवाय शेतीच्या आधुनिकीकरणाच्या निमित्ताने आलेले मेस्त्री वगैरेंची चित्रणेही ते रेखाटतात. जोगतिणी, वेश्या व्यवसायातील स्त्रिया, त्यांच्याकडे येणारे पुरुष, राजकारण शिकून बेकार झालेले ग्रामीण भागातील तरुण हेही त्यांच्या कथांचे विषय आहेत.

'बुढीचं खाटलं' या सारख्या कथासंग्रहातून वैदर्भीय ग्रामजीवनातील दारिद्र्यातही एकमेकांना जपणाऱ्या माणसांचे चित्रण त्यांच्या बोलीसह मनोहर तल्हार करतात.

याच अनुषंगाने डोंबारी, भटक्या व आदिवासी यांच्या जगण्याला कथारूप देणाऱ्या चारुता सागरांचाही उल्लेख करता येईल. ग्रामीण परिसरात परंतु गावकुसाबाहेर रहाणाऱ्या दलित माणसाच्या जाणिवा व्यक्त करणारी दलित कथा ही काही मर्यादेपर्यंत ग्रामीण कथाही आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल यांच्या कथांचा विचार या संदर्भात करता येऊ शकेल. १९६२ साली प्रकाशित झालेल्या बाबुराव बागूलांच्या 'जेव्हा मी जात चोरली' या कथासंग्रहातील कथांमधून ग्रामीण वास्तवाचे, तेथील भयाण वास्तवाचे दर्शन घडते. या कथाकारांशिवाय रंगराव बापू पाटील, चंद्रकांत भालेराव, मुकुंद कृष्ण गायकवाड इ. च्या कथाही विचारात घेता येतील..

हा काळ अभिव्यक्तीच्या दृष्टीने नवकथेच्या विकासाचा काळ आहे. अजूनही साहित्याचा वाचकवर्ग शहरी व मध्यमवर्गीय असाच होता. त्यामुळे ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या लेखकांच्या लेखनातून सर्वांगीण असे ग्रामीण वास्तव व्यक्त होऊ शकले नाही. याचे दुसरे कारण असे की, एकूणच साहित्याची निर्मिती ही संपादक-प्रकाशक यांची मर्जी राखीत व मान्यतेसाठी धडपडत केली जात होती. ग्राम-ग्रामीण-ग्रामीणता यांचे मनस्वी भान राखून लिहिता येईल अशी परिस्थिती नव्हती; स्वत्व फार जपता येईल अशी अवस्था नव्हती. ही कोंडी फोडण्याचे कार्य यादव-बोराडे यांनी प्रारंभीच्या काळात केले पण विशेषतः १९७५-७६ नंतर लेखन करणाऱ्या लेखकांनी प्रकर्षाने केले.

१९७५-७६ नंतरच्या काळात ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र आणखी पालटले. १९७२ साली महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळाच्या खुणा पुसता पुसत नव्हत्या. ग्रामीण स्तरावरची जनजीवनासाठी शासन फार आस्थेने काही करीत आहे, असे दिसत नव्हते. शेतीविषयक आणि एकूणच ग्रामीण माणसांविषयीचे औदासीन्य शासन दाखवीत होते. काही ठिकाणी हरितक्रांतीसदृश्य परिस्थिती होती; तर काही ठिकाणी गुरा-ढोरांना आणि माणसांना प्यायला पाणीही नाही अशी अवस्था निर्माण झालेली होती. सहकारी माध्यमातून खेड्यात आलेल्या कारखानदारीने नुसती विषमताच निर्माण केली असे नाही; तर ग्रामपातळीवरचे सारे राजकारण आणि वातावरणच नासून टाकले होते. ज्या शिक्षण संस्था शिक्षणाच्या उद्देशाने निघावयास, चालवावयास हव्या होत्या, त्यांच्या खिरापती वाटून नुसता शिक्षणाचा बाजार मांडला. या शिक्षण संस्थांमधून शिक्षित झालेली तरुण पिढी बेकार अवस्थेत वाटेल त्या दिशेने भरकटत होती. अशा या परिस्थितीत ग्रामीण जीवनाची कोंडी फोडण्याचे प्रयत्न होणे गरजेचे होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठी भाषकांचे वेगळे राज्य झाले खरे; परंतु मुळातच देश स्वतंत्र झाल्यानंतर राजकीय आकांक्षा असणारी मंडळी राजकारणात उतरली. महाराष्ट्रातही हेच घडले. महाराष्ट्राचे शासन चालविणारी सत्ताधारी मंडळी खेड्यापाड्यातून आणि शेतकऱ्यांच्या घरांमधून आलेली होती. त्यामुळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

सामान्य ग्रामीण माणसाचे प्रश्न आणि दुःखभोग त्यांच्या परिचयाचे होते. आता आपले प्रश्न सुटतील असे सामान्य गरीब माणसाला वाटत होते. पण त्याचा भ्रमनिरास होऊ लागला. आम्ही स्वतंत्र आहोत. आपले राज्य आहे. सरकार आपले आहे ही भावना विरत गेली. काळाबरोबर नवेजुने प्रश्न उफाळून येत राहिले. वाढत राहिले. ग्रामपातळीवरचे अनेक छोटेमोठे धंदे आणि व्यवसाय मोडीत निघाले. इलेक्ट्रिक मोटार, ऑईल इंजिन, ट्रॅक्टर आदींच्या आगमनामुळे मजूरवर्ग कमी झाला. दुसऱ्या बाजूने शिक्षण खेड्यापाड्यात व समाजाच्या सर्वस्तरापर्यंत पोहोचल्याने शिकून शिक्षित झालेल्या तरुणांना त्यांना करता येतील असे व्यवसाय आणि नोकऱ्या मिळत नसल्याने बेकारी वाढली. त्यामुळे दारिद्र्यात आणखीनच भर पडली. सत्तेच्या अतिलोभामुळे राजकारण शुद्ध राहिले नाही. जातीपातीचे, गटातटाचे व धर्माचे राजकारण सुरू झाले. यातून जातीयवाद बोकाळला. पुनरुज्जीवनवादी शक्तींनी थैमान घालणे सुरू केले. सामान्य माणसाला साधा न्याय मिळणे अवघड झाले. भ्रष्टाचार वाढला. अत्याचार वाढले. दुष्काळ तर जणू पाचवीलाच पुजलेला होता. भूसंवर्धनाच्या जलसिंचनाच्या, पाटबंधारे व धरणे इ. पाणीपुरवठ्याच्या योजना असूनही दुष्काळावर शासनाला मात करता आली नाही. आपली माणसे सत्तेत असूनही आपले प्रश्न सुटत नाहीत. आपले शोषण थांबत नाही, दैन्य, दारिद्र्य, मानसिक गुलामगिरी, मनाचे गुदमरलेपण संपत नाही असे सामान्य माणसाला वाटू लागले. त्याचा स्वातंत्र्यावरचा विश्वास उडाला. आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आता आपणच काही केले पाहिजे या जाणिवेतून दलित चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासींची चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ इ. लोकचळवळी सुरू झाल्या. या चळवळी साहित्यातही प्रतिबिंबित होऊ लागल्या.

१९७५ ते १९९० च्या काळात मराठी ग्रामीण कथालेखकांची संख्या बरीच वाढली. यातील काही लेखक हे स्वातंत्र्यापूर्वी किंवा लगेचच जन्माला आलेले होते. तर काही स्वातंत्र्याच्या नंतरच्या १५-२० वर्षांच्या काळात जन्मलेले होते. शिक्षणाच्या प्रसारामुळेही लेखनप्रवृत्तीत वाढ झाली होती. योगीराज वाघमारे, बा. ग. केसकर, बाबाराव मुसळे, सोपान हाळमकर, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, रवींद्र शोभणे, रंगनाथ पठारे, श्रीराम गुंदेकर, गणेश आवटी, व बा. वोधे, सुरेश जाधव, शिवाजी मरगीळ, अप्पासाहेब खोत, तानाजी राऊ पाटील, उत्तम बावस्कर, प्रभाकर हरकळ, अनुराधा गुरव, प्रतिमा इंगोले, ललिता गादगे इ. च्या कथालेखनातून उपरोल्लेखित ग्रामीण वास्तव 'कमी अधिक' स्वरूपात चित्रित होत होते. त्याला दिशा देण्याचे कार्य ग्रामीण साहित्य चळवळीकडून घडले. म. फुल्यांबरोबरच राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या वैचारिक अधिष्ठानातून हे लेखक लिहीत होते. खेड्यातील बेकारी, खाजगी सावकारी, राजकारण, धरणग्रस्तांचे प्रश्न, दुष्काळामुळे होणारी होरपळ, शासकीय योजनांमधून घडणारे अपहार आणि माणसाला वंचित ठेवणारी वृत्ती, शैक्षणिक संस्थांमधून चालणारा धुडगूस, सहकारी साखरकारखाने आणि पतसंस्थांमधून घडणारे राजकारण व त्यात पिळला जाणारा शेतकरी इ. चे चित्रण हे लेखक करीत होते. भास्कर चंदनशिव यांचा 'मरणकळा', 'प्रतिमा इंगोले यांचा 'अक्षदीचे दाणे', 'सुगरनीचा खोपा', उत्तम बावस्कर यांचा 'बुजगावणं', गणेश आवटे यांचा 'गणगोत' इ, संग्रहातील कथांमधून समकालीन ग्रामीण वास्तव आणि त्या वास्तवातील प्रश्न, त्याचे स्वरूप यांचा प्रत्यय येतो. या सर्व लेखकांची मानसिकता भोवतीच्या बदलत्या ग्रामीण वास्तवात घडलेली आहे. ते या बदलाचे साक्षीदार आहेत. त्याचे नेटके चित्रण सर्वांनाच करता आले असे नाही. पण काहीच कथांच्या मधून का होईना ते आले आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. १९७५ ते १९९० च्या दरम्यान जे कथानिर्मिती करणारे निर्मितीकार लिहिते झाले; त्यांच्या कथांमधून अशी आत्मचिंतन करायला लावणाऱ्या कथा लिहिल्या जाऊ लागल्या. खरे म्हणजे एखाद्या साहित्यचळवळीने लेखक घडतो का याचे कोणतेही निर्णायक उत्तर देणे अवघड आहे. परंतु चळवळीमुळे निर्मितीला पूरक-पोषक, प्रोत्साहित करणारे वातावरण निर्माण होऊ शकते. १९७५ नंतर अवतरलेल्या ग्रामीण साहित्य चळवळीने काही काळ हे काम निश्चितपणे केलेले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

१९९० नंतरच्या काळात ग्रामीण जीवनाचे चित्र आणखी बदलले. गावातील ग्रामपंचायती पासून ते आमदार-खासदारांपर्यंतच्या निवडणुका, गावातील सहकारी पतसंस्थापासून ते जिल्हाराज्य स्तरावरील सहकारी बँका, बाजारसमित्या, सहकारी साखरकारखाने यांच्या निमित्ताने वारंवार निवडणुका लादल्या जाताहेत. परस्परांचा बदला घेण्याची वृत्ती वाढीस लागली. नेते येनकेन प्रकाराने सत्ता बळकावतात; पण सामान्य माणसाला अपेक्षाभंगाशिवाय काहीच मिळेनासे झाले. भौतिक बदलाचा विचार करायचा झाला तर खेड्यापाड्यातून दळणवळणाची साधने वाढली. शहराजवळ असलेल्या खेड्यांच्या बाबतीत तर हे अधिकच जाणवते. कारण एस.टी. बरोबरच खासगी जीप्स, रिक्षा इ.च्या माध्यमातून अवैध वाहतुक म्हणता येईल अशी वाहतुक वाढली; आणि घोडा, बैलगाडी, टांगे वगैरे पारंपरिक वाहतुकीची-प्रवासाची साधने यांचा फारसा वापर दिसेनासा झाला. मात्र या यांत्रिक वाहतुकीच्या सोयीमुळे निदान शहराजवळच्या खेड्यातील माणसांचा शहराशी दररोज संबंध येऊ लागला. वेशभूषा, केशभूषा इ. बाबतचे शहरी माणसांचे अनुकरण वाढले. ग्रामीण उद्योग केव्हाच बंद झाले होते आणि बलुतेदारी जवळ जवळ संपलीच. कारण ग्रामीण कुटिरोद्योगांवर आणि बलुतेदारांच्या उद्योगांवर नागर संस्कृतीचे आक्रमण वाढले. वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही. यासारखी प्रसारमाध्यमे खेड्याखेड्यातून पोहचली. शेतीत यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आणि गुराढोरांचा बारदाना कमी झाला. धरण, कालवे यांची संख्या वाढली. गावागावातून नळाच्या माध्यमातून पाणीपुरवठा होऊ लागला.

दूध-संस्था, सहकारी साखर कारखाने, पाणी पुरवठ्याच्या योजना यांचा परिणाम अगंतुक श्रीमंती येण्यात झाला. श्रीमंती आली; पण माणुसकी हरवली अशी अवस्था झाली. शेतीच्या मालाचे भाव, धरणग्रस्तांचे प्रश्न, शिक्षणामुळे वाढलेल्या सुशिक्षितांची संख्या आणि त्यांना मिळणाऱ्या नोकऱ्या किंवा करता येऊ शकणारा उद्योग यांचे व्यस्तप्रमाण, पसरत चाललेली व्यसनांधता, करावा लागणारा आत्मसंघर्ष इ. प्रश्न आजच्या ग्रामीण माणसासमोर आहेत.

या पार्श्वभूमीवर १९९० नंतरच्या काळातील ग्रामीण कथेचा विचार करावा लागतो. या दशकातील ग्रामीण कथा निर्मितीकडे बघितले तर असे दिसते की, १९६० च्या आसपास जी ग्रामीण साहित्यिकांची पिढी कथालेखन करीत होती, त्यातील बहुतेक आघाडीच्या लेखकांचे कथालेखन या काळात थांबलेले आहे. अर्थात् याला काही अपवादही आहेत. अशा अपवादात्मक लेखन करणाऱ्या लेखकांत रा. रं. बोराडे, मनोहर तल्हार यांच्या कथा लेखनाचा उल्लेख करता येईल. 'कडबा आणि कणसं' हा बोराडे यांचा ग्रामीण कथांचा संग्रह १९९४ मध्ये प्रसिद्ध झाला. परंतु हे ही खरे की या संग्रहातील 'पोतेरा' ही कथा सोडली तर बाकी सर्व कथा आधीच्या काळात लिहिलेल्या आहेत. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखान्याच्या रुपाने एक मोठा उद्योगच उभा रहात असतो. अनेक अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना काम देण्याचे कार्य साखर कारखान्याच्या माध्यमातून घडत असते. याचा फायदा त्या परिसरातल्या बेकारांना काम मिळण्यानसाठी व्हावा; ही अपेक्षा करणे चुकीचे ठरणार नाही. दुसऱ्या बाजूला शिक्षणाचे लोण खेड्यापाड्यात आणि समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचले; परंतु सर्व नवशिक्षितांना नोकऱ्या कशा मिळणार ? स्वतःचा उद्योग काढण्यासाठी जवळ अर्थबळ नाही. अशा परिस्थितीत नोकरीशिवाय पर्याय उरत नाही. एरव्हीही कोरडवाहूशेती, वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे करणे परवडणारी उरलेली नाही; आणि न परवडणारी शेती विकून टाकावी आणि एखादा छोटा-मोठा व्यवसाय करावा अशीही मानसिकता ग्रामीण माणसांची होते आहे. अशाच ग्रामीण सुशिक्षित तरुणाला नोकरी करणे अधिक बरे वाटत असेल तर नवल नाही. अर्थात् आपल्याच परिसरातील अशाच एखाद्या रोजगार पुरविणाऱ्या साखर कारखान्यात नोकरी लागली तर आनंदाचीच बाब वाटेल. पण सहकारी साखर कारखान्यांसाठी सहकार क्षेत्रातील पदाधिकारी आपल्या राजकारणासाठी करून घेतात; आणि राजकारणातली मंडळी वरची किंवा मोठी सत्ता मिळविण्यासाठी या आपल्या तरुण सुशिक्षित बेकारांचा गैरव्यवापर करतात. त्यांना खोटी प्रलोभने दाखवितात व शेवटी त्यांची फसवणूक करतात; हे चित्र आता नवे नाही. ग्रामीण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

जीवनात जी वेळोवेळी परिवर्तने आली. ज्या नव्या नव्या समस्या निर्माण झाल्या, त्यांचे चित्रण बोराडे आपल्या कथेतून करीत असलेले दिसतात. 'पोतेरा', सारख्या कथेतून किंवा 'कडबा' आणि 'कसणं' या संग्रहातील सर्वत्र कथांमधून हेच जाणवते. म्हणजे शेती, शेतीचे बदललेले स्वरूप, तिच्या उत्पन्नाची अनिश्चितता, शिक्षण घेऊनही बेकारी वाट्याला आलेल्या तरुणांची अवस्था, स्वार्थासाठी सहकार आणि राजकारण, तेथील सत्ता यांचा गैरवापर इ. नव्या समस्या या निमित्ताने समोर आल्याचे दिसते. ग्रामीण माणूस मोठा होऊन आपल्याच माणसाचे शोषण करू लागलेला दिसतो. 'कॅन्सल' या १९९४ सालीच प्रकाशित झालेल्या मनोहर तल्हारांच्या कथासंग्रहातील कथांमधून सर्वसामान्य दरिद्री माणसांच्या ताणतणावे आणि भावबंधाचे दर्शन घडते. 'अतूट' सारख्या त्यांच्या कथेतून ग्रामीण मुस्लिम कुटुंबातील कौटुंबिक तणाव, कलह आणि भयावह दारिद्र्यातही एकमेकांच्या अतूट प्रेमाचे प्रत्यंतर येते. मराठी ग्रामीण कथेत असे चित्रण यापूर्वी अभावानेच आलेले आढळते.

ग्रामीण तरुण शिकला, शिकून सुशिक्षित झाला, परंतु गरिबीत ज्या आईबापांनी पोटाला चिमटा घेऊन शिकविले; त्यांनाच तो विचारीनासा झाला. आणि मग उराशी बघितलेली स्वप्ने भंगल्याचे दुःख त्यांच्या वाट्याला येऊ लागले. साठोत्तरी लेखकांच्या पिढीनंतर १९७५-८० च्या दरम्यान जी कथानिर्मिती करणारे निर्मितीकार लिहिते झाले त्यांच्या कथांमधून अशी आत्मचिंतन करावयाला लावणाऱ्या कथा लिहिल्या जाऊ लागल्या. १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण साहित्य निर्मितीला पूरक, पोषक व प्रोत्साहित करणारे वातावरण निर्माण केले होते यात संशय नाही. १९९० दरम्यानचा काळ हा ग्रामीण साहित्य चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ होता, असे म्हणावे लागेल. या काळातच शरद जोशींची शेतकरी चळवळ जोरात होती. लेखनक्षमता निर्मितीक्षमता असलेल्या लेखकाने त्याच्या भोवतीचे वर्तमान साहित्याच्या माध्यमातून साकार करणे स्वाभाविक आहे. एकीकडे वारंवार येणारा दुष्काळ, वाढलेली बेरोजगारी, बागायती पिके फायदेशीर ठरतील म्हणून अशी पिके घेणारा शेतकरी, त्याच्या मालाला योग्यभाव मिळावा म्हणून शेतकरी संघटनेच्या माध्यमातून संघर्षाला सिद्ध होतो. असेही एक चित्र या काळात ग्रामीण भागात उभे राहिलेले दिसते, की आपले गाव, आपले घर, आपले कुटुंब आपण हरवून बसलो आहोत. जगदीश कदम यांची 'लिव्हणं' ही कथा, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'रक्त आणि पाऊस' या संग्रहातील याच शीर्षकाची कथा, किंवा भास्कर चंदनशिव यांच्या अंगारमाती या संग्रहातील 'लालचिखल' सारखी कथा अशा प्रश्नांना हात घालतात. या सर्व कथा १९९० ते २००० या दशकाच्या पहिल्या चरणात प्रसिद्ध झालेल्या आहेत. याच काळात बाबाराव मुसळे यांच्या 'मोहरलेला चंद्र' या कथासंग्रहातील 'सरकारी हिशोब' सारख्या कथेत जनतेचे रक्षक असलेले पोलीसच ग्रामीण माणसाच्या इज्जतीवर आक्रमण करीत आहेत याचे चित्र रेखाटले आहे. राजकारणासाठी सामान्य, गरीब, मजुरी करणाऱ्या लोकांना कधी प्रेमाने तर कधी धाकधपटश्या दाखवून मोर्चे, मिरवणुका, सभा यांच्यासाठी वापरले जाते हे सत्य आता लपून राहिलेले नाही. सामान्य ग्रामीण माणसाला

हार्दिक आभार !

मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २रा भाग १ व २ या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी श्री स्वामी समर्थ अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, पुणे यांनी रु. ३,००,०००/- (तीन लाख) अर्थसाहाय्य दिले त्याबद्दल संस्थेच्या विश्वस्तांची म.सा.परिषद ऋणी आहे. यासाठी म.सा.प.चे कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७वा भाग १ साठी मे. चितळे बंधू मिठाईवाले या संस्थेचे श्री. रघुनाथराव चितळे यांनी रु. ३,००,०००/- (तीन लाख) अर्थसाहाय्य केले. त्यासाठी डॉ. कल्याणी दिवेकर यांनी विशेष प्रयत्न केले.

श्री स्वामी समर्थ अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान आणि श्री. रघुनाथराव चितळे यांचे म.सा. परिषद मनापासून आभारी आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

यात जास्तीत जास्त प्रमाणात वापरले जाते. त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीचे आमीष दाखवूनही त्याला नेले जाते आणि शेवटी त्याच्या वाट्याला येते ते वैफल्यच. 'दाही दिशा' या रवींद्र शोभणे यांच्या १९९४ साली प्रसिद्ध झालेल्या संग्रहातील 'मोर्चा' ही कथा यादृष्टीने लक्षणीय आहे.

ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात आणि विशेषतः ग्रामीण कथेच्या क्षेत्रात स्त्रियांचे लेखन फारच कमी आहे. अनुराधा गुरव, प्रतिमा इंगोले, ललिता गादगे, मथु सावंत अशा काही हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढ्याच लेखिका लेखन करताना दिसतात. 'दुःख आणि अश्रू' हा ललिता गादगे यांचा कथासंग्रह. स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा कितीही गाजावाजा केला तरी ही चळवळ अजूनही ग्रामीण कष्टकरी, अशिक्षित स्त्रियांपर्यंत फारशी पोहचू शकली नाही आणि परिणामतः तिथे आजही स्त्री एक अबलाच राहिलेली असून तिला नवरा किंवा सासू-सासरे, दीर-नणंदा यांच्याकडून निमूटपणे छळ सोसावा लागतो; आणि असह्य झाले की आत्महत्येशिवाय पर्याय उरत नाही. 'सोडवणूक' ही ललिता गादगे यांची कथा हेच सांगते. 'हजारी बेलपान' किंवा 'अक्षदीचे दाणे' या प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील कथांमधूनही अनेक दबलेल्या ग्रामीण स्त्रियांचे निश्वास आणि हुंदके ऐकायला मिळतात. त्यांच्या कथेतील ही स्त्री परंपरेत रखडणारी, समाज आणि नियती यांच्यामुळे दुःखभोग वाट्याला येणारी व जगण्याच्या संघर्षात एकाकीपणे उभी राहणारी स्त्री आहे. 'उचल' हा श्रीराम गुंदेकर यांचा कथासंग्रह याच काळातला. ग्रामीण भागात अजूनही बेकायदेशीरपणे चालणारी सावकारी आणि अत्यंत मजबूर होऊन तिला बळी पडणारा श्रमिक माणूस. यातून चालणारी वेठबिगारी यांचे दर्शन तर या संग्रहातील कथामधून घडतेच, पण मोठमोठ्या थोर पुरुषांच्या नावाने किंवा आपल्याच घरातल्या जिवंत-दिवंगत व्यक्तींच्या नावाने स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांमधून नेमणुकांच्या नावाखाली गरीब, होतकरू व हुशार उच्चशिक्षित बेकार तरुणांची कशी घुसमट करतात हे गुंदेकर मांडतात. 'हेलपाटा'सारख्या 'जुलूम' कथासंग्रहातील कथेतून शिवाजी मरगीळ यांनी ग्रामीण माणसाची विशेषतः शेतकऱ्याची शासकीय अधिकारी कशी अडवणूक करतात हे अधोरेखित केले आहे. 'लचांड' आणि 'उठावण' ह्या १९९४ साली प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहातील कथांमधूनही सदानंद देशमुखांनी बदलत्या ग्रामीण वर्तमानाची दखल घेतली आहे. सर्व पातळीवर गाव कसा बदलला आहे याचे दर्शन ग्रामपंचायत, सहकारी सोसायट्या, खरेदी-विक्री संघ, शिक्षण संस्था यांच्या माध्यमांतून हे दाखवून नेतृत्व आपल्याच माणसाचे कसे शोषण करतात याचे अत्यंत वास्तववादी व प्रभावी चित्र ते आपल्या कथांमधून रेखाटतात. एवढंच नाही तर धर्मकारण, राजकारण आणि अर्थकारण यांनी ग्रामीण भागात घातलेला धुडगूस, परिवर्तनाबरोबरच ग्रामपातळीवर निर्माण झालेले प्रश्न, नव्या समस्या, अडचणी यांचे व्यामिश्र, जटिल आणि गुंतागुंतीचे स्वरूप बायकांच्या लक्षात आणून देतात. एकूण खेडी बदलली, बदलत आहेत. हा बदल भौतिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवरचा जसा आहे; तसाच मानसिक पातळीवरचाही आहे; हे ते दाखवून देतात. कुटुंबाच्या विभक्तीकरणाचे लोण खेड्यापाड्यातही कसे पोहचले आहे; आणि त्यामुळे माणसांची मने विभक्त होऊन आपल्याच नात्यागोत्यातल्या माणसांचाही माणसे कसा दुस्वास करतात, हेही 'चिरोटी'सारख्या त्यांच्या कथेतून व्यक्त झाले आहे. खेड्यातील श्रमजीवी, भूमिहीन माणूस, सर्वहारा माणूस शेतीतल यंत्र प्रवेशाने अगतिक बनला. जणू त्याच्या स्वतःच्या घामावरही त्याचा अधिकार उरत नाही असे सत्य बाल्मोहन, आहलिंगे यांच्या 'अस्वस्थ' या कथासंग्रहातील 'मोळीवाला' शीर्षक असलेल्या कथेतून रेखाटतात. भास्कर बडे यांनी 'चिकाळा' या कथा संग्रहातील कथांमधून शेतीव्यवसाय हंगामी स्वरूपात करणारी व मजूर म्हणून सहकारी कारखान्यात काम करणाऱ्या माणसांचे दैन्य, भोग आणि होणारा मानसिक कोंडमारा, त्यांच्या मनाचे दुभंगलेपण यांचे चित्रण केले आहे. संजय ठोकळ या लेखकाने एका वेगळ्याच परिप्रेक्ष्यातून ग्रामीण जीवन टिपले आहे. खेड्याचा विकास जसजसा होऊ लागला; तसतशी तेथील बलुतेदारी नष्ट होऊ लागली. गावातला सुतार, चांभार, लोहार, कुंभार इ. च्या वाट्याला त्यामुळे बेकारी आली. संजय ठोकळ यांनी त्यांच्या 'आभाळाचे हात' या कथेत या सर्वांचे मोठे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. 'नकोशी' ही त्यांची एक कथा जरी अभ्यासली तरी आपल्याला याचा प्रत्यय येतो. प्रकाश मोगले यांचा १९९९ साली प्रसिद्ध

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

झालेल्या 'कावस' या संग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी आत्मभान आलेला ग्रामीण माणूस आपल्याच समाजाचे कसे शोषण करतो हे आत्मपीडेतून व मोठ्या धाडसाने रेखाटले आहे. २००० साली प्रकाशित झालेल्या 'इस्कोट' कथासंग्रहातील कथांमधून वरकरणी शांत दिसणारे ग्रामीण जीवन आतून कसे विलक्षण धुमसते आहे, याचे दर्शन उत्तम बावस्कर घडवितात. त्यांना मुळातच ग्रामीण माणसाच्या शोषणावर उभी असणारी ही व्यवस्था आता भ्रष्टाचाराने पुरती सडून गेलेली आहे, हे सांगावयाचे आहे. पारंपरिक ग्रामीण मानसिकता आणि नव्याने येऊ घातलेले बदल यातून येथल्या गरीबांचा आणि दलितांचा प्रत्यही बळी जात आहे. जणू प्रत्येक खेडे म्हणजे एक कुरूक्षेत्र बनले आहे. या कुरूक्षेत्रावर रोज कित्येक जण धारातीर्थी पडत आहेत. तर काही या कुरूक्षेत्राच्या भयप्रदतेची झळ लागून स्वतःचे जीवन स्वतःच संपवीत आहेत. तर कित्येक त्यापासून पळून जाऊन शहरात राहात आहेत. पण तेथेही ते रूजत नाहीत. अन् खेड्याशी त्यांची असलेली नाळही तुटता तुटत नाही. एक असहाय्य घुसमट त्यांच्या जीवनात निर्माण होते. अशा घुसमटीत सापडलेल्या आणि या कुरूक्षेत्रावर लढणाऱ्या, प्रसंगी धारातीर्थी पडणाऱ्या माणसाची कथा उत्तम बावस्कर यांनी ताकदीने उभी केली आहे. खेड्याच्या उद्ध्वस्त वास्तवाचा विलक्षण आविष्कार त्यांच्या कथेतून घडत जातो.

या कथाकारांशिवाय बाबा भांड, वसंत केशव पाटील, ग. पी. मनूरकर यांनीही जुने व उद्ध्वस्त होणारे खेडे. त्यांच्या कथांमधून चितारले आहे. विलास सिंदगीकर, आनंद कददम, गेणू शिंदे, राजेंद्र गहाळ, विजय जावळे, नागनाथ पाटील, भरत काळे, अशोक कौतिक कोळी, कृष्णा खोत, राजेंद्र भोसले ही नव्या दमाची कथाकार मंडळी आजचे ग्रामीण वास्तव मोठ्या उमेदीने साकार करीत आहे. यात आसाराम लोमटे यांच्या कथेचा आवर्जून निर्देश केला पाहिजे. 'इडा पिडा टळो' हा त्यांचा बहुचर्चित ग्रामीण कथांचा संग्रह लक्षणीय आहे. जागतिकीकरणाचे पडसाद ग्रामजीवनात उमटत आहेत. त्याच बरोबर तेथील मूळ प्रश्नही तसेच आहेत. प्रश्नाचे स्वरूप तेवढे बदलले आहे. यातून निर्माण झालेल्या जीवन संघर्षाचा लोमटे सरळ वेध घेतात. वर्तमान ग्रामीण जीवनातील सकारात्मक बदलही लोमटे आपल्या कथेतून टिपतात. शेतकऱ्याला आत्महत्येपर्यंत घेऊन जाणारी व्यवस्था बदलायची असेल तर त्याला स्वतःलाच या दिशेने संघर्षाला सिद्ध व्हावे लागेल; याची जाणीव ते कथेतून सूचित करतात. शेतकऱ्यांचे शोषण हे कुणा एकाला थांबविता येणार नाही. त्यासाठी सर्व शोषणग्रस्तांचीच मने पेटून उठली पाहिजेत असा हा विद्रोहाच्या दिशेने वळणारा स्वर त्यांच्या कथेतून उमटतो आहे. एकूण ग्रामीण कथेच्या विकासटप्प्यावर पोहचणारी ही कथा आहे. आणखीही काही ताज्यादमाच्या ग्रामीण कथेविषयी त्यात उमटणाऱ्या वास्तवाच्या प्रतिबिंबाविषयी सांगता येऊ शकेल.

खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, सेझ यामुळे एकूण ग्रामीण जीवनात कल्लोळ माजवणारे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांना हात घालणारी कथा भविष्यात निर्माण होईल असे समजूयात. मात्र एकूण साठोत्तरी ग्रामीण कथेचा विचार केला तर असे दिसते की, बदललेल्या, बदलत चाललेल्या ग्रामीण जीवनाचे प्रश्नही बदलत चालले आहत. नवनवीन समस्या निर्माण होत आहेत. या सर्वच प्रश्नांना भिडण्याचा आजचा ग्रामीण लेखक करतो आहे. तो स्वतःसाठी चिंतन करतो आहे आणि वाचकांना चिंतन करावयाला प्रवृत्त करतो आहे. हा ग्रामीण कथालेखक परिवर्तनाचा अर्थ शोधू पहातो आहे. त्याचबरोबर ग्रामीण परंपरा आणि समाजरचना यांचा वेध घेतो आहे. शोषणाच संदर्भ तपासून बघतो आहे. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, म. विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रकाशात ग्रामीण जीवनाचा अन्वयार्थ लावू पहात आहे. जीवनमूल्यांच्या दृष्टीने, शोषणाच्या अनुरोधाने एकूण जीवनाचीच पुनर्मांडणी झाली पाहिजे असे त्याला वाटते आहे. म्हणजे एका अर्थाने ग्रामीण कथेचाच नव्हे तर एकूण ग्रामीण साहित्याचाच हा निर्माता असलेला लेखक सांस्कृतिक पुनर्मांडणी करतो आहे; असे म्हणावे लागेल.

❖❖❖

डॉ. वासुदेव मुलाटे
'अक्षर', ८५८ सह्याद्रीनगर, एन-५ सिडको,
औरंगाबाद - ४३१ ००३.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

कृषि-संस्कृती : 'गावाच्या आकाभोवती' निमित्ताने

डॉ. किसन पाटील

[कृषि-संस्कृतीतील लोकतत्त्वीय धारणांचा आविष्कार शब्दबद्ध करणारी प्रकाश किनगावकर यांची ''गावाच्या आकाभोवती'' ही कविता बोलीच्या सशक्त माध्यमातून प्रकट झाली आहे. ग्रामजीवन आणि लोकतत्त्वाचा अनुबंध जोडणारी ही कविता सदाहरित आहे. – संपादक]

ग्रामीण खेडे म्हणजे 'पांढरी' आणि 'काळी' यांच्या परिघात वसती करून असलेली कृषीवलांची संस्कृती. ही ग्रामीण खेड्याची खळ्या-मळ्याची, शेता बांधाची, वावर-आखराची, निंदण-टुपणाची, वखर-नागरची, मोट-नाड्याची, कामकाजाची एक स्वतंत्र लोकतत्त्वीय भाषा असते. या बोलीचा आपला कर्मसंस्कृतीचा प्रांजळ जीवन व्यवहार असतो. अन्न, वस्त्र, निवारा या सोबतच या खेड्यानं जपलेला आपला स्वतःच्या अस्मितेचा शोध आणि सुख-दुःख, दारिद्र्यासह शोषितांची सोशिकता जोपासून जगण्याचा आत्मबोध ही असतो. गावाचा आक म्हणजे 'पांढरी' आणि त्या आकाभोवती फिरणारं चाक म्हणजे 'काळी'. असा परीघ म्हणजे विविध ताण्याबाण्यांनी विणलेली कृपी संस्कृती ! कवी प्रकाश विठ्ठल किनगावकर यांची 'गावाच्या आकाभोवती' या कवितासंग्रहातील कविता या कृषीसंस्कृतीच्या परिघातील अनुभवांची, कृषीनिष्ठ जाणीवांसह भोगलेल्या-सोसलेल्या दुःखाची, बालपणीच्या निरागस भावासह जाणतेपणीच्या सोशिकतेची, सहज-सुलभ परंतु उपमेय, उपमानांची मांडणी करीत जाणारी, बोलीनिष्ठ निवेदनाची सरळसोट निर्मिती आहे. या कवितेचं वैशिष्ट्यच मुळात कळ काढून, खूप विचारांती, संयमशील, भोगलेल्या अनुभवाचं सेंद्रीय रसायन संतृप्त होईपर्यंत वाट पाहून लिहिण्याचं बळ आल्यावर अभिव्यक्त करण्याची प्रेरणा हेच आहे. त्यासाठी 'कित्येक दिवसांपासून' कवीच्या मनाची भुसभुशीत जमीन कोऱ्या कागदांसारखी ग्रीष्मातल्या उन्हानं करपलेली आहे. बैलगाडीच्या चाफरी (चाकोरी) सारखा कागदावरचा समास, प्रवासाची वाट पाहून कोरड्या जमिनीत केलेली धुळपेरणी, यांचं नातं कवीच्या काव्यनिर्मितीशी जवळचं वाटते. या कवितेची नाळ समाधान मानणाऱ्या शेतकऱ्याच्या मनाशी-जीवनाशी आहे. कष्ट करण्याची, श्रम संस्कृतीच्या मेहनत मशागतीची जाणीव हीच कवितेच्या निर्मितीच्या जाणीवेशी कालतत्त्वीय नातं जोपासते. 'कित्येक दिवसांपासून' या रसरसलेल्या निर्मितीसाठी, आपल्या आत्मनिष्ठ आविष्काराला साकार करण्यासाठी कळ काढत कवीने या 'गावाच्या आकाभोवती' आपलं सर्जनशीलतेचं नातं घट्ट रूजवून घेतलं आहे.

''आता पावसाची सर येईल
अन् रेघांना पालवी फुटेल शब्दांची
तोपर्यंत
बांधावरच्या तुरळक गवताकडे पाहून
समाधान मानणाऱ्या शेतकऱ्यासारखं
मला कळ काढणं भाग आहे.'' (पृ. १)

या 'कळ काढण्याच्या' सोशिकतेला पिढ्यान्‌पिढ्यांची परंपरा आहे.

'आजीच्या गोष्ट सांगण्याची : तणाळ वावर, कोळपून दुखणारे खांदे, निंदून अलवार झालेली बोटं, कष्ट कष्ट उपसणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिढ्यांची ही कहाणी दुःखाची परंपरा सांगणारी आहे. नित्य 'कायपात' म्हणजे कामाची घाईगर्दी-धबडगा, म्हणजेच लगीन घाई असलेलं शेतकऱ्याचं जीवन. इकडे बापाचा शेतीची मशागत करण्याचा 'कायपात' तर तिकडे मुलाचा शाळेच्या तयारीसाठी 'कायपात' चाललेला. बापाची जमिनीची मशागत- फुटलेल्या पाटीला कोळशानं घासून काळीकुट्ट करण्याची मुलाची धडपड. पेरणीसाठी पांभर, पासा, खुरपे अवजारांची तयारी- पेन्सिलींना टोक करणारा मुलगा. तालुक्याला अनवाणी बियाणं शोधण्याची 'कायपात'- बाजारात पुस्तकांचा तपास करणारा मुलगा. आजीची घरातलं जुनं बियाणं शोधण्याची 'कायपात'- मुलगा जुन्या वह्यांतील कोऱ्याकागदांतून नवी वही टाचण्याची कसरत करण्यात गुंतलेला. ही 'कायपात' पिढ्यानंपिढ्या चालू आहे. परंतु त्याला मिळणारं फळ मात्र तितकसं चोख नाही. बारोमास 'कायपात' ही जणू शेतकऱ्याच्या कुळाला पुजलेली कष्टाची परंपराच आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

शेतात कष्टाशिवायही अनेक बिकट प्रसंगांना सामोरं जावं लागते. शुभ्र मिशांचं जाडजूड जनावर म्हणजे मोठ्ठा 'नाग' राहातो शेतात. हे नागाचं मिथक 'वाघूर' या कवितेतून साकारते. तो पूर्वज असा आजीचा विश्वास. त्याबाबत कवीच्या भावना नव्यापिढ्याचा हुंकार वाटतो.

आता अजून किती काळ
अडकून रहावं आम्ही तिच्या शब्दात
जसं निपचित पडावं मेंढरानं वाघूरात ? (प. ६)

बकऱ्या-मेंढ्यांना कोंडवून ठेवण्यासाठी जो वाडा म्हणजे कोंडवाडा केला जातो त्याला 'वाघूर' म्हणतात. परंपरेचा आणि परिवर्तनशील नवविचारांचा हा भावनिक संघर्ष या प्रतिमेतून व्यक्त होतो. कोंडमारा, मनाची विवशता आणि ग्रामसंस्कृतीच्या अंतर्गत चाललेली घुसमट जणू या कवितेतून अत्यंत संयमशील रीतीने उपमेच्या भाषेतून व्यक्त होते. दोनपिढ्यांचा संघर्ष हा अखिल मानवजातीच्या पारंपरिक आणि नवपरिवर्तनशील वृत्तीचा संघर्ष ठरतो. 'शिकवण' कवितेतून बापाची करडी नजर, आवाजातील दहशत ही परंपरेची शिकवणूक तर बापाशी सूड उगवावा म्हणून पक्षी पिंजऱ्यात कोंडणारी नवी पिढी ही कवीची पिढी आहे. पक्षांना कवीनं दिलेली शिकवण स्वतःवर उलटते.

पण त्यांना शिकवता शिकवता
मी म्हणू लागलो जेव्हा मिठू मिठू
तेव्हा माझ्या लक्षात आले
पक्षी पिंजऱ्याबाहेर अन् मी पिंजऱ्यात आहे. (पृ. ७)

नियतीचा खेळ अजबच असला तरी प्राणी-मानव हे तिचं बाहुलं आहे. तसा शेतकरी दैववादी असूनही कर्माचे भोग भोगणारा, राबराब राबणारा कर्मयोगीही आहे. शेतीभातीचा अन् त्याचा हा युगायुगांचा प्रवास गावागावातून आपल्याच परिघात कसा चक्रव्यूहात अडकला आहे. याचं सहज, उत्स्फूर्त परंतु चिंतनशील भाष्य 'गावाच्या आकाभोवती' या काव्यसंग्रहातून प्रकट होते.

'दोखा' हे कोडं आहे जमिनीच्या अंगावरचं न मिटणारं, मायच्या लुगड्यासारखी दिवसेंदिवस विरत जाणारी 'वडांग' या शीर्षकातून नापीक जमीन आणि तकलादू कुंपणातील अस्थिर शेतकरीजीवन याचं सहजचिंतन व्यक्त होते. 'घिरट्या' मधील त्याच त्या परिघात जीवन जगणारी पाखरं, 'कुणब्याच्या घरात' वावरणाऱ्या पोरांची आणि माय-बापांची होणारी आंतरिक घालमेल, ग्रामजीवनाच्या वास्तवतेचं भयावह आणि वृत्तीप्रवृत्तींसह अचूक वर्णन करताना कवीच्या आत्मनिष्ठ आत्मानुभूतींचं चित्रण आहे. 'कुणबी दिवाळीत शहाणा होतो' यातून शेतकऱ्याच्या अपुऱ्याज्ञानाचं आणि ढिसाळ व्यवस्थापनाचं चित्र उभं राहाते. भावनाशील शेतकरी बापाच्या रूपानं उमेदीसह काबाडकष्ट करतो. खूप पीक यावं, भरपूर उत्पादन मिळावं, आपलं दारिद्र्य निघून जावलं अशा आशावादीवृत्तीनं साकारतो. 'बापाला वाटतं' ही भावविवश आशावादी कष्टकऱ्याची जीवनजाणीव आहे. 'वारस' कवितेतून बापाच्या मुलाकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त होतात. ऐतखाऊ साहेबगिरी करणारा मुलगा जोपर्यंत बापाची शेतीची सर्व कामं नीटपणे करू शकत नाही; तोपर्यंत वारस होऊ शकत नाही. शेतकऱ्याची मुलं शिकून मोठी झाली. काही प्रमाणात आपला वारसा विसरली. हे ग्रामीण दोन पिढ्यातलं द्वंद्व नेमकंपणानं किनगावकर व्यक्त करू पाहतात. मायची गोष्ट, बांगडी बिल्लोर, भातकूल, विंचू, विस्तू, चिंधी, काटा, पाचोळा, बुजगावणं, वारूळ, हातधरणं, हंबर, वासराचं भोत, गोन्हा, दमणी, टेकू, आट, वणवा, बळी, नवस, अभोट या सर्वच कवितांच्या शीर्षकातून एकेक सलग अनुभव, स्वतंत्र भावचित्र, ग्रामीण वास्तवाचं एकेक आगळंवेगळं रूप साकारण्यासाठी कवीची मनोवृत्ती आणि सर्जकप्रतिभाशक्ती बोलीतून साकारण्यास आसुसलेली दिसते. ही सर्व शीर्षकं काही प्रतिमा घेऊन येतात. चिंधी, हातधरणं, टेकू, बुजगावणं, आट या महत्त्वपूर्ण शीर्षकातून ग्रामजीवनातल्या स्त्रीच्या आणि कर्तृत्ववान पुरुषाच्या आंतरिक घालमेलीसह होणाऱ्या व्यथा वेदनांची, आसक्तीसह भोगलेल्या दुःखाची, परिस्थितीजन्य शोषणाची वैविध्यपूर्ण प्रतिमाने स्पष्ट करीत जातात. खानदेशचा परिसर, कृषीजीवनाची लोकतत्त्वीय विचारधारा, त्यातून साकारणारी बोली संस्कृती आणि आशेवर जगण्याची निसर्गदत्तवृत्ती अशा आडव्या उभ्या धाग्यांनी विणून काढलेलं हे ग्रामजीवनाचं निखळ देशी वस्त्र (हरक-सयनचं सूत) या कवितेतून उन्हात वाळत घातल्याचं जाणवते.


अस्सल खानदेशी बोलीतील हा रानमेवा बोरी-बाभळी आंबा-चिंचेसारखा निसर्गदत्त आविष्कार ठरतो. टेबलावरचे कोरे कागद आणि ग्रीष्माच्या उन्हात करपणारी कोरी जमीन, बैलगाडीची चाकरी आणि कागदावरचा समास, कागदावरच्या रेषा आणि धुळपेरणी, ही कृषी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

संस्कृतीच्या सर्जकतेची आणि कवीच्या काव्यनिर्मिती प्रक्रियेतील सर्जनाची नाळ जोडण्याची क्रिया या काव्याची प्रेरणा-प्रयोजने ठरतात. ग्रामीण उबोलीतील पूर्व खानदेश परसिरातील यावल-रावेर-चोपडा परिसराची बोली शब्द कळा प्रामुख्याने या कवितेचा ग्राम्य परिवेश सहज मुखर करते.

भुगल्या (काडी कचरा तण-ढीग), वावराचा मेंड (शेताचा बांध), वाघूर (मेंढ्यांचा वाडा-कोंडवण्याची जागा), दोखा (हलकी जमीन-पट्टा), वडांग (कुंपण-काटेरी), मातीचा गागर (वरम-बांध-कांकर), खरदळ (पुठ्ठा), फुंकणी (चूल पेटवण्यासाठी हवा भरण्यास वापरलेली पोकळ नळी), पितरपाटा (पितृपक्ष-पंधरवाडा), नख्या (पराटीच्या कापूस काढल्यानंतर उरलेल्या अंश), बारे (वाफ्याचे दांडाशी जोडलेले तोंड), पोगा (केळीच्या पानाची गोल गोल अवस्था), बेलणी (कैऱ्या तोडण्याचे साधन), झेलगं (झाडावर कैऱ्या साठवण्यासाठी विणलेली सूताची झोळी), बिलाई (आडातून पडलेला पोहरा (बादली) काढण्याचे टोकदार साधन). पळह्याचं वावर (कपाशीचं शेत), चाहूर (चार बैलांचा नांगर), उपन पाट्या (धान्य उपणणीसाठी वापरावयाची पाटी-घमेल), तिव्हार (तिवई), मोगरी (लाकडाचा दांडका), रूम्हनं-(नांगराला-पांभरीला धरून दाब देण्याचे लाकडी आधार), पल्लोव (पातळाचा पदर), खुर्दा (चिल्लर पैसे), झापळ (संध्याकाळची स्थिती), बांगडी-बिल्लोर (कांचेच्या बांगड्या-बिलवर), हेंकळाची काटी (काटेरी फांदी), डालगं (डाल-टोपली), घडुलं (मातीची घागर), टमरेल (टीनचा डबा), खुरपं (खुरपी-विळी), न्याहमीचं भात्यं (भाकरीचे फडके टोपली-दुरडी), उन्हवणी (उष्ण-उकडलेलं पाणी), सरोटा (उलथणी-लोखंडी), बयतन (सरपण-काड्या), धनुकली (धमेनी-लोहाराची), बादी (शर्यत-स्पर्धा), भुगराळ माती (मऊशार जमीन), इघन (विघ्नं), अभोट (ताजं-तेजस्वी भरलेलं आभाळ), पुरान्याची झटानी (पराणीची लोखंडी इतानी-अवजार-खुरपणी), खापऱ्या (मातीच्या फुटलेल्या भांड्याचे तुकडे), आयदी (ऐतखाऊ), वासराचं भोत (मेलेल्या वासराच्या कातडीत पेंढा भरून केलेली प्रतिकृती), डंकीण (विहीरीतून पाणी काढण्याचे इंजीन), बत्थड जमीन (कोरडी-टणक) असे कितीतरी बोलीशब्द आणि त्यांची उच्चार-ध्वनीत रूपे अर्थासह प्रकट होतात. ही खास ग्रामीण बोलीची शब्दकळा. कधी प्रतिमांतून तर कधी ग्रामीण वास्तवासह या कवितेतून अर्थपूर्णता निर्माण करते.

या कवितेतला 'बाप' आणि 'माय' तसेच 'आजी'



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आणि 'पोरगं-पोरगी' या व्यक्तिरेखातून ग्रामजीवनाचे दु:खी, अभावग्रस्त व्यथा वेदनांचे आणि विरत चाललेल्या भावजीवनाचे साक्षीदार आहेत. 'गावाच्या आकाभोवती' फिरणारा बाप, त्याचे कष्टमय आशावादी जीवन आणि शोषण व्यवस्थेनं त्याच्यावर लादलेली विपन्नावस्था याचं खरंखुरं चित्र ही कविता रेखाटते. 'विस्तू' कवितेतून कवीनं टिपलेलं जीवन दृक्‌चित्रणाचा प्रत्यय आणून देणारं थेट शैलीतलं वर्णन वाटते. "माय धडपडत उठी, मी गोधडीच्या भोकाला डोळा लावून पाहत राही : बा डुलत डुलत अंगातला सदरा काढून खुंटीला टांगी. माय त्याला वाढून जेवू घाली अन् झोपल्यावर त्याच्या अंगावर पांघरूण टाकी. ती ही दोन घास पोटात ढकले. अन् चिमणीची वात बारीक करून लहानग्याला पोटाशी घेऊन पडे. जसा नुकताच चुलीत तिने विस्तू राखेत दाबून पहाटेसाठी जतन करून ठेवलेला असे." (पृ. ३३) या सर्वच कवितेतून असे ग्रामीण जीवनाचे चलतचित्र, हुबेहूब शब्दकळेतून रेखाटण्याची साधीसुधी परंतु अस्सल बोली-भाषा हा या कवितेचा स्थायीभाव आहे. हेच तिचे सर्वांग सुंदर वैशिष्टही आहे.

'गळका माठ' (संसाराच्या ओढगस्तीच्या अवस्थेची प्रतिमा), 'हातधरणं' (बाईच्या बिकट दु:खी जीवनाची प्रतिमा), गावाचा आक (ग्रामीण खेड्याचं पर्यावरण), काटा (शेतकऱ्याचा शिकलेला मुलगा), बुजगावणं (शेतीच्या प्रश्नांची भीती वाटावी अशी अवस्था), बांध (दोन भावांच्या वाटणीमुळे आलेलं अरिष्ट), मोहळ (शिवाराच्या समृद्धीचं प्रतीक-स्त्रीच्या कपाळावरचं कुंकू), पिंजरा (पोपटाच्या जीवनाच्या अवस्थेशी त्यानं केलेली तडजोड), माणसांची वस्ती (ऐतखाऊ वृत्ती-स्वार्थी लालसा), घराचा मूळ चेहरा (आजीचा चेहरा-परंपरेचा वारसा-संस्कृती), डोह (निसर्गाचं अथांग रूप-स्वार्थी माणसाचं विकृत रूप), वादळ (हिंस्र श्वापदांचा भुकेला कळप) या सारख्या काही प्रतिमांतून किनगावकर जो व्यापक जीवनाचा आशय मांडू पाहतात तो ग्रामीण जीवनाला कवेत घेऊ पाहतो. ह्या प्रतिमा-सृष्टीतून कवितेला कुणबीजीवन आणि निसर्ग यांना आगळेवेगळे परिमाण लाभते.

ग्रामसंस्कृती आणि लोकतत्त्वीय धारणांचा खूप जवळचा संबंध असतो. शकून अपशकून मानणारी गावाची मानसिक लोकतत्त्वीय धारणा सर्वश्रुत आहेच. 'मोहळ' शुभ असतं असं म्हणणारा वाड्यातला म्हातारा सांगतो-

"मोहळ शुभ असतं
शिवाराच्या समृद्धीचं प्रतीक असतं
त्याला उठवू नका"
तेव्हापासून आम्ही जपतो आहे मोहळ
तळहातावरच्या फोडासारखं
जसं राखावं स्त्रीनं कुंकू कपाळावरचं." (पृ. ६०)

आंब्याचं झाड वाढवतांना पेरलेल्या रोपट्याची देखभाल केली परंतु त्याला फळ येत नाहीत त्यावेळी लोकवदंता अशी- 'करणी करणे' या संदर्भातील-

कुणी म्हणतात :

"हा घाटावरचा आंबा आहे आपल्या जमिनीत यायचा नाही"

किंवा असंही सांगतात :

"झाडाला कुणी तरी करणी केली." (पृ. ६२)

"सापसोळीच्या शेपटीला करंगळीने स्पर्श केल्यास किंवा आपसूक गळलेली निंबाची पानं (पाल्वी) हवेत अलगद झेलले की पैसे सापडतात" ही बालसमजूत (लोक समजूत) (पृ. ७८) तसेच पौर्णिमेच्या चंद्रबिंबावर ससा आहे" अशी बालसुलभ मनोवस्था या कवितेत चित्ररूप भाव उभा करते. 'मुंजोबाचा' गान देणे (पृ. ८५) ही पूर्व खानदेशातील लोकरीत, घरातील आजारी मुलाचं आयुष्य वाढावं यासाठी दिला जाणारा 'बोकडाचा बळी' (पृ. ११३) ही मानता देण्याची रूढी-नवस देण्याची प्रथा यांचा उल्लेख या ग्रामजीवनाच्या लोकतत्त्वीय जीवनानुभूतींची साक्ष ठरतो. 'रायरंग' (पृ. १२०) या लोकसंस्कृतीच्या उपासकाचे विनोदी संवाद, त्याच्या अस्तित्वाला लागलेली घरघर आणि नव विचारांमुळे झालेल्या जीवन मूल्यांच्या बदला संदभांत ही ही कविता भाष्य करते. ग्रामजीवन आणि लोकतत्त्वाचा हा अनुबंध प्राचीनता आणि नवता यांचा सुंदर समन्वय साधणारी ठरते.

❖❖❖

'गावाच्या आकाभोवती' 'कवितासंग्रह', कवी : प्रकाश किनगावकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, किंमत : १२५/- रु.

डॉ. किसन पाटील
'अक्षरवेल' ९/५४-२, शिवकॉलनी, जळगाव - ४२५ ००२.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

अनुक्रमणिका

कविवर्य अनिलांची जानपद कविता

प्राचार्य डॉ. पंडितराव पवार

[कृषिसंस्कृतीच्या माध्यमातून प्रकटणारी कविता चिंतनशील आणि अधिक गहिऱ्या भाववृत्तीला साद घालते. कवी अनिलांच्या प्रमाण भाषेच्या कवितेतून प्रकट झालेला 'जानपद आविष्कार' प्रस्तुत लेखकाने शोधला आहे. ह्या दृष्टिकोनातून कवी अनिलांच्या कवितेचे पुनरावलोकन हृद्य आहे. – संपादक]

कवी आत्माराम रावजी देशपांडे उपाख्य 'अनिल' हे मराठीतील एक प्रतिभावंत आणि नामवंत कवी म्हणून साहित्यजगतात ख्यातकीर्त आहेत. अभिजात कवितेबरोबरच सौंदर्यात्मक भावजीवी कविताही त्यांनी विपुल लिहिली. 'फुलवात', 'सांगाती', 'पेर्तेव्हा', 'दशपदी' हे त्यांचे स्फुटकविता संग्रह असून 'भग्नमूर्ती, 'प्रेम आणि जीवन' आणि 'निर्वासित चिनी मुलास' हे त्यांची दीर्घकाव्ये प्रसिद्ध आहेत. १९२० ते १९८० या काळात कवी अनिलांची कविता बहरली. वैयक्तिक जीवनाबरोबरच समजाजीवनातील भावभावना व्यक्त करणाऱ्या भावकवितेबरोबरच वैचारिक-चिंतनशील आणि कथानकरहित खंडकाव्याच्या स्वरूपाची कविताही त्यांनी लिहून मराठी काव्यजगतात आपली नाममुद्रा कोरून ठेवली. कवी अनिलांची मूळची भावगीतात्मक वृत्ती स्फुट आणि दीर्घकवितेतही कमी अधिक प्रमाणात कायम आहे. अनिलांनी आपल्या काव्यलेखनाची सुरुवात मीलनोत्सुक प्रेमिकांच्या भावनेच्या आविष्कारासाठी करून ती प्रेमाची भावना वाढत्या जीवनाबरोबर आणि जीवनाच्या गतीमानतेनुसार जीवनोत्सुक राहून सातत्याने प्रवाही ठेवली. व्यक्तिजीवनाबरोबरच समाजजीवनातील विविध भावोत्कट प्रसंग, निसर्गाची विविध विलसिते कधी तादात्म्याने तर कधी ताटस्थाने काव्यात आणली. आशयाची सखोलता जाणवताच त्याला उत्कटतेची जोड देऊन परिपक्व अनुभवातून विविध भाववृत्ती काव्यगत केल्या. आणि 'प्रिती तुझी माझी नाही निराळेपणाची ! जगाच्या सुखदुःखी मिळालेपणाची' हा व्यक्तिगत प्रेमजीवनाचा प्रवास समाजाच्या जीवनप्रेमात व्यापक अर्थाने संक्रमित झालेला दिसतो. त्यांच्या समग्रकवितेचा पट उलगडल्यावर हे ध्यानी येते.

कवी अनिलांच्या कवितेतील प्रेमभावना, निसर्गचित्रणे, समाजसंस्कृतीचे चिंतन, मानवाची सृजनशीलता, आशावादी मनोवृत्तीचे दर्शन मनोज्ञ आहे. त्याचप्रमाणे यांच्या काही कवितेत जानपद जीवनाचे दर्शनही उत्कटपणे आणि नेमकेपणाने घडते. कष्टकरी शेतकरी, त्याची शेतीवाडी, त्यातील पीके, कोरडा-ओला दुष्काळ, निसर्गाचा लहरीपणा, मानवाचे परावलंबित्व, उशिराचा पाऊस, अवकाळी पाऊस याचे दर्शन या कवितेत कमी अधिक स्वरूपात घडते. तसेच नांगरून पडलेल्या भूमीवर पाऊसधारा कोसळताच 'पावश्या' पक्ष्याने 'पेर्तेव्हा' असा संदेश देताच, आपल्या आशा पल्लवित झालेल्या, शेतकरी आणि सर्वसामान्य माणूस यांचे वास्तव जानपद जीवन, त्यांच्या काही कवितात पहावयास मिळते. त्यांच्या त्या विषयाच्या कवितांचा परामर्श घेता येण्यासारखा आहे. त्यादृष्टीने त्यांच्या 'गरीब आणि पावसाळा', 'पीक', 'धडकी', 'कोंबडा', 'पेर्तेव्हा', 'काळी' इत्यादी कविता उल्लेखनीय आहेत.

माणूस हा निसर्गाचाच एक घटक आहे. आकाश, भूमी, पाऊस ही निसर्गाची व्यापक रूपे आहेत. त्याच्याशी निगडित असे मानवाचे जीवन आणि त्याचा निसर्गाशी आलेला निकट सहवास, जीवन सुखावह होण्यासाठी घडणारा संघर्ष हे चित्र मानवाच्या आदिम अवस्थेपासून म्हणजे सनातनच आहे. हे निसर्गचित्रण आणि ग्रामीण जीवन यांच्या समन्वयातूनच अस्सल जानपदांचे जीवन जगणे चाललेले असते. असे ग्रामीण जीवन आणि निसर्गाची विलसिते यांचे चित्रण मराठी साहित्यात १९३० नंतर येऊ लागले. विशेषतः बी. रघुनाथ, ग. ल. ठोकळ यासारख्या ग्रामीण जीवन जगणाऱ्या कवींनी अस्सल ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांची दुःखे आणि दारिद्र्य त्यांच्याबद्दलची सहानुभूती आपल्या कवितांतून व्यक्त केली. त्यानंतर के. नारखेडे, बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांतून शेतकरी जीवन, त्यांचा दैववाद, निसर्गाची सृजनाची किमया आणि मातीबद्दलचे प्रेम अत्यंत साधेपणाने पण जिव्हाळ्याने आत्मनिष्ठ पातळीवर व्यक्त होताना दिसते. ग्रामीण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

लोकजीवन आणि निसर्ग अत्यंत सहजपणे व्यक्त होतो. याच परंपरेत कविवर्य अनिल यांनीही काही ग्रामीण लोकजीवन, शेतकरी आणि त्याची शेती, पीकपाणी यांचे चित्रण सहजपणे आपल्या कवितेत साकार केले आहे.

मानवाने विज्ञानाच्या बळावर गगनभरारी घेऊन निसर्गाला जवळ केले आहे. परंतु तरीही तो निसर्गापुढे एक क्षुल्लक घटक असून, त्याचे निसर्गापुढे असलेले परावलंबित्वाचे नाते संपलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. विज्ञानाने माणसापुढे असंख्य सुखे उभी केलीत. त्याचबरोबर या संस्कृतीत मानवच मानवाच्या नाशास कारणीभूत आहे; हे वैश्विक सत्य आहे. निसर्ग मानवी जीवनाचा आधार आहे, हे जसे खरे आहे त्याचप्रमाणे निसर्ग आपल्या एकाच तडाख्यात सर्व चराचराचा नाशही घडवून आणतो. हे अनुभव मानवास महापूर, भूकंप, सागरी वादळी वारे यासारख्या घटना-प्रसंगातून येतात. म्हणजेच निसर्ग मानवी जीवनाला पूरक असूनही त्या प्रचंड शक्तीपुढे मानवाच्या शक्तीला आणि कर्तृत्वालाही मर्यादा पडतात. त्यामुळे मानवाला दुःख भोगावे लागते.

अनिलांच्या 'गरीब आणि पावसाळा' (पेर्तेव्हा') मधील शेतकरी हा सर्वसामान्य माणसाचा प्रतिनिधी आहे. तो निसर्गाच्या हातचे बाहुले कसे बनतो याचे मर्मभेदक चित्रण येथे पहावयास मिळते. संततधार पावसामुळे त्याच्या कुटुंबियांची फजिती झालेली आहे. त्यात त्याच्या दारिद्र्याने भर घातली आहे. त्याच्या लहानशा झोपडीत सर्व संसार भरला असून झोपडीत पाणीच पाणी झाले आहे. मुले आणि माणसे भुकेने व्याकुळ झाली आहेत. दैनंदिन गरजा भागविण्यासाठीसुद्धा त्या शेतकरी कुटुंबास झोपडीबाहेर पडणे अशक्य झाले आहे. अशा वेळी तो शेतकरी देवाकडे हा पाऊस थांबविण्याची विनंती करतो. परंतु त्याची दीनवाणी प्रार्थना ऐकून,

'वीज चमकली, निसर्ग हसला गडगडाट वर मेघांचा ।
उपहासाचे हास्य करीत ये पुनरपि पाऊस जोराचा ॥'

अशी निसर्ग त्याची अवहेलना करतो. गतवर्षी या शेतकऱ्याने 'कोरड्या दुष्काळाशी सामना दिला होता. आता ओल्या दुष्काळाने त्याला जिणे नकोसे केले आहे. येथे ग्रामीण शेतकऱ्याचा दैववाद, निसर्गापुढे शरणागती आणि परावलंबी जीवन याचे वास्तव चित्र पहावयास मिळते. शेतकऱ्याचे जीवन म्हणजे निसर्गाच्या जुगाराशी खेळण्यासारखे आहे. त्याची 'गोजिरवाणी उघडी पोरे', 'तुटकी वाज', 'अंग चोरून उभी असलेली गुरेढोरे' या शब्दप्रतिमा ग्रामीण जीवनाचे वास्तव अधिकच सहानुभूती निर्माण करतात.

मोठ्या कष्टाने वाढविलेले 'पीक' (सांगाती) जोराचा वारा आणि पावसाची संततधार यामुळे वाया जाण्याची भीती यामुळे या कवितेतील शेतकऱ्याची झोपच उडते. शेतकऱ्याच्या कुटुंबातील अबालवृद्धांनी रात्रंदिवस कष्ट करून पीक हातातोंडाशी आणले आहे. हे पीक म्हणजेच धान-भात होय. हे पीकच त्याची वर्षभराची बेगमी असते. म्हणून कवी म्हणतो,

''पडू दे हाती हे पीक सारे बिचाऱ्यांच्या
राबले हे खूप बरे, माणसे नि गुरेढोरे
म्हातारी अन् लहान पोरे
हाडकुळे बैल हेले जुतून केली भातशेती
नागव्याने कसूनशान लंगोटी
तुडवली पावलांनी गारमाती
गुडघागुडघा चिखलामध्ये वाकवाकून दिवसभर
ओठावरती उमटली दिसू आली भीरू आस
कष्टलेले प्राणी सारे पोटभर खातील घास
आता वाऱ्या वाहत राहा झुळझुळ असा हप्ताभर
उगा नको जोर आणू, कोवळं हे धान नको मातीमध्ये लोळवू
उडवून देऊ तिरपिट नको कापणीच्या भरावर
नका आणू विघ्न काही चाळे सारे बस करा
पंधरा दिवस धीर धरा

नेऊ द्या यांना हे सुगीचे पीक घरा'' या काव्यपंक्तीतील शेतकऱ्याचे कष्टमय जीवन वास्तव आणि प्रातिनिधिक आहे. मात्र लहरी निसर्गापुढे माणसाची होणारी असहायता आणि परावलंबित्वाचे चित्रण हृदय हेलावणारे आहे. शेतकऱ्याचे जीवन, त्याची कामे करण्याची पद्धत आणि निसर्गापुढे पत्करलेली शरणागती यांचे अस्सल जानपद चित्रण सहजपणे साकार केले आहे. या कवितेतील 'अनवाणी', 'रानशेण्या', 'हडकुळे बैल हेले', 'नागव्याने', 'कसूनशान', 'लंगोट्या', 'गारामाती', 'धानाच्या रोपाची लावण', 'निंदन खुरपण', 'फुलून आल्या बाळ्या', 'भीरू आस', 'गारपीट', 'तिरपिट', 'सुगीचे पीक' इत्यादी शब्दातून जानपद बाजाचे अस्सल दर्शन घडते. कवीचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

ग्रामीण आणि विशेषतः शेतकरी जगीवनाचे सूक्ष्म निरीक्षण क्ति बोलके आहे, हेही ध्यानी येते.

शेतकऱ्याचे आणि पर्यायाने सर्वच समाजाचे जीवन निसर्गावर अवलंबून आहे. एखाद्या वर्षी पावसाने वेळेवर वर्षाव केला नाही तर सर्वच समाज, शासन यंत्रणा इत्यादींच्या पुढे पुढील काळातील संभाव्य दुष्काळाची भीती निर्माण होते. त्यातून निर्माण होणाऱ्या सर्वच प्रश्नांनी माणूस चिंतातुर होऊ लागतो. एकंदरीत या निसर्गाने जर आपला नियम चुकविला आणि ऋतुसंक्रमण वेळीच झाले नाही, तर व्यक्ती आणि व्यापक समाजजीवनात भयानक परिस्थिती निर्माण होईल, या विचाराने संवेदनशील कवीला 'धडकी' (पेर्तेव्हा) भरते. सर्वसामान्य माणसापेक्षा कवी अधिक संवेदनशील असतो. वर्तमानाबरोबरच भविष्याचेही चित्रण तो कल्पनाशक्तीने अधिक तरलतेने करतो.

निसर्गाचे संक्रमण बिघडले तर सर्वसामान्य माणूस आणि व्यापक समाजव्यवस्थेवर कोणते अनिष्ट परिणाम होतील याचे भेदक चित्रण कवी आपल्या कवितेत उभे करतो. पावसाळा जवळ आल्यावर कवीला ह्या निसर्गाच्याच अनिश्चिततेची जाणीव तीव्रतेने होते. वेळेवर ढग जमून पाऊस आलाच नाही आणि ओला दुष्काळ पडला तर ग्रामीण शेतकऱ्यासह शहरी जीवनातील माणसेही,

''दूर नाही पावसाळा आता
उत्कंठित मन झाले माझे
कसलीसी हुरहुरहि
लागून राहे...
आलीच नाही तर वर्षा ती
उधळीत हर्षाला
असेच राहिले हे निळे आकाश
खेळवीत सावकाश
सत्ताविसातून जाऊन नऊ
शून्यच राहिले बाकी
तर...?
चिंता जडून धडकी भरे''

पावसाचे आगमन मृग नक्षत्रापासून सुरू होऊन स्वातीचा शेवटचा 'मोत्या पवळ्यांसारखे धान्य देणारा पाऊस पडेपर्यंत संपते. ग्रामीण जीवनातील माणसे, विशेषतः शेतकरी प्रत्येक नक्षत्राच्या वैशिष्ट्यासह पावसाची चातकासारखी वाट पाहतो. आजही ती परंपरा खंडित झाली नाही. पण आज निसर्गाचा समतोलच बिघडला आहे. पृथ्वीवरचे तपमान वाढू लागले आहे. 'ग्लोबल वार्मिंग'चा परिणाम माणूस सहन करू लागला आहे. पावसाचे आगमन खूपच चुकले तर कृत्रिम पावसाचेही प्रयोग केले जाऊ लागले. पिण्यासाठी आणि सिंचनासाठीही पाण्याची गरज आहे. पण सगळीच सत्तावीस नक्षत्रे कोरडी गेली तर कवी म्हणतो,

''तर...?
तर काय ?
घोर अवर्षण । दुष्काळ विक्राळ ।
कणन् कण धान्याचा । मिळवून, मोजून, खाऊन
राहून अर्ध-नाही-चतकोर पोटी
आशा धरून एकेक क्षण
कुंथणारे जीवन वाट पाहत
अन्नधान्याची ! पुढल्या पिकाची
मरणार बिचारे भुकेने
तडफडून
लाखो लोक
आमचे
पाहणार आम्ही मरणारे ते
पाहवत नाही म्हणत
कण्हत, तणतणत
हळहळत
पण जेवत दोन्ही वेळ
बेशरमपणे जिवंत राहत
घृणा येऊन माझी मलाच
भिती वाटून
धडकी भरे ।''

या काव्यपंक्तीतून निसर्गाच्या अनियमितपणामुळे होणाऱ्या ग्रामीण आणि शहरी जीवनावरही होणाऱ्या दाहक परिणामाचे चित्रण नजरेसमोर कवीने उभे केले आहे. त्याचप्रमाणे शेतकरी जीवन उद्ध्वस्त होईल. अशा परिस्थितीत व्यापारी साठेबाजी करतील. त्यांना मात्र वेळेवर दोन घास मिळतील. ते बेशरमपणे सर्वसामान्य माणसाचा विचारही न करता जगतील. एकंदरीत समाज जीवनही विस्कळीत होईल. साठेबाजी, नफेखोरी, सबल-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

स्नेहवर्धनची २००९ मधील प्रकाशित पुस्तके

☆ मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास (अर्वाचीन कालखंड) – डॉ. प्र. न. जोशी ४५० / – ☆ इंद्रजित भालेरावांची कविता – प्रा. मारोती घुगे १०० / – ☆ छत्रपती शिवाजी महाराजांवरील महाकाव्य रचना ३५० / – ☆ संत तुकाराम आणि संत कबीर – डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर २५० / – ☆ सत्त्वकथा : एक साहित्यिक मानदंड – डॉ. लीला वेदपाठक १५० / – ☆ दोन नाकाची माणसे – हरिशंकर परसाई लिखित (अनुवाद) केशव फडणीस १०० / – ☆ संत तुकाराम – डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर २५ / – ☆ डॉ. सरोजिनी बाबर–शरदिनी मोहिते २५ / – ☆ लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा – डॉ. तारा भवाळकर १०० / – ☆ नेताजी सुभाषचंद्र बोस – श्रीमती निर्मला किराणे २२ / – ☆ युवकभारती : इयत्ता १२ वी कविता – श्रीमती निर्मला किराणे ३० / – ☆ आई हसत ये, डोलत ये – चंदला कुलकर्णी १०० / – ☆ प्रकाश बहुरंगी – चंदला कुलकर्णी १०० / – ☆ भावमिलन – डॉ. ह. रा. जाधवर ८० / – ☆ पावसाची राणी – सौ. माया धुप्पड ३० / – ☆ चंद्रचाफा – डॉ. शतनू चिंधडे ६० / – ☆ आनंदीबाई पेशवे – म. श्री. दीक्षित २५ / – ☆ लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते – (संपा.) रश्मी शेट्ये / जगदीश संसारे / रामचंद्र वरक १०० / – ☆ अरे काळीज हे माझे – डॉ. भगवान कौठेकर ८० / – ☆ महाराष्ट्राचे मानकरी – दत्ता टोळ ३० / – ☆ नायक – बाळकृष्ण प्रभुदेसाई १२० / – ☆ व्यावहारिक व उपयोजित मराठी – डॉ. मनोहर रोकडे ८० / – ☆ लोकसाहित्य दर्शन – (संपा.) डॉ. रमेश देवरे ४०० / – ☆ यशस्वी जीवनाचे रहस्य – डॉ. प्र. चिं. शेजवलकर २०० / – ☆ तृतीय रत्न : महात्मा ज्योतिबा फुले – (संपा.) डॉ. नीला पांढरे ७० / – ☆ कथागौरव – (संपा.) डॉ. भास्कर शेळके / डॉ. बाळासाहेब गुंजाळ २०० / – ☆ साहित्यसंवाद–डॉ. सुहासिनी इर्लेकर २०० / – ☆ बुद्ध चरित गाऊया – डॉ. सुहासिनी इर्लेकर ८० / – ☆ छत्रपती संभाजीराजे – रा.व्यं.जोशी २० / – ☆ भारताचे राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम – डॉ. नीला पांढरे ३० / – ☆ आधुनिक संत विनोबा भावे – डॉ. नीला पांढरे २५ / – ☆ उमलणारी मने – तेज निवळीकर १०० / – ☆ जागणाऱ्या जाणिवा – तेज निवळीकर १०० / – ☆ सांज मोगरा – शांता लागू ८० / – ☆ खाली डोकं वर पाय –सौ. शांता लागू ५० / – ☆ Haunting Echoes In The Fog of History - Dr. Sudhir Savkar 200/- ☆ हसलात तर कळवा – भूषण कटककर १२० / – ☆ आदिवासी नाटक – डॉ. रमेश कुबल १८० / – ☆ कथा सांगतो पृथ्वीची – किसन पवार १०० / – ☆ जन्मोजन्मी या श्वासावर – किसन पवार १०० / – ☆ सरपंच – जयवंत अवघडे १५० / – ☆ आत्मिक आनंदयात्रा – डॉ. विदुला जवळगेकर १०० / – ☆ उलटलेली पाने – श्री. बजरंग शेलार ४०० / – ☆ आदर्श पालक व्हा – प्रा. महावीर पांढरे १२० / – ☆ माझी प्रशासकीय वाटचाल – वि. पां. राणे १२० / – ☆ गोपाळ गणेश आगरकर – डॉ. नीला पांढरे २० / –

स्नेहवर्धन प्रकाशन

८६३, सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे - ४११ ०३०

कार्यालय : (०२०) २४४७२५४९ / २४४३६९६१ Email : snehavardhan@vsnl.net

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

दुर्बल संघर्ष, चोऱ्या-माऱ्या, अत्याचार, अनाचार यासारख्या समाजविघातक गोष्टी थैमान घालतील. नीतीमूल्यांची चाड राहणार नाही. आणि शेवटी समाजातील भुकेकंगाल आणि विचारवंत देखील शांततेची भ्रांत सोडून क्रांती करण्यासाठी सज्ज होतील. अशी भयानक 'धडकी' कवीला भरते. त्यासाठी निसर्गाचा समतोल राखून शेतकरी, कामकरी सुखी राहील. तरच जगही सुखी राहील, हीच अपेक्षा कवी येथे करतो.

'पेर्तेव्हा' (पेर्तेव्हा) ही कवी अनिलांची निसर्गाची आणि शेतकरी जीवनाची पार्श्वभूमी असलेली, नवसृजनाची प्रेरणा देणारी, मानवता आणि आशावाद इत्यादी भावना व्यक्त करणारी कालातीत कविता आहे. 'पेर्तेव्हा' हा एक पक्षी असून त्याला पावसाच्या आगमनाची चाहूल लागते असे म्हणतात. त्यामुळे त्याला 'पावश्या' या नावानेही ओळखले जाते. तो भरगच्च पावसाच्या आगमनापूर्वीच ओरडतो, त्या अगोदर नाही. त्याचा आवाज ऐकल्याशिवाय शेतकरी पेरणी धरीत नाहीत. त्यामुळे हा पक्षी शेतकऱ्यांचा सच्चा मित्र आहे. पावश्याचे हे निश्चित पावसाची सूचना देणारे ओरडणे आणि शेतकऱ्याची नवनिर्मितीची प्रक्रिया याच्या संयोगाचे चित्रण कलात्मक पातळीवर पहावयास मिळते. शेतकऱ्याला पर्यायाने अखिल मानवजातीला प्रतिकूल परिस्थितीतही धीराचा संदेश या कवितेतून मिळतो.

कडक उन्हाळ्याचे ऊन सहन करणारा 'पावश्या' पावसाची चाहूल लागताच मुक्तकंठाने गातो. त्याला आता नव्या जगाची चाहूल लागते. आतापर्यंत मौन पाळणारा पावश्या जगाच्या कल्याणाचा विचार करून 'पेर् ते व्हा' असे म्हणू लागतो. आभाळाकडे नजर लावणाऱ्या चिंताग्रस्त शेतकऱ्यांना विजांच्या लखलखाटात आणि मेघांच्या गंभीर गडगडाटात म्हणतो,

''भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठारे उठारे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा पेरा पेरा
नवी बीजे पेरा
नव्या आशा धरा
पेर् ते व्हा । पेर् ते व्हा ।''

हा नवसृजनाचा संदेश देणारा पावश्या आता येथे केवळ पक्षी रहात नाही, तर दुःखाचे कढ सोसणारा, जीवनाबद्दल नवी उमेद बाळगणारा, नव्या जगाच्या निर्मितीची प्रेरणा देणारा महान प्रेषित वाटतो. पक्ष्याचे नाव स्पष्ट होण्यासाठी 'पेर्तेव्हा' आणि संदेश देण्यासाठी 'पेरते व्हा' अनुक्रमे विशेषनाम आणि आज्ञार्थी ही रूपे योजली आहेत. येथे पूर्णतः जानपद जीवन नसले, तरी जगाचे उदर-भरण करणारा शेतकरी आणि त्याची सृजनशीलता यांचे काव्यात्म चित्रण आहे. सृजनोत्सुक कविहृदयाचा तो स्वयंपूर्ण उमाळा असून त्याला मानवतेची ऊब आहे.

मानव आणि निसर्गाचे नाते अनिलांनी 'काळी' (दशपदी) या कवितेतून गहिऱ्या स्वरूपात व्यक्त केले आहे. काळी जमीन ही शेतकरी जीवनाशी निगडित आहे. तिच्या विविध गुणधर्मांचे विशेष कवीने सहजपणे प्रकट केले आहेत. त्यामुळे सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी 'काळी' कवितेत अनिलांच्या सर्वच काव्याचे प्रतिकात्मक रूप जाणवल्याचे म्हटले आहे.

खरे तर कवी अनिलांची ही एक रूपकात्मक कविता आहे. विदर्भातील 'काळी' जमीन हाच या कवितेचा खरा विषय आहे. परंतु कवितेचा आशय मात्र एखाद्या खानदानी, चतुर आणि सोशिक स्त्रीच्या व्यक्तित्वाने भरलेला आहे. ही जमीन शेतकऱ्यासही कल्याणकारक कशी आहे, याचे मर्म सांगताना कवी म्हणतो,

''भारीच सोशिक हिची वहिवाट झडीवर झड घेते सामावून
कोरडे पंधरवाडे गेले तरी साहते आतल्या आत ओलावून''

या वर्णनातून कसदार काळी माती जास्त पाऊस आला, तरी त्याला आपल्यात सामावून घेते आणि काही दिवस पावसाने अंतर दिले तरी आतल्या ओलाव्याने पीक धरून ठेवते. शेतकऱ्यास अशीच जमीन लाभदायक असते. 'काळी धरती', 'सुबक सावळी', 'गरतीपरीस', 'टोपपदरात मान लवविणे', 'ऊनऊन' झळवणीने 'न्हाणे', नाकावरील 'भांग', 'बुचडा बांधून टिळा थेटणे', 'निब्बर राठ कांती', 'घट्ट जुनाऊ लुगडे' यासारखी शब्दरचना आणि प्रतिमा अस्सल ग्रामीण खानदानी स्त्रीचे आणि ग्रामजीवनाचे चित्र साकार करतात. त्यामुळे ही कविताही जानपद कवितेच्या जवळ जाणारी आहे, यात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

मतभेद होऊ नयेत.

कवी अनिलांच्या 'पहिल्या पाऊस' या कवितेत निखळ निसर्गाचे चित्रण असले तरी हा पाऊस येताच 'मातीचा भरला । उन्मत्त सुवास' हा गंध ग्रामीण जीवनात अनुभवता येतो. त्याचप्रमाणे 'पावसाळा' या कवितेत निसर्गाच्या विविध दृश्यांच्या चित्रणाबरोबरच या झिमझीम पावसामुळे,

''नदीनाले एक झाले । पूर भरूनीय चाले
जिवलग कोठे बाई पडे अडकून । नच पडे चैन''

अशी हुरहूरही व्यक्त होते. कवी अनिलांची मूळची प्रेमभावना येथेही जिवलगाच्या काळजीने हुरहूर वाढविणारी आहे. कवी यशवंतांच्या कवितेतील शेतकरी 'तिन्ही सांजा झाल्या'वरही घरी आला नाही तर त्याची घरधनीन 'अजुनि कसे येती ना परधान्या राजा । किरकिरती रातकिडे झाल्या तिन्ही सांजा' असे काळजीयुक्त शब्दात म्हणत घरात आत-बाहेर करते. पतीबरोबरच 'परधान्या-राजा' या बैलांची ती वाट पाहते. कारण त्यांच्यावरच तिच्या संसाराचा डोलारा उभा आहे. या कवितेत अंधाराची पार्श्वभूमी आहे, तर कवी अनिलांच्या कवितेत 'पावसाळी' दिवस आहे. या दोनही कवितेत प्रमाण भाषा असली तरी वातावरण मात्र मात्र जानपद जीवनाचे आहे. 'भिजलेली माळरानं' आणि 'नदीनाले पुराने एक' होणे हे चित्र ग्रामीण भागात विपुलतेने पहावयास मिळते. त्याचप्रमाणे त्यांच्या 'उशिराचा पाऊस' या कवितेतही निसर्गाची लहर आणि मानवी प्रेमजीवन यांच्या संबंधाचे मनोहर चित्रण आहे. एरवी वेळेवर पाऊस बरसला नाही, निसर्गाचे संक्रमण ढळले तर माणसे चिंतातूर होतात. पण निसर्गापुढे मानव लहानच आहे. म्हणून कवी म्हणतो,

'असा उशिरा आलेला पाऊस तळहातावर झेलून घ्यावा
कोरडे पडले ओठ उघडून वरच्यावरती चुंबून प्यावा
त्याला बोलू नये अधिक उणे आणि काढू नये त्याचे बहकणे
खोटे भरवसे देत राहणे बहाणे सांगणे वेळा चुकविणे'

हा तर पावसाचा-निसर्गाचा धर्मच आहे. असा पाऊस हाही शेवटी माणसाला कल्याणकारीच असतो. म्हणून अधीर होऊन वाट पाहण्यातच समाधान आहे. अशा पावसाला खरे तर 'पायघड्यावर बसवून त्याशी कोडकौतुकाचा खेळ खेळावा', 'उरी घट्ट आवळून' 'त्याचेशी समरस होणे' हेच अगत्याचे आहे. असा 'उशिराचा पाऊस' आणि 'उशिरा अनुभवास आलेले प्रेम' यांचा उदार मनाने स्वीकार करावा, हेचच कवीला लक्ष्यार्थाने सुचवावेसे वाटत असावे.

निसर्गाशी जमवून घेण्याची खेळकर आणि समन्वयाची भावना येथे जाणवत राहते. शिवाय उशिराच्या पावसाबद्दलची चिंता शहरी माणसापेक्षा शेतकऱ्यास अधिक त्रस्त करते. 'थांब थांब परतू नको रे घना कृपाळा, अजुनि जाळतोच जगा तीव्र हा उन्हाळा' अशी प्रार्थना उशिरानेही न पडणाऱ्या पावसाला कवी कुसुमाग्रज 'मेघास' या कवितेत करतात. त्या आवाहनाचे येथे स्मरण होते. कारण तो अनुभवही शेतकऱ्याशी अधिक निगडित आहे. एकंदरीत कवी अनिलांची मूळची प्रेमोर्मीच त्यांच्या अन्य कवितांप्रमाणे निसर्गाची पार्श्वभूमी असलेल्या ग्रामीण जानपद स्वरूपाच्या कवितेत कधी ठळकपणे तर कधी लक्ष्यार्थाने जाणवत राहते. ही प्रेमाची विशुद्ध भावना व्यक्तिगत प्रेमाची सीमा ओलांडून व्यापक समाज प्रेमाची ग्वाही देत राहते. आणि म्हणूनच हा कवी म्हणून जातो,

'अजून यौवनात मी जगात जाणत्या अशा
जगावयास गावया पहावया उषा निशा
इथे निसर्गचारूता इथे प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद घेऊनी नवी'

चिरयौवनाचे वरदान लाभलेला हा कवी उषा-निशा यांची रूपे न्याहाळतो, निसर्गाची विविध विलसिते पाहण्यात रमतो. कारण मानवी प्रयत्नावर आणि त्याच्या सात्त्विकतेवर त्याची ठाम श्रद्धा आहे. त्यामुळेच त्यांची आशावादी वृत्ती त्यांना नवनवीन उमेद मिळवून देते, ही सार्वकालिक भावना कवीने व्यक्त केली आहे. त्यांचा 'पावश्या'ही हाच आशावाद पेरत राहतो.

ओल्या आणि कोरड्या दुष्काळाने कोलमडणारा बळीराजा नित्यनव्या उमेदीने 'पेरताच' असतो.

❖❖❖

संदर्भ :
डॉ. पंडितराव पवार, कवी अनिलांची कविता -
स्वरूप आणि आविष्कार, मोरया प्रकाशन, डोंबिवली, १९९२

प्राचार्य डॉ. पंडितराव पवार
६, ऋषिराज पार्क, अरिहंत नर्सिंग होमजवळ, गंगापूर रोड,
नाशिक-१३. दूरध्वनी - ०२५३-२३४३७८

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

शिबारी पार्शी (कोल्हाटी बोली)

प्रा. विजयकुमार फरांदे

[मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या आणि रानोमाळ झालेल्या आपल्याच समाजाने आपली भाषिक अस्मिता, संस्कृती-समाजभान स्वाभाविकपणे जपले. त्या बोलीच्या महासागराचे दर्शन आता घडू लागले आहे. त्यातीलच हा एक प्रवाह 'शिबारी पार्शी' कोल्हाटी बोली... ग्रामसंस्कृतीचाच एक अविभाज्य भाग म्हणून अभ्यासावा असाच आहे. -संपादक]

कोल्हाटी जमात प्रामुख्याने महाराष्ट्र व कर्नाटकाच्या काही भागात आता स्थायिक झालेली आहे. भटक्या विमुक्त जातींना एखाद्या गावात तीन दिवसांपेक्षा अधिक दिवस राहता येत नसे. कोल्हाट्यांचा समावेश भटक्या विमुक्त जातींच्या सूचीत असून ज्या विशेष जाती भीक मागत्या आहेत; त्यात त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. कोल्हाट्यांचा सुसूत्रबद्धपद्धतीने अभ्यास अद्यापही झालेला नाही. प्रस्तुत लेखकाने वाईतील कोल्हाटी समाजाचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण १९७०-७१ मध्ये आयोजित करून त्याचा अहवाल 'कृष्णाई' या नियतकालिकातून प्रसिद्ध केलेला होता. मानव व वाणिज्य महाविद्यालय वाईने विविध विषयांवर सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणे आयोजित केली होती. १९८० मध्ये पुन्हा त्याच कोल्हाटी कुटुंबांचे सर्वेक्षण आयोजित करण्यात आले होते. या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा व श्री. जयवंत जावळीकर, श्री. सदाशिव भोसले, सौ. मीरा व श्री. कुंडलिक कुडाळकर, श्री. अनिल लाखे, श्रीमती यमुनाबाई वाईकर यांच्याशी अलीकडे झालेल्या चर्चेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग सदर लेखासाठी केलेला आहे. ह्या व्यक्तींनी दिलेल्या सहकार्याबद्दल लेखक आभारी आहे.

महाराष्ट्र ज्ञानकोशात कोल्हाट्यांची मूळ वसतिस्थाने बार्शी तालुक्यातील माणकेश्वर असे दिलेले आहे. कोल्हाट्यात भातू व माळी असे दोन मुख्य प्रकार आहेत. डोंबारी (कर्नाटक, कोल्हापूर), खेळकरी (अहमदनगर), डुक्कर कोल्हाटी, पाल कोल्हाटी, खास कोल्हाटी (वऱ्हाड) तसेच इतरत्र हरका, बले वलियर (महार डोंबार), गोपाळगणी, अरे मुसलमान अशा नावांनी त्यांना संबोधले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हाटी, आपण डोंबारी-कोल्हाटी किंवा माळी कोल्हाटी असल्याचे सांगतात. पुणे-बेळगाव महामार्गाच्या जवळपास असणाऱ्या गावांमध्ये त्यांचे वास्तव्य आढळते. बेळगाव, संकेश्वर, खानापूर, सावंतवाडी, इचलकरंजी, कोल्हापूर, कराड, सातारा, निरा, जेजुरी, लोणंद, शिरवळ, भोर, सासवड, तळेगाव, पुणे या गावांमध्ये कोल्हाट्यांची वस्ती आहे. पूर्वी या जमातीचा प्रमुख व्यवसाय उड्या मारून विविध कसरतीचे खेळ दाखविणे, भिक्षा मागणे असा होता. गेल्या शतकात त्यात बदल होत गेला व तमाशा हा प्रमुख व्यवसाय बनला. तरुण स्त्रिया तमाशात नाचकाम करतात तर पुरुष मंडळी तबला-ढोलकी वाजविणे; स्टेजवर व स्टेजमागे कामे करणे इ. काम करतात. या व्यतिरिक्त शिंगांच्या फण्या व कलात्मक वस्तू बनविणे रवी, लाटणी, अशा लाकडी वस्तू तयार करणे. किल्ल्या तयार करणे, हातगाडीवर फळे विकणे, हमाली व गिरणी कामगार म्हणून काम करणे, छत्र्या दुरूस्त करणे अशा प्रकारची कामे प्रामुख्याने केली जातात.

वाईत स्थायिक झालेले कोल्हाटी हे माळी कोल्हाटी आहेत. त्यांच्यात साडे बारा पोटजाती आहेत. १) जावळीकर २) लाखे ३) कुडाळकर ४) नीळकंठ (गाडे) ५) म्होरकर ६) दांडेकर ७) घुमरे ८) औंधकर ९) पाटकर १०) बेंबळकर ११) ताथवडकर १२) फडकर १३) अर्धी जात- मुंडाळकर.

लाखे-कोल्हाटी आपला पूर्वज संत लाखा-कोल्हाटी होता असे मानतात. त्याच्या अनेक आख्यायिका आहेत. तो स्वतंत्र विषय होईल.

कोल्हाटी बोली

कोल्हाटी ही भटकी जमात आहे. त्यामुळे त्यांच्या बोलीभाषेत विविध प्रांतातील शब्द आले. सोलापूर-मराठवाडा, विदर्भ भागातील कोल्हाटी बोलीत हिंदीचा प्रभाव अधिक आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हाटी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बोली ही मराठीचीच एक बोली भाषा आहे. ग्रामीण बोली प्रमाणेच ती आहे. उच्चारातील फरक, काही शब्दांवर दिला जाणारा आघात यामुळे तिचे वेगळेपण वाटते. काही शब्दांचे उच्चार लिहिता येणे शक्य नाही. ही बोली ऐकतानाच तिचे वेगळेपण जाणवते. प्रत्येक जमातीची-जातीची वेगळी अशी खास भाषा असते. वेगवेगळ्या प्रादेशिक विभागात त्यांचे स्वरूप, उच्चारणपद्धती, ढब, इत्यादी बदलत जाते. पुणे-वाई-सातारा-कराड शिरवळ-जेजुरी ते कोल्हापूर बेळगावपर्यंत कोल्हाट्यांची/डोवाऱ्यांची बोली भाषा सारखीच आहे. मात्र सोलापूर, बार्शी, परभणी या भागातील कोल्हाटी हिंदी बोली बोलतात असे दिसून येते. त्याचे कारण पूर्वी हे कोल्हाटी विदर्भ-मध्यप्रदेश आदी भागात भटकत असावेत असे वाटते. कोल्हाटी बोली ललित साहित्यात फारशी आढळून आली नाही. डॉ. किशोर शांताबाई काळे यांनी आपल्या आत्मचरित्रात 'कोल्हाट्याचे पोर' व 'मी डॉक्टर झालो' मध्ये बोलीभाषा दोन-तीन प्रसंगापुरती वापरली. श्री. राजेश चेंडीराम कुदळे ऊर्फ राजू चावीवाले पुणेकर आणि जेजुरीकर यांच्या 'कोल्हाटी उड्या नियतीच्या छड्या' ह्या कादंबरीत भाषेच्या अभ्यासकांची एक चांगली सोय करून ठेवली आहे. बोलीभाषेतील संवाद झाल्यानंतर त्याचे रुपांतर प्रमाण मराठी भाषेत त्यांनी दिलेले आहे. यमुनाबाई वाईकर यांच्या चरित्रातही प्रमाण मराठीच वापरलेली आहे. (लावणी सम्राज्ञी ले. प्रभाकर ओव्हळ) फक्त चार ठिकाणी कोल्हाटी बोली आली आहे.

कोल्हाटी बोलीचे नमुने

१

'क्या सोयरं, कस्या क्या ? बऱ्या ह्या क्या नही ?'

'बऱ्या ह्या जी.'

'क्या च्या पानी बीनी झालुटलं क्या नही ?'

'आथ्थाच झालुटलं गी.'

'पोऱ्याबाळ्या कशी हातात ?'

'बरी हात'

'तुमचा थो थरला पोर कही कामबीम करतो क्या नही?'

'अवो तो गोळ्या गी । नवडीचा ! काम नको करायास नुसत्या आयत्या खायास पायजे.'

'मग तुमच्या घरातल्या खान्या पिन्याच्या कस्या क्या चालल्या ?'

'जवा आमी दोघा हातपाव हालवताव तवा कस्यातरी चालत्या आपल्या. जरा कठीनुच काम ह्या.'

'मग म्होरं कस्या क्या होयल ?'

'आथ्था ही टोपी टोपी द्येन चार पोऱ्या जवा सिक्तील बिकचिल तवा ! कुनास ठावेय द्येव त्येच्या डोईत गिण्यान गाडा घाल्तो !'

'बऱ्या असू द्या ! त्या पोरास्नी तरी सिकवा.'

'आथ्था शिकवता पर खऱ्या पन जवा द्येव त्यासनी गिण्यान देइल तवा खरा !'

- सदाशिव भोसले (कृष्णाई ७१)

२

'के गे पारे, कुठयॅं गिलीवतीस ? कव्वा आल्हीस ? तू जिवली की नही ?'

'आथ्था आल्हे. आन् जिवली जी जिवली !'

'तुज कढी समजल्यॅं क्या नही ? थ्या डावाळ्याच्या पोरास फऊजदाराची नोकरी मिळनॅर असॅं समदीकडॅं झाल्यॅं !'

'मज कही खबर नही. म्या कुनास इचॅरल्यॅं बी नही. आम्हास कॅं. जरूरी लागू लागली !'

'आग पर तू माऽऽझ्यॅं आईऽऽक !'

'नही... नही... मज कही बी ऐक्यायचॅं नही !!'

(संग्रहित)

३

थोडा वेळ विचार करून विश्वराज म्हणाला, 'व्होय व्होय आल्यॅं ध्यानात. मज सारक्यॅं तुमानी बघुशी वाटत्यॅं, कित्ती बी बघीतल्यॅं तरी तुमानी मन भरात नही. सारका तुमचाच इचार मज यात असतो. सारखी तुमचीच आठवन यीती.

तुमी कुठं ग्यौला की मज कस्यॅंतरी चुकल्या चुकल्यावानी होत्यॅं. रातची इचॅप यात नही. तुमच्या बिगार करमात नही, याच्यॅं क्यॅं कारन आस्यॅं क्यॅं.

(कोल्हाटी उड्या... पृ. ४०-४१)

४

'वेडा' हे शब्द ऐकताच रूपवंतीनं विश्वराजच्या ओठावर हात ठेवला आणि म्हणाली, 'आस्ये काही तरीच क्यै बोल्ता तुमानी कोन म्हणल अस्यै.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

याड्यॅं वाकड्यॅं

यावडा मोठा तुमच्याजवळ इचाराचा सागर असतान्यॅं नुसत्या शॉबळ्यॉन्यॅं कुठ तुमच्या मनॅच्यॅं पानी घडूळ व्होनार ह्यॅं.

माझ्यॅं तुमच्यावर कित्ती जीव ह्यॅं ही तुमानी कस्यॅं सागू. कित्ती जरी तुमानी बघीतल्यै तरी आजून बघुशी वाट्यै. तुमी जरा नजरआड झाला तरी बावरल्यॅं सारख्यॅं व्होत्यॅं, ऱ्यॉतभर झोपक्वीन डोळ्ळ तरमळत्यात. मी माझ्या मनास ले आवऱ्याच्यॅं बग्ता पून तुमानी बघीतल्या बिगार मनास बऱ्यॉच वाटात नही.

पून माझ्या मनास मी आवरता तुमी चागल्ल हा.

(कोल्हाटी उड्या... पृ. ४५)

५

'रूपा मज माप करनार नहीस का ?'

(रूपा मला माफ करणार नाहीस का ?)

रूपवंती रडत रडत आपल्या मामाच्या छातीशी बिलगून आपले अश्रू गाळू लागली.

पुन्हा तिच्या पाठीवर हात फिरवत मामा म्हणाला, 'रूपा तुज्यॅं वईट व्होव्यॅं अस्यॅं मज वाटत्यॅं क्यॅं.

पून जगाचा तुमानी आजून आनभव नही. ही जग कित्ती त्याच्या यागळ्यॅं काही क्याल्यावर टोचऱ्या द्यात्यात याची तुमानी जाणीव नही.

पून तुमानी यागळ्यॅं करीन बी जग्ता यानार नही.

तुमचा सवसार व्होवा तुमी एका जीवान्यॅं जगाव्यॅं अस्यॅं मज वाटत नही क्यॅं.

पून मज तुमानी दुखी बी बघायच्यॅं नही. जावन्यॅं मज सागायच्यॅं हुत्यॅं त्यावढ्यॅं म्या तुमानी सागीतल्यॅं

शेवटी तुमानी जगायच्यॅं हॉ. आम्ही क्यॅं याखादी वाट दावनार.

ज्या वाटन्यॅं आमानी काटा टोचल्ल त्या वाटन्यॅं तुमानी टोचू नहीत यीवढीच आमची इच्छा.

पून काट्यातन्यॅं चालण्याची जर तुमची तयारी असल जगन्याच्यॅं तुमच्यामदी धाडस असल. जगाच्यॅं बॉलन्यॅं सहन करीन घ्यायची तुमच्या आगात ताक्त. समज असल तर आमी कोन तुमानी आडविनार.

तुमच्यॅं याकाम्याकावर मना बसन्यॅं, जीव असल्यावर मज तुमच्या प्रेमात आड मान्याचा कहीच कारन नही.

आजुन नीट बवसना दोघ्घ इच्यार करा. मी क्यॅं तुमानी कव्हा बी आशीरवाद द्यायास तयार हाव.

तुमी चागल्ल इच्चार करा. आन मज सागा जव्हा तुमी म्हनाल तव्हा मी तुमच्या गाठी बाधीन.'

(रूपा तुझे वाईट व्हावे असे मला वाटते का ? पण जगाचा तुम्हाला अजून अनुभव नाही. हे जग किती माणसाच्या चारित्र्यावर धर्माच्या नावाच्या टोचण्या मारतात याची तुम्हाला कल्पना नाही.

पण तुम्हाला वेगळे करूनही तुम्हाला जगता येणार नाही. तुमचा संसार व्हावा, तुम्ही एका जीवाने ससुखाने राहावे असे मला वाटत नाही का ?

पण तुम्हाला निराशही पाहायचे नाही. मला जेवढे सांगायचे होते तेवढे मी तुम्हाला सांगितले.

शेवटी तुम्हाला जीवन जगायचे आहे. आम्ही काय एखादी वाट दाखवणार.

ज्या मार्गाने आम्हाला काटे टोचले त्या मार्गाने तुम्हाला टोचू नयेत एवढीच इच्छा.

पण काट्यामधून चालण्याचे सामर्थ्य तुमच्या अंगी असेल, जगण्याचे तुमच्यामध्ये धाडस असेल, जगाचे बोलणे सहन करून घेण्याचे तुमच्या अंगी सामर्थ्य असेल तर मी कोण तुम्हाला आडवणार.

तुमचे इतके एक दुसऱ्यावर मनापासून प्रेम असल्यावर मला तुमच्या प्रेमाच्या आड येण्याचा काहीच अधिकार नाही.

अजून पुन्हा व्यवस्थित बसून विचार करा. मी काय तुम्हाला आशिर्वाद देण्यास कधीही तयार आहे. तुम्ही चांगला एकत्र बसून विचार करा आणि सांगा. जेव्हा तुम्ही म्हणाल तेव्हा मी तुमचे लग्न लावून देईन.)

(कोल्हाटी उड्या... पृ. ९८-९९)

६

कोंडिबा आजोबा आईला म्हणाला, ''बाई, अब आमदार आवनेवाला नाही, पेट पाडी लार'' (आता आमदार येणार नाही गर्भ पाडून टाक.)

(कोल्हाट्याचं पोर) पृ. ७

७

''बमीबी खीबारी हौव'' आम्हीही कोल्हाटीच.

''बमची बी हालाकी निकी नही'' आमची हालाखीची परिस्थिती.''

(लावणी सम्राज्ञी- पृ. १४)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाग्देवतेचे तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

८

"देवा ब्यास दवा-दारू करू क्या, दयाळू राजा भगवान तुम्ही ! गरिबाच्या द्यावर येईन, चार गोष्टी सांग क्या ब्यास कुन चिधरलं क्या ?"

मग पालात जमलेली माणसं विच्यारीत...

"देवा, आंगभोग है का शरीर भोग है, कौल उजवी षडली का अंगभोग, डावी पडली का आणखी काही, पुन्हांदा देवाला कौल लावला जाई. वारं घुमायचं, मोठ्यानं किंझळायचं, माणसं विच्यारीत...

'चांगभळे ! देवा तुम्ही कौण'

तसा अंगातला देव हासडून म्हणायचा...

'मी भूत हाव तुज माझी याद नै. तू चुकलास म्हणून म्या तुज चिधरलं है. सईक मनुसकळा तुज सिंगुटता दवा दारू करू नको, मी ब्यास निक्क करतात. ब्याच्यावरनं एक लिंवक पांधड उतर, भ्याव नको मज रगात पाणी भामं भर.' (मी भूत हाय, तू माझी आठवण ईसरलास तू चुकलास म्हणूनश्यान मी तुला धरून ठेवलाय... औषधपाणी करू नगोस. फकस्त 'रगत पाणी' दे ह्याला मी बरा करीन.')

(लावणी सम्राज्ञी पृ. २५)

९

'बामची पांघडी नाट्यात निफळली. बमासनी ती बत्ता लुगली' (आमची पोरं पळाली, आता ती आम्हास कायमची मुकली.)

(लावणी सम्राज्ञी पृ. २९)

१०

"लुखरायला चलुट, आज काय झिंबाळलंच नाय... बत्ता कसा होपायचं (आजकाही मिळलच नाय, आत्ता कस व्हायचं ?)

सगळी पांधळी खुपायची (सगळी पोरं उपाशीच) विक्रम बोलायचा... तशी गीता ही हळहळायची...

बेत्ता काय झिंबाळलंच नाय चलफा) आता ह्या गावातून निघायचं बघा

(लावणी सम्राज्ञी पृ. ३२)

११

संजयच्या मामांनी मला विचारलं, "किसऱ्या हमारा संजू कडे हाय ? (आमचा संजू कोठे आहे)" मी म्हणालो, 'हरीनानांनी उसळू दुकानको दुपरी को लिए गया था. अजून ओ आयाच नही. (हरीनाना संजयला दुपारी दुकानात घेऊन गेला तो अजून आला नाही.)" मी असं म्हणाल्याबरोबर संजयचा मोठा मामा ओरडला, "सत्यानास हुया ये. हाऱ्या को छोरे को मुंबई को लिय गयेये (सत्यानाश झाला, हाऱ्या पोराला घेऊन मुंबईला गेला)"

(कोल्हाट्याचं पोर पृ. ३५)

१२

आजोबा म्हणाले, "अब परसावर जिजी क्या रूट्या लीय जा अण मामा कु लगाय दे." मी परसावर जिजीच्या भाकरी घेऊन गेलो, आणि पोपट मामाला घरी पाठवून दिलं. मी जिजीला विचारलं, "हा माणूस कोण आहे ?" जिजी म्हणाली इने बिबीका चिरा उतऱ्या (याने बेबीचा चिरा उतरवला)

(कोल्हाट्याचे पोर, पृ. ३७)

१३

अन कोंडिबा आजा खवळून तिला म्हणत होता...

...मास्तरीन हुइसन कितना कमावनेवाली हाय तू ? शिकीसन का करनेवाली हाय ? वो हौसे की च्छुरी कस्तुरी दिख... शाळा शिकीसन मास्तरीन हुई तरी बी उसको नचनेको लगाया ज़ातपंचायतने... अब लोक हसते उसकु... बलते... दिखो... शाळा की मास्तरीन ढुंगन हलावके नचती पार्टीमे... आपल्या जातीतल्या पोरीनं नाचुन बापा-भावाचं पोट न्हाई भरलं तर पाप लागतंय त्या पोरीला... किडं पडत्यात... म्हनून म्हंतो मास्तरीन हुन काय मिळतंय ? ती ताऱ्याची मिनी पाहिल किती कमावती ?... चरबी निकलीसन गई तो कुत्ता भी हुंगीसन पुसने का नाय... आयी बडी मास्तरीन बननेवाली."

(मी डॉक्टर झाले. पृ. ९)

१४

आजोबा म्हणाला, "हाजार एक रूपी दिये तो निका होण्यागा, उसका यु हाय की, सुशाबाई पैसे दिती नाही. आन् बिबी मुह दिखावती नही, तेरे माँ बनी ओ गजेवर बावळी हुई. तेरे माँ के हातावर हात माराय. तुच बल आब हमने का भुके मरना. चार डवके दिये तो निका होनेगा."

(मी डॉक्टर झाले. पृ. ३८)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

१५

जिजी कोल्हाटी भाषेत कोंडिबाला म्हणत होती. ''कोंडिबा, मुकू जानेदेरे दवाखानेमे, तेरे पाया पडती रे मीने तुमरा का वाईट कऱ्या रे ? मिरी सगळी जायदाद लो. पर केशोरसंग मुकू जाने दे. तुमरा कभी निका होण्याका नाही. तडपी-तडपी मरी जोने के तुमारे घरावर खराटे फिरो. मेरा शाप तुमारकू खाय जाने गा.''

(मी डॉक्टर झालो. पृ. ३९)

१६

एखादा पाहुणा सोयरीकीसाठी आल्यास जे विचारले जाले त्यापैकी कोल्हाटी बोलीतील काही शब्द, निवडक वाक्ये-

प्यायला आला = पाहुणा आला.

त्यासनी सवसाया सांग = त्यांना बसायला सांग

तुम्ही बिंदणार कॅ ? = तुम्ही जेवणार का ?

वादाळ घिऊन कग धुवा = पाणी घेऊन हात धुवा.

बैलं कशी हात ? = मुलं कशी आहेत.

पांघडी कशी हात ? = मुलं कशी आहेत.

निक्की हॅं = चांगली आहेत.

पांदड्यांची वळकबांगडी झाली कॅ = मुलांची लग्न ठरलीत का ?

नही = नाही.

कधी बांगडी ह्यॅं ? = किती तारखेस ?

आमच्या बारात गाववाल्याकडॅ जायच्यॅं ह्यॅं.

गाववाल्याकडे गेले क्य ? हुकूम द्या.

दही पोळी दिली कॅ ?

जातीचे १२ पंच विचारतात ! तुझं घर मळीव ह्ये की कोरॅं ह्यॅं ?

जेव्हा मुलगा मागायला जातो तेव्हा पंचांसमोर चौकशी केली जाते. 'पाठीवर आलं कॅ ?' तुझ्या पाठीमागे कोण पै पाहुणे आहेत ?

जातीतला-भावकीतला असल्यास तो म्हणतो,

'मी बारातला बारा. मी कोरॅं हॅं. कुडाळकर, लाखे माझे पाहुणे आहेत.'

'हॅं बाबा हॉं ! आता बारात आलेली ९, १२, ३ असा दंड ठेव. बाहेरच्या पंचाची पहिलीच वेळ. पार्टीचे ४० ठेव. नवीन पाहुणे- जागेचे ४० ठेव अशा प्रकारे बोलणी होतात जर घरातली मुलगी पळून गेली असेल तर जात पंचायत त्यांना १२५ रु. दंड करीत असे. जर मुलगी परजातीत गेली तर 'दंड जाळला' जातो. लाक्षणिक अर्थाने तंबाखू जाळला जातो व त्या घरात मुलगी द्यायची नाही असे ठरविले जाते. मुलाने बाहेरच्या जातीची बायको करून आणली तर त्या कुटुंबाला वाळीत टाकले जाते. 'धागा दोरा तोड', संबंध तोडून टाकले जातात. 'गाडगे फोड', 'मयतीचे ३० रु. ठेव.'स 'भावकीतले नाते तोड !' अशा प्रकारची बोलणी झाल्यानंतर लग्नाचा ठराव करण्याच्या आधी देवीला पूजा (कौल) लावतात. देवीला बोलतात.

'मुलीचा बाप बारातला आहे. मुलीचा बाप देवीला म्हणतो, 'मरी आई हा पाव्हणा आला. देयाची का बसत आसळ तर प्रसाद वाटण्यास सोड. दुसरा पाहुणा म्हणतो, 'हा पाव्हणा पहिला आल्या हाय. आता त्यासी धरतूस कॅ? पटात आसेल तर डावी धरीन उजवी सोड. उजवा कौल पडला. देवीला पसंत पडलं म्हणजे ५० टक्के या विधीला 'ओळख' म्हणतात. उजवा कौल पडल्यास वधुपित्याला 'नउ पाच' देतात. काम झालं. त्यावेळी ढोल वाजवतात. नंतर सगळे उठताच प्रत्येक कुळीचा १ पुरुष व पाहुणे व १२ पंच पटांगणात येऊन गोलाकार बसतात व त्यांच्यात चर्चा होऊन लग्न कसे व कोठे करावयाचे हे ठरते. (नऊ पाच दिल्यावर साखरपुडा झाला असे समजण्यात येते.)

विवाह प्रसंगातील गाणी

नवरा मुलगा मांडवाकडे येताना म्हटल्या जाणाऱ्या गीताला ओवजा असे म्हणतात.

''आलं आलं मारूती
डब डब वाजती
मांडव दारी हो ।
थोराचा नवरा
चांदोबा न हो ग चांदोबा !''

२

आमच्या वराडणी कशा ?
माणिक मोती जशा !
त्यांच्या वराडणी कशा ?
हातात रूमाल कचण्या जशा ॥

३

आलं आलं मारूती
डब डब वाजती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

मांडव दारी हो ।
चांद नहे हा ग चांदू ।
चंद्र सूर्याचा ग बंधू ॥
साखळ्या घडवल्या ।
मध्यान रात्री ।
नवरीच्या जिवासाठी ॥
मांडव दारी हो ।
नवरा बसला गरूडावरी
उजेड पडला वराडावरी ॥

४

आये सुखे ललाही बाई
लाल्याला चौक भरा हो ।
आये सुवे सुलाही बाई
लाल्याला मळवट भरा हो ॥
हळदाई हळदाई
हळदाई होरी हो ।
सोन्याचा लपाटा
हाती घे वरवटा
हळदाई होरी हो ।
भरल्या अंगणी
चालल्या शिवरी
हळदाई होरी हो ।
आये सुवे ललाहीबाई
लाल्याला सेरा बांधा हो ।
आये सुवे ललाहीबाई
लाल्याला मंडवळ्या बांधा हो ॥

५

वरात चालली...
आईबापाची गणगोताची
दिरा भावाची
सासू सासऱ्याची ।
भवर घोडा पंडरीला
मखमली चेंडू केला
मांडव दारी हो ।
साखळ्या घडितो
मदन रात्री...
नवरी मुलीच्या जिवासाठी
मांडव दारी हो ॥

जात पंचायतीत होणारी बोलणी

पश्चिम महाराष्ट्रातील डोंबारी-कोल्हाटी समाजाची पंचकमेटी असून त्यात प्रत्येक पोटजातीचा पंच असतो. कोल्हाट्यांच्या प्रमुख चार जाती होत्या- घुंत्रे (घुनरे) डावाळे (जावळे/जावळीकर), लाखे व कुडाळकर. या चार जातीच्या पुढे साडेबारा जाती झाल्या. या साडेबारा जातीची पंचायत असून बेळगाव ते कोल्हापूर या विभागासाठी घुंबरे हे पाटील व इचलकरंजी ते तळेगाव (पुणे जिल्हा) या विभागात डावाळे हे पाटील आहेत.

समजा, कुडाळकर जातीच्या एका तरुणाने डोंबारी व्यतिरिक्त) मुलीशी विवाह केला अथवा संबंध ठेवले तर त्या मुलाच्या भावकीच्या सर्व कुटुंबाशी होणारे सामाजिक व्यवहार बंद केले जातात.त्यामुळे मुलाचा वडील किंवा भाऊ किंवा भावकीतील पुढारी समाजाला हाक देऊन गोळा करतात व झाल्या प्रकाराबद्दल न्याय प्रकारचे असू शकते.

कुडाळकर - बारा तुम्ही मायबाप, माझ्या पोरानॅं आशकी मायेनॅं गझेटीन केली हॅं. गुन्हा आमच्याकडनॅं घडल्या ह्या. तवा मज समाजाचॅं रिवाजॅंपरमानॅं निर्माळ करा.

लाअखे - बाबा रे, तुझ्यॅं घरात गुन्हॅं घडल्यॉं हॅं. तवा मुलगा जातीबहीर सोडीन देतोस, (दिस खातोस) की कझेटीन घरात घ्येतोस ?

म्होरकर - कडाळकर, तुमी जॅंत वार्ले आहात. तुमच्या घरी च्यार पाव्हनॅं येनार जानार. पूर्वी पसनॅं भिकाऱ्यात अश्या घटनॅं घडल्या हात. तवा हेचा इचार तुमीच करायच्यॅं.

औंधकर - बारा तिथून एक. बारामधी अश्यॅं घटना नवीन नहीत. चार मुख्य जातीच्या साडे आठ जाती ह्यॅं अशॅंच कझेटे आन् कझेटिनी पसनॅं झाल्या हातात. व त्यास तुम्ही चार जातवाल्यानी दया करीन जवळ केल्या हातात. सगॅं सोयरिका दिल्या हातात तवा कुडाळकर, बारा तुम्ही ठरवाल त्या प्रमान्यॅं न्याय घेतील.

पाटकर - कुडाळकर, गुन्हॅं मुलाकडनॅं घडला हॅं. सोडीन दियाचा. दिस खायाचं म्हटल्यॅं तरी उद्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

त्याच्यॅं पोटपानी पिकल्यॅं मजी तुम्शास माया फुटनार आन पोराबाळाकडॅं येनॅं जाण्यॅं, खान्यापिन्या व्हानार. पून बाराचा तगादा तुमच्यॅं मागॅं लागनार. तवा याचा इचार तुम्ही करा. तसंच मायबाप बारा उद्या यांची पोरॅं बाळॅं झाली की ती पून समाज्यात यअनार जानार तवा ह्येचा बी इचार करा.

कुडाळकर - पोरानॅं तोंडास काळॅं लावल्यॅं. नही बाप आज्यात घडली ती आमच्यॅं नसिबास आली अश्या पोरास मेला म्हणान सोडून दिलिलिच बरा.

लाखे - कुडाळकर जॅंत वाल्यॅं तुम्ही आमच्या बरोबरीने उठनार बसनार. पून घडली नव्हा ती घडली. तव्हा रीत करीन घरात कझेटीन घ्याल तर पुढॅं त्याच्यॅं इस्तारास जशास तसा व्येवहार होयल. आन अश्यॉं व्हात गेल्यात. सोडीन देइन बी कधी ना कधी दुखी सुखीस येन्यॅं जान्यॅं व्होनार. पून बाराचा तगादा मागं लागनार त्यापेक्षा घरॅंत घ्या.

कुडाळकर - गुन्हा घडला ह्यॅं तवा बारा मायबाप. एवढी माझ्यॅं घरात घाला.

लाखे - बाबा रे, गुन्हा केलास त्याचा इस्तार आज ना उद्या आमच्यॅं आंगाशी लागनार. मजीच आमच्यॅं पोटच्यॅं पोरासनी सोयरिका द्याव्या घ्यावा लागनार तवा बारा जातीचॅं १२ री. मस्तिचं - ३ रु, कझेटीनीचॅं ४० रु. अन ताकीत म्हणान ५ रु. दंड ठिव.

कुडाळकर - ही १२, ३, ४०, आन ५ रुपये आखाड्यात ठेवता.

सर्व पंचायत डावाळे पाटील यांना न्याय देण्याबाबत विनंती करातात.

डावाळे - बारा तुम्ही आम्ही. तुम्ही पंच ठरवाल त्यात आमची बी सही पून. ही दंड (लाखे किंवा म्होरकर) तुम्ही उचला. त्या कझेटनीस धर्माचा जातीतला बाप कुनी तरी व्हा. अन् ती त्यांच्या घरात लगीन लावीन घाला.

(टीप - प्रत्येक वक्ता बोलल्यानंतर आपले म्हणणे पूर्ण केल्यावर पंचायतीच्या मध्यभागी खडा (दगड) टाकतो व बोलणे पूर्ण झाल्याचे संकेत देतो. याउल्ट समजा कुडाळकरांनी मुलगा सोडून द्यायचा म्हटलं तर मुलगा हा त्याच्या आई-बाप, भाऊबंद व समाज यांना मेला म्हणून दंड पुकारतात व त्याचे मृत्यूनंतर जशी दशक्रिया विधी करतात त्याप्रमाणे करतात व तेव्हापासून त्या मुलाला त्याच्या अपत्याला, पत्नीला समाजात बंदी असते.)

(जयवंत डावाळे-पाटील)

कोल्हाटी बोली भाषेतील काही शब्द

अस्यॅं - असे/असा
आथ्था - आता
आमानी - आम्हाला
इंचार - विचार
इचारायच्यॅं - विचारायचे
इचाऱ्यान्यॅं - विचाराने
एसज - असला
कग - हात
कजा - मोठा माणूस
कजी - मनुष्य
कजीन - परस्त्री
कझेटा - परजातीतला, आपले रीतीरिवाज माहीत नसलेला अडाणी
कझेटीन - परजातीतील मुलगा/परजातीतील स्त्री
करिनुच - करूनच
कऱ्यैव्यॅं - करावे
कला - केव्हा
कवाच - केव्हाच
कस्यॅं - कसे
कही - काही
कैर - कर
कामुन - का म्हणून खाव - रुपये
खिबारी - कोल्हाटी
खिफाळ - निघून जा
खिल्ती - सुरी
खिल्ती क्यो - कापणे/मारणे
खुपायची - उपाशी
खेंबळ - मासे
खेडगे - दात
खोमाड - तोंड
गवणा - पाया
गुडित - गोडीत
गुळी - डुकराचे मांस/सागोती/मटण
चख - हात
चलफा - चला/चल
चल्ुट - चळ
चिल्ख - दूध
चिधरणे - धरणे
चिंबाळणे - पळून जाणे
चिल्ख्या - तेल
चेलावणे - गाणे
चोल - बोल
जठा - मोठा
जॅं - जा
झिंबाळणे - मिळणे
झुकला - कुत्रा
झोलाटी - कोल्हाटी
ठाल - थांब
ढोकाळणे - झोपणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येथे वाचाचे तोषावे महाराष्ट्र साहित्य परिषद

डफळ - साडी
डवा - जास्त
डॅम्बर - शिश्न
डोमी - डोंबाऱ्याचा खेळ करणे.
तकला - आला
तख - आण
तरास - त्रास
तिरव - पैसे
तीस - तिला
तुज - तुला
तुझ्झॅ - तुझे
तुमानी - तुम्हाला
त्यास - त्याला
थल - थांब/गप्प राहा
थरला - थोरला
थो - तो
दिमण - जेवण
देन - दोन
द्येवा - देवा
दैला - माणूस
धरल - दागिने
नराज - नाराज
नहाड - घर/झोपडी
नही - नाही
नाक्टर - डॉक्टर
नाटी - परपुरूष
निक्का/निक्की - चांगला/ चांगली
निबाळ - वाईट
नेटणे - नाक
नेतार - नाराज
नोरड्यास - कोरड्यास
न्हाकर - भाकर
परवेती - कोंबडी
पांघड्या - डुकराचे पिलू
पांधडा - मुलगा
पांधडी - मुलगी
पांधळी - पोरे
पेण - गाढव, डुकरांसह तांडा
पेर - पोर
पैर - पाय
बमिबी - आम्हीही
बऱ्यॅ - बरे
बसऱ्यॅ - पासून
बामची - आमची
बारू - नवरा
बारून - बायको
बांडगा - तरुण मुलगा
बिंद्या - देव/देवता
बुवाकन - दाग दागिने/ संपत्ती
ब्याच्यावरनं - ह्याच्यावरून
भावभावडी - भाऊबंद
भिकारी - कोल्हाटी
भिलारी - भिकारी/ कोल्हाटी
भिडे - गावो गावी गाणे बजावणे करून पोट भरणे
भुकॅळ/भुकाळा - डुक्कर
भ्याटला - भेटला
भोरट्या - कोल्हाटी
मज - मला
माझ्यॅ स गॅ - माझ्याबरोबर
माप - माफ
म्हनात - म्हणत
मोटारीन - कमवती मुलगी
याक - एक
याकदा - एकदा
यास - ह्यास/ह्याला/ याला/ह्याला
यासनी - यांना
यॅाक्ट्यॅ - एकटे
यॅाड्यॅ वाकड्यॅ - वेडं वाकडं
यावढ्यॅ - एवढे
रडा नको - रडू नको.
रहिनुच - राहुनच
रहिल्यॅ - राहिला
रावडी - मोटारगाडी/ पतंग
वइट - वाईट
वादाळ - पाणी
वैता - भात
व्हॉत्यॅ - होते
व्यास - वास
शिबारी - कोल्हाटी/ जातवाला
सईक - ऐक
समजात - समजत
समद - संबंध
सात - साथ
सम्य - सोबत
सम्यात - भाषा
सगळ्यॅ - सगळे
सारका - सारखा
साग्गू - सांगू
सुडीन - सोडून
सिंगुटला - सांगतो
हात - आहेत
ह्यॅ - आहे
हुत्यॅ - होते
ऱ्यातभर - रात्रभर
ऱ्यातूनदिस - रात्रंदिवस
लावीन - लाऊन
लुगीवणे - ठार मारणे
लिंबक - कोवळे

कोल्हाटी बोलीची वैशिष्ट्ये -

१) काही क्रियापदांची भूतकाळाची रूपे बदलली जातात. उदा. गेलुटला (गेला), आलुटला (आला), करूटला (केले), बोलुटला (बोलला).
२) काही शब्दांमध्ये महाप्राण मिसळला जातो उदा. थो (तो), आथ्था (आत्ता)
३) काही शब्दांमध्ये असलेल्या अनुस्वारांचा उच्चार केला जात नाही उदा. साग्गू (सांगू), समद (संबंध), चिम (चिंब), चागलं (चांगलं)
४) अंत्य 'ऊ' चा 'आ' होतो.
सांगा नको (सांगू नको), रडा नको (रडू नको), हसा नको (हसू नको).
५) भूतकाळाचे धातुसाधित होताना 'उ' ऐवजी 'इ' येतो. उदा. जाईन येतो (जाऊन येतो), लावीज (लाऊन) रहीनच (राहुनच), सोडीन (सोडून).
६) आद्य 'ए'चा उच्चार 'या' असा होतो. यावढा (एवढा), भ्याटला (भेटला).
७) अंत्यस्वर 'ए' चा उच्चार 'अॅ' किंवा 'या' असा केला जातो.
जाव्यॅ (जावे), कराव्यॅ (करावे), हुत्यॅ (होते),

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

माझ्यॅ (माझे), बरॅ (बरे), असॅ (असे), याच्यॅ (याचे), आपल्यॅ (आपले).

८) 'वे' ऐवजी या/ये/यॅ वापरला जातो. येड्या वाकड्या (वेडे वाकडे), याडा (वेडा)

९) महाप्राणाने सुरू होणाऱ्या शब्दात 'हे' ऐवजी ह्यॅ येते. उदा. ह्यॅ -आहे, ह्यॅ - हा.

१०) शब्दामध्ये कोठेही 'ए' आल्यास त्याचा अॅ होतो. उदा. कस्यॅ तरी (कसेतरी)

११) 'ण' बद्दल 'न' वापरला जातो. उदा. पानी (पाणी), गाने (गाणे), हसनॅ (हसणे), रडनॅ (रडणे), म्हन्ता (म्हणता), कोन (कोण).

१२) काही ठिकाणी महाप्राण वगळला जातो. उदा. तुमी (तुम्ही), आमी (आम्ही) मात्र या शब्दांनी द्वितिया/चतुर्थी विभक्ती होताना महाप्राणावर जोर देऊन उच्चारून जातो. उदा. आम्हाऽऽस, तुम्हाऽऽस इ.

१३) आद्य 'आ' चा उच्चार 'अ' असा केला जातो. क्यॅ (काय) (का).

१४) 'वि'चा 'इ' होतो - जसे इचार (विचार).

१५) 'वि'चा 'यी' होतो - जसे यीसरला (विसरला).

१६) उपान्त्य 'अ' चा 'आ' होतो. समजात (समजत), करमात (करमत).

१७) 'ओ' ऐवजी 'ऑ' येते. उदा. बॉल्लाच (बोललाच), बॉल (बोल), वॉल्यॅ (ओले).

१८) आद्य 'आ' ऐवजी 'अ' येते. उदा. कहीच (काहीच), नहीच (नाहीच).

१९) आद्य 'अ' चा 'आ' होतो. आस्ये (असे), आहो (अहो).

२०) 'ये' ऐवजी 'या' म्हटले जाते. उदा. यायना (येईन्य), यानार (येणार), यात (येत).

२१) 'ए' ऐवजी 'यी' येतो. उदा. यीवढीच (एवढीच), यावढा (एवढा).

२२) दर्शक सर्वनाम 'हे' ऐवजी 'ही' येते. ही (हे)

२३) दर्शक सर्वनाम 'ते' ऐवजी 'ती' वापरले जाते.

२४) दर्शक सर्वनाम 'जे' ऐवजी 'जी' येते. उदा. जी तुमच्यॅ मनात ह्यॅ ती (जे तुमच्या मनात आहे ते).

२५) 'वा' ऐवजी 'वॅ' येतो उदा. वॅस (वास).

कोल्हाटी बोली मध्यवर्ती ग्रामीण मराठी सारखी वाटत असली दरी उच्चारातील वेगळेपणांमुळे ती वेगळी वाटते. विविध प्रदेशात ही जमात पूर्वी भटकत होती. त्यामुळे त्या त्या प्रदेशातील शब्द आणि उच्चार यांचा प्रभाव पडल्यामुळे ही बोली भाषा वेगळी वाटते. जातीपुरती मर्यादित असे आज तिचे स्वरूप आहे. पुणे-जेजुरी-वाई-शिरवळ-सातारा-कराड कोल्हापूर या भागातील कोल्हाटी समान बोली भाषा बोलतात असे दिसून येते. या बोलीभाषेत वेगळ्या म्हणी, वाक्प्रचार, गाणी, कवने आढळून आली नाहीत. मात्र कोल्हाटी कलावंतानी लोकसंगीत-लोककला जिवंत ठेवली आहे. लावणीची परंपरा नुसतीच टिकविली आहे असे नसून लावणींची परंपरा समृद्ध केली आहे. कोल्हाट्यांची नवी पिढी उच्च शिक्षण घेत आहे. त्यांच्याकडून भविष्यात ललित साहित्यात महत्त्वपूर्ण कामगिरी घडून येईल अशी अपेक्षा करणायास हरकत नाही.

संदर्भ :

१) 'कृष्णाई १९७१' नियतकालिक मानव्य व वाणिज्य महाविद्यालय वाई, जि. सातारा. १९८० नंतरचे (किसनवीर महाविद्यालय, वाई).

२) 'कोल्हाट्याचं पोर' - डॉ. किशोर शांताबाई काळे.

३) 'मी डॉक्टर झालो' - डॉ. किशोर शांताबाई काळे.

४) 'भिकारी भटक्या जमाती' - नारायण भोसले - 'मिळून साऱ्याजणी' - दिवाळी २००७.

५) 'कोल्हाटी उड्या नियतीच्या छड्या' - राजेश चेंडीराम कुदळे, पुणे.

६) गांव-गाडा (१९१५) त्रिं. ना. आत्रे.

७) लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) - प्रभाकर ओव्हाळ (२००७).

८) मुलाखती - श्री. जयवंत जावळीकर, सौ. मीरा व श्री. कुंडलिक कुडाळकर, अनिल लाखे, सदाशिव भोसले, यमुनाबाई वाईकर.

❖❖❖

प्रा. विजयकुमार फरांदे

'निशांत-कुटीर', प्लॉट नं. २१६/फ्लॅट नं. ३,
सेक्टर २८, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५.
(भ्रमण - ९३७०८००२०६)


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

येथे वाचाये तोषावे
महाराष्ट्र साहित्य परिषद

निवडक नवे...

परिषदेकडे आलेल्या ग्रंथांपैकी
विशेष उल्लेखनीय ग्रंथांचा
परिचय करून देणारे सदर



'मरूद्यान' आणि 'उद्यानविश्व' :

ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ म्हणून लौकिक असलेल्या बॅरिस्टर भास्करराव आव्हाड यांचे हे दोन कवितासंग्रह, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळ्याच पैलूचे दर्शन घडवितात. वकिली आणि कायद्याच्या जगात वावरत असतानाही अंतर्हृदयात टिकून राहिलेली संवेदनशीलता, तिला मिळणारं काव्यात्म रूप आणि विविध भावभावनांचं कवितेच्या रूपानं उमटणारं प्रतिबिंब. हे सारंच विस्मयकारक आणि लोभस असं आहे. 'मरुद्यान' या पहिल्या कवितासंग्रहाच्या प्रारंभीच कवीनं म्हटलं आहे, ''वाळवंटातला प्रवासी अचानक जेव्हा मरुद्यानात येतो तेव्हा आनंदतो, विसावतो आणि वाळवंटातील जीवनस्त्रोताकडे कौतुकानं पाहतो. तशीच माझी अवस्था आहे.'' म्हणूनच कवितासंग्रहाचं 'मरुद्यान' हे नाव अत्यंत समर्पक वाटतं. संग्रहातल्या कविता वाचकांना खरोखरीच सुखद अनुभूती देणाऱ्या आहेत. जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत आहे, त्या साऱ्याची कवीच्या मनाला विलक्षण ओढ आहे. प्रकाशाची निरंतर आस आहे. याच्या स्पर्शखुणा संग्रहात वारंवार दिसतात. किंबहुना ती त्यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्येच बनून राहतात. यातूनच त्यांच्या कवितेमध्ये उमटतो तो मानवी कर्तृत्वाविषयीचा उदंड विश्वास. या विश्वासापाठोपाठ डोकावणारा आशावाद. हे त्यांच्या कवितेचं आणखी एक वैशिष्ट्य. या साऱ्याच्या बरोबरीनं कवितेत प्रकटणारी अहंकारी वृत्तीबाबतची घृणा, विषम-समाजव्यवस्थेबाबतची चीड, ढासळती मूल्यव्यवस्था, नीतिभ्रष्टता यातून येणारे वैफल्य आणि संताप कवीमधलं सदैव जागं असणारं माणूसपण अधोरेखित करतात. 'दिल्लीचा सूर्य', 'विश्व', 'मी', 'आम्ही भारतीय', 'टोपी', 'रस्ते' आदी कवितांचा विशेषत्वाने उल्लेख करायला हवा. ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांची प्रस्तावना हे या संग्रहाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणायला हवं.

'उद्यानविश्व' हा दुसरा कवितासंग्रह. विषयवैविध्य, तंत्रवैविध्य यामुळे वेगळा वाटतो. ईश्वरी चैतन्याचा शोध घ्यायला प्रवृत्त करणारी अंतर्मुख वृत्ती 'दिंडी', 'निरांजन' सारख्या कवितांमधून मनात ठसते. भक्ती आणि आत्मशोध यांच्याखेरीज माणसाचे, कर्तृत्व, त्याची विचारसरणी, जीवनातील विसंगती यासंबंधीचं चिंतन अनेक कवितात आहे. ग्रामजीवनाची ओढ, मनाला भुरळ घालणारी पावसाची रूपे यांचेही उत्कट दर्शन त्यांच्या कवितेत आहे. काही बालकविता तर काही प्रखर आत्मचिंतन करणाऱ्या कविताही आहेत. अशा वेगळ्या भाववृत्तींच्या, वेगळ्या धाटणीच्या कवितांमुळे हा कवितासंग्रह अधिक मोकळाढाकळा, बहारदार झाल्याचे जाणवते. 'मरूद्यान' मधली व्यक्तिगत पातळीवर रेंगाळणारी कविता 'उद्यानविश्व' मध्ये अधिक सुसंवादी अन् त्यामुळेच वेधक झाल्याचे जाणवते. आणि कविवर्य वसंत बापट यांच्या प्रस्तावनेप्रमाणेच हेही उद्यानविश्वाचे वैशिष्ट्य बनून जाते.


('मरूद्यान' व 'उद्यानविश्व' - भास्कर ए. आव्हाड-सिग्नेट पब्लिकेशन्स, पृष्ठे-अनुक्रमे ७८ व ७४, मूल्य - अनुक्रमे रु. ७०/- व रु. ७०/-)

अंतर्याम :

इंदूरचे कवी श्रीकृष्ण बेडेकर यांच्या कविता या संग्रहात आहेत. बेडेकर यांना चित्र, संगीत आणि काव्य या तिन्ही कलांमध्ये गती आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत चित्राचा रेखीवपणा, संगीतातलं नादमाधुर्य आणि काव्यातली तरलता


अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद



यांचा उत्तम मिलाफ आहे. संग्रहात छंदोबद्ध, मुक्तछंदात्मक तसंच चारोळी, हायकू या काव्यप्रकारात मोडणाऱ्या अनेक कविता आहेत. पण साऱ्याच परिणामकारक आहेत. समाजातील वास्तव आणि त्याची धग कोमट करणारे प्रेम या दोन्हीविषयी कवीनं सारख्याच कौशल्याने, एकतानतेने लिहिले आहे. 'गाणे', 'आवार', 'दीक्षा', 'घरे', 'पाहुणा' आदी कविता सहजपणे मनाला भिडतात. (अंतर्याम - श्रीकृष्ण बेडेकर - श्रीवत्स प्रकाशन, नागपूर, पृष्ठे - ४६, मूल्य - ७५ रुपये.)

बंधुतापर्व :



जातिधर्मातून निर्माण होणारा भेद मिटवून माणसाला माणूस म्हणून जोडणारे मूल्य म्हणजे बंधुता. या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेल्या विविध मान्यवरांच्या भाषणांचे संकलन यामध्ये आहे. प्रा.रा. ग. जाधव, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. यू. म. पठाण, फादर फ्रॉन्सिस दिब्रिटो आदी दहा मान्यवरांच्या भाषणांचा यात समावेश आहे. त्याचप्रमाणे निवडक मानवतावादी कविताही आहेत. (बंधुतापर्व - संपादक-महेंद्र भारती, बंधुता प्रकाशन, पृष्ठे - १८९, मूल्य - रु. १५०/-.)

❖❖❖

स्वाती महाळंक

दि विश्वेश्वर सहकारी बँक लि.,पुणे

मुख्य कार्यालय: 471/472,मार्केट यार्ड,गुलटेकडी,पुणे 411 037 फोन : 2426 1755 / 2426 2745

पारंपारिक जिव्हाळा, विश्वासार्हता,
ग्राहकहित यांच्या जोडीला आता आहे -



आधुनिक सेवांची साथ

एनी ब्रँच बँकिंग, एस एम एस बँकिंग,



NEFT / RTGS व एटीएम सह सर्व आधुनिक सेवा उपलब्ध

दृष्टिक्षेपात प्रगती ...

- रू.1000 कोटी व्यवसाय पूर्ण
- मार्च 2010 चे उद्दिष्ट रू.1100 कोटी
- निव्वळ एनपीए 0%
- 14 पैकी 13 शाखा एनपीए विरहीत
- सेवक उत्पादकता रू. 3.76 कोटी
- सभासदांना 15% लाभांश

एक कार्यक्षम बँक, प्रगतीपथावर अग्रेसर

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

कार्यवृत्त (१ मार्च २००९ ते ३१ मे २००९)

डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह

५ व ६ जून २००९ :

'पूना बुक फेअर' व महाराष्ट्र साहित्य परिषद यांचे संयुक्त विद्यमाने दरवर्षी साहित्यिक कार्यक्रम आयोजित केले जातात. पुण्यातील गणेश कला क्रीडा केंद्र. नेहरू स्टेडियम, येथे यंदाचे, पूना बुक फेअर तर्फेचे ग्रंथ प्रदर्शन व विक्रीचे आयोजन ३ जून ते ७ जून २००९ असे आयोजित करण्यात आले होते. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे व ज्येष्ठ पत्रकार श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन तीन तारखेला झाले. त्यानंतर ५ जून २००९ रोजी परिषदेतर्फे 'प्रकाशन व्यवसाय : कालचा आणि आजचा' या विषयावर चर्चासत्र आयोजित झाले. या चर्चासत्रात कोषाध्यक्ष श्री. ह. ल. निपुणगे, कार्यवाह डॉ. सौ. स्नेहसुधा कुलकर्णी व प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांनी भाग घेतला. दि. ६ जून २००९ रोजी 'गझलेचा नजराणा' हा मराठी गझलांचा परामर्शअभिनव पद्धतीने घेणारा कार्यक्रम गझलकार कवी दीपक करंदीकर व कार्यवाह स्वाती महाळंक यांनी सादर केला. संहितालेखन दीपक करंदीकर यांचे होते. जयदीप ढमढेरे व मंजुश्री ओक यांनी सुरेश भट व दीपक करंदीकरांच्या काही गझलांचा संगीतमय आविष्कार सादर केला.

६ जून २००९ :

युवामुक्तमंच व आरती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आनंद कर्वे यांचे 'ऊर्जा व शेतीविषयक तंत्र' या विषयावर व्याख्यान झाले. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यावेळी उपस्थित होते. महेंद्र मुंजाळ यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले.

९ जून २००९ :

न्या. म. गो. रानडे स्मृतिव्याख्यान:

न्या. म. गो. रानडे- राजकीय व सामाजिकद्रष्टे या विषयावर न्या. नरेंद्र चपळगावकर यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक डॉ. वि. भा. देशपांडे, सूत्र संचालन प्रा. मिलिंद जोशी, आभार प्रदर्शन प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. श्रीधर सहस्रबुद्धे यांनी व्याख्यानमालेविषयी माहिती दिली.

१० जून २००९ : प. पू. परमहंस स्वामी स्वरुपानंद (पावस) स्मृति व्याख्यान :

'संत मुक्ताबाईंचे चरित्र' या विषयावर डॉ. केतकी मोडक यांचे व्याख्यान आनंद मंगल कार्यालयाच्या सभागृहात झाले. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. महेंद्र मुंजाळ यांनी सूत्रसंचालन केले व कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी आभार मानले.

२० जून २००९ : अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ वर्धापनदिन

महनीय वक्ते, ख्यातनाम समीक्षक, साहित्याचे गाढे अभ्यासक व मराठीचे नामवंत प्राध्यापक गंगाधर पाटील यांचे 'साहित्यिक अर्थनिर्णय मीमांसा, या विषयावर भाषण झाले. २० व २१ जून असे दोन दिवस साजरा झालेला महामंडळाचा वर्धापनदिन महामंडळाची एक घटक संस्था या नात्याने यंदा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांनी आयोजित केला होता. प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष कौतुकराव ठालेपाटील, उपाध्यक्ष विद्या देवधर, कोषाध्यक्ष अरुण प्रभुणे, कार्यवाह कुंडलिक अतकरे व मसापचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. दीपप्रज्वलन होऊन हा समारंभ सुरू झाला. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. पुष्पगुच्छ देऊन व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. अध्यक्ष कौतुकराव ठालेपाटील यांनी आपले विचार प्रकट केले. शाल, श्रीफळ, स्मृतीचिह्न देऊन गंगाधर पाटलांचा सत्कार करण्यात आला. पां. के. दातार यांच्या हस्ते आनंद यादव यांचा, अनंत जोशी यांच्या हस्ते श्याम मनोहर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यातं आला. गंगाधर पाटील यांचा परिचय दिलीप धोंडगे यांनी करून दिला. नंतर 'साहित्यिक अर्थनिर्णय मीमांसा' या विषयावर गंगाधर पाटील यांचे व्याख्यान झाले. रत्नाकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

२१ जून २००९ : दिवसभराचे चर्चासत्र : साहित्य प्रकार : संकल्पना व समीक्षा चर्चासत्र :

प्रा. चंद्रशेखर जहागिरदार यांचे 'साहित्य प्रकार : संकल्पना व समीक्षा' या विषयावर आधारित भाषण झाले. प्रभारी प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी पुष्पगुच्छ व स्मृतीचिह्न देऊन त्यांचे स्वागत केले. दीपक करंदीकर यांनी प्रा. जहागिरदार यांचा परिचय करून दिला. यानंतर चर्चासत्राच्या पहिल्या पुष्पाचे अध्यक्षस्थान डॉ. चंद्रकांत पाटील यांनी भूषविले व 'कविता' : संकल्पना व समीक्षा या विषयावर डॉ. दिलीप धोंडगे यांनी निबंध वाचन केले. दोघांचाही परिचय दीपक करंदीकर यांनी करून दिला. प्रा. मिलिंद जोशी यांनी पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्हे देऊन दोघांचा सत्कार केला. उपस्थितांपैकी हनुमंत गवळी, डॉ. शंतनू गोंधडे, डॉ. कल्याणी दिवेकर, प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रश्न विचारून या चर्चेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दुसऱ्या पुष्पाचे अध्यक्षपद डॉ. वि. भा. देशपांडे यांनी भूषविले. नाटक : संकल्पना व समीक्षा या विषयावर डॉ. अजय जोशी यांनी निबंध वाचन केले. परिषदेचे कोषाध्यक्ष श्री. ह. ल. निपुणगे यांच्या हस्ते दोघांचा पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी दोघांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले. सुहासिनी किर्तीकर यांनी उत्स्फूर्तपणे 'नाटक' या विषयावरील आपले विचार प्रकट केले. 'कथा' : संकल्पना व समीक्षा या विषयावरचे तिसरे पुष्प गुंफले होते डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भुषवून; तर प्रस्तुत विषयावरचे निबंध वाचन भारती निरगुडकर यांनी केले. ह्या दोघांचा परिचय व सूत्रसंचालन नंदा सुर्वे यांनी केले. त्यानंतर कादंबरी : संकल्पना व समीक्षा या विषयावरचे चर्चासत्र झाले. अध्यक्षस्थानी डॉ. आनंद यादव होते. याविषयावरचे आपले विचार किशोर सानप यांनी मांडले. दोघांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. कल्याणी दिवेकर यांनी केले. या दिवसभराच्या चर्चासत्राचा समारोप गंगाधर पाटील यांनी केला.

यानंतर सायंकाळी 'उत्सुक्तेने मी झोपलो' या कादंबरीसाठी यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेले ज्येष्ठ कादंबरीकार, कथाकार व नाटककार श्याम मनोहर यांचा जाहीर सत्कार महामंडळातर्फे आयोजित करण्यात आला होता. प्रा. रा. ग. जाधव अध्यक्षस्थानी होते. त्यांच्याच शुभहस्ते श्याम मनोहर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्याम मनोहर यांच्या साहित्यावर दिल्ली दूरदर्शनचे सहाय्यक संचालक गोपाळ चिपलकट्टी यांनी आपले विचार प्रकट केले. या सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन स्वाती महाळंक यांनी केले. व्यासपीठावर महामंडळाचे अध्यक्ष प्रा. कौतुकराव ठालेपाटील व डॉ. वि. भा. देशपांडे होते. आभार प्रदर्शन कुंडलिक अतकरे यांनी केले.

२७, २८ व २९ जून २००९ : नाट्य विभाग : नाट्यलेखन शिबीर :

तीन दिवसांचे नाट्यलेखन शिबीर परिषदेच्या नाट्यविभागातर्फे आयोजिण्यात आले. या शिबिरात सुमारे ७० इच्छुकांनी सहभाग घेतला होता. पहिल्या दिवशी डॉ. श्रीनिवास भणगे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. श्रीनिवास भणगे, योगेश सोमण, डॉ. वि. भा. देशपांडे, राज काझी, रामनाथ चव्हाण, यांनी नाट्यलेखनविषयक मार्गदर्शन केले.

१, २, ३, ४ जुलै २००९ :

सुप्रसिद्ध साहित्यिक आणि प्रकाशक ग. ल. ठोकळ जन्मशताब्दीनिमित्त १ जुलै ते ४ जुलै अशी चार दिवस विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. ठोकळांचे सुपुत्र श्री. कृष्णकुमार ठोकळ आणि ठोकळ कुटुंबिय आणि परिषदेच्या संयुक्त विद्यमाने ही विशेष व्याख्यानमाला आयोजिली होती. १ जुलै रोजी 'ग. ल. ठोकळ यांची कविता' या विषयावर डॉ. आनंद यादव यांचे व्याख्यान झाले. प्रारंभी स्वाती महाळंक व दीपक करंदीकर यांनी ठोकळ यांच्या 'मीठभाकर' या गाजलेल्या कवितासंग्रहातील निवडक कवितांचे वाचन उपस्थितांसमोर केले. दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. ठोकळ यांचे जामात प्रा. राम शिंदे यांनी आभार मानले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. प्रारंभी ठोकळ यांच्या प्रतिमेस कृष्णकुमार ठोकळ यांच्या हस्ते पुष्पहार व फुले अर्पण करण्यात आली. दि. २ जुलै रोजी 'कादंबरीकार ठोकळ' या विषयावर म. सा. पत्रिकेचे संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी व्याख्यान दिले. स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. उपस्थिती पद्माकर कुलकर्णी, डॉ. किसन पाटील. दि. ३ जुलै रोजी 'ग. ल. ठोकळ यांची कथा' या विषयावर प्रसिद्ध साहित्यिक कथाकार ह. मो. मराठे यांचे व्याख्यान झाले. स्वाती महाळंक यांनी ग. ल. ठोकळ यांच्या 'म्हातारपणची शिकार' या कथेचे प्रभावी वाचन केले. दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. व्याख्यानमालेचे संयोजक श्री. ह. ल. निपुणगे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. आभार प्रदर्शन प्रा. राम शिंदे यांनी केले. व्याख्यानमालेचे चौथे पुष्प परिषदेचे कोषाध्यक्ष व प्रकाशक श्री. ह. ल. निपुणगे यांनी 'विसाव्या शतकातील प्रकाशन व्यवसायात ग. ल. ठोकळ यांचे स्थान' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. मधू नेने यांनी प्रास्ताविक केले. स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले. चार दिवसांच्या या व्याख्यानमालेस श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. तसेच व्याख्यानमालेचा गोषवारा पुणे आकाशवाणी केंद्राद्वारे ७ जुलै रोजी रात्री ८.१५ वाजता सांगण्यात आला. तसेच यानिमित्ताने ग. ल. ठोकळ यांच्या पुस्तकांची विक्रीसुद्धा लक्षणीय झाली.

१४ जुलै २००९ : प्रा. बाबुराव आणि शांताबाई शिरोळे पुरस्कार वितरण समारंभ :

दरवर्षी आड बाबुराव शिरोळे यांच्या नावाने बालसाहित्यासाठी व शांताबाई शिरोळे यांच्या नावाने उभरत्या लेखकाला हे दोन पुरस्कार दिले जातात. यावर्षीचे हे पुरस्कार अनुक्रमे बालसाहित्यकार महावीर जोंधळे यांना तर उभरत्या लेखिका मंगला आठल्येकर यांना शांताबाई शिरोळे यांच्या नावाचा पुरस्कार ज्येष्ठ लेखक व परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांचे हस्ते समारंभपूर्वक देण्यात आला. सूत्रसंचालन स्वाती महाळंक यांनी केले. प्रास्ताविक कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. पुरस्कार विजेत्या दोघांचा परिचय डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी करून दिला. व्यासपीठावर डॉ. धैर्यशील शिरोळे उपस्थित होते. श्री. महावीर जोंधळे व मंगला आठल्येकर यांनी मनोगत व्यक्त केले. दीपक करंदीकर यांनी आभार मानले. प्रा. द. मा. मिरासदार यांनी अध्यक्षीय समारोप केला.

१५ जुलै २००९ : नवं कोरं :

श्याम भुर्के लिखित 'क्रेडीटकार्डचे मायाजाल' या पुस्तकावर स्वागतपर चर्चा आयोजित केली होती. प्रास्ताविक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. प्रमुख प्रभारी कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्र संचालन केले. बँक ऑफ बडोदाचे उपक्षेत्रीय व्यवस्थापक श्री. अशोक जोशी व बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी क्षेत्रीय व्यवस्थापक आप्पाजी आपटे व प्रकाशक श्री. रामचंद्र शेटे यांचे डॉ. देशपांडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रथम प्रकाशक रामचंद्र शेटे यांनी पुस्तकासंबंधीची भूमिका सांगितली. यानंतर श्याम भुर्के यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. बँक ऑफ बडोदाचे उपक्षेत्रीय व्यवस्थापक श्री. अशोक जोशी यांनी चर्चेतील आपले मुद्दे विशद केले. त्यानंतर बँक ऑफ महाराष्ट्राचे माजी क्षेत्रीय व्यवस्थापक आप्पाजी अनंत आपटे यांनी चर्चेत भाग घेतला. यानंतर उपस्थित श्रोत्यांपैकी काहींनी प्रश्न विचारून या चर्चेत सहभाग घेतला. दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

२२ जुलै २००९ : नाटकविभाग :

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांच्या बालनाटिकेच्या मराठी व इंग्रजीतील अभिवाचनाचा प्रयोग सादर झाला. 'तें'च्या 'बाबा हरवले आहेत' या बालनाटिकेचा डॉ. अजय जोशी यांनी इंग्रजी अनुवाद केला आहे. त्याचे अभिवाचन अंबरीष देशपांडे, सक्षम कुलकर्णी, अनुजा वर्तक, देवेंद्र भिडे, रेणुका कुलकर्णी, दर्शन नाईक, शौमिता, शालिनी नांबायल, आदिती रॉय, कार्तिकी मायरा, एरिना नरोना या कालकलाकारांनी केले. डॉ. जोशी व कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यावेळी उपस्थित होते.

३० जुलै २००९ : संत सावता माळी पुण्यतिथी :

भावार्थ देखणे यांचे वारकरी पद्धतीचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांना अवधूत गांधी यांनी अभंग गायनाची साथ केली. नाम संकीर्तनाने कीर्तनास प्रारंभ झाला. संत सावता माळी यांचा 'मागणे ते आम्हानाही हो कुणाशी' हा अभंग पूर्वरंगात निरुपणासाठी घेण्यात आला होता. परिषदेचे प्रभारी प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले व कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी स्वागत केले. कीर्तनास श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला होता.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

२९ जुलै २००९ : नाटकविभाग :

परिषद व पीडीए, पुणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने परिषदेच्या आजीव सभासदांसाठी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'अचलायतन' या दोन अंकी भाषांतराचा नाट्यप्रयोग भरत नाट्य मंदिरात सायंकाळी ७.३० वाजता खास आयोजित करण्यात आला होता.

३ ऑगस्ट २००९ : श्रद्धांजली सभा : पं. भास्कर चंदावरकर, निळूभाऊ फुले व अनिरूद्ध कुलकर्णी यांची श्रद्धांजली सभा :

कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे अध्यक्षस्थानी होते. प्रा. मिलिंद जोशी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पुणे शाखेचे शशिकांत कुलकर्णी व डॉ. सतीश देसाई हे व्यासपीठावर उपस्थित होते. श्रीराम रानडे, सुनील महाजन, ह. ल. निपुणगे, जयश्री बोकील, देवयानी अभ्यंकर, दीपक करंदीकर, फैय्याझ हुसेन, सविता भावे, रत्नाकर कुलकर्णी, रागिणी कुंडलीक, रत्नाकर गोखले, स्वाती महाळंक, प्रा. मिलिंद जोशी, शशिकांत कुलकर्णी यांची भाषणे झाली. डॉ. सतीश देसाई यांनी शोक प्रस्तावाचे वाचन केल्यावर उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून या तिघांना श्रद्धांजली अर्पण केली.

७ जुलै २००९ : कॉफी क्लब :

ज्येष्ठ प्रसार माध्यमतज्ज्ञ डॉ. विश्वास मेहेंदळे यांना कॉफी क्लबमध्ये गप्पांसाठी निमंत्रित केले होते. प्रसार माध्यमातले खुमासदार अनुभव डॉ. मेहेंदळे यांनी गप्पांच्या ओघात खुलवून सांगितले. प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यावेळेस उपस्थित होते. त्याचप्रमाणे कॉफी क्लबचे सदस्यत्व स्विकारणाऱ्यांची संख्या वाढली असल्याचे जाणवले.

नोंद : दीपक करंदीकर, पुणे
स्वीकृत सदस्य, म.सा.प. पुण

❖❖❖

सोलापूर शाखा

एप्रिल ते जून २००९

६ मे २००९ :

अंतर्मुख कवी, थोर लेखक, संत साहित्याचा अभ्यासक, तळमळीचा शिक्षक, अमोघ वाणीचा शैलीसंपन्न वक्ता आणि रामायण महाभारतावर चिंतनशील भाष्य करणारा अभ्यासक असे विलोभनीय व आदरणीय व्यक्तिमत्त्व श्री. राम शेवाळकर यांचे होते. त्यांच्या निधनाने एक प्रखर ज्ञानतेज मावळले' अशा शब्दात त्यांना म.सा.प. शाखा सोलापूर व हिराचंद नेमचंद वाचनालय यांच्यातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. निशिकांत ठकार, डॉ. सुहास पुजारी, अध्यक्ष दत्ता हलसगीकर, पूर्व कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, डॉ. प्रा. गो. भा. पवार, बाबूराव मैंदर्गीकर यांनी आपले विचार यावेळी मांडले.

२९ मे २००९ :

'म.सा.प. तुमच्या दारी' या उपक्रमानुसार बुधवार पेठ येथील किशोर चंडक यांच्या सहाव्या मजल्यावरील प्रशंसा गच्चीवर 'जीवन आणि विनोद' या विषयावर आपले मनोगत सांगून नारायण कुलकर्णी यांनी आपल्या खुसखुशीत विनोदी कवितांनी विनोद जीवनाला कशी टवटवी आणतो हे प्रत्ययास आणून दिले. प्रा. प्रेमचंद मेने यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. सुहास पुजारी, किशोर चंडक यांनी 'मसाप तुमच्या दारी' हा उपक्रम शहरातील दूरवरच्या भागातील रसिकांची साहित्य अभिरूची संपन्न करतो हे सांगितले.

२३ जून २००९ :

'मेघदूत' या काव्याने जगभराच्या रसज्ञ वाचकांच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या कवी कालिदासाचा आणि मेघदूतातील विरह-व्याकुळता, ललितरम्यता, भावसौंदर्याचा आणि मेघदूताच्या अलोकानरारीपर्यतच्या प्रवासाचा परिचय वक्ते डॉ. इरेश स्वामी यांनी करून दिला आणि या महाकवीचे थोरपण सांगितले. डॉ. सुहास पुजारी यांनी रसपूर्ण प्रास्ताविक केले तर दत्ता हलसगीकर यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रेमचंद मेने यांनी सूत्रसंचालन केले होते. मोठ्या संस्थेने उपस्थित असलेल्या श्रोत्यांचे बाबूराव मैंदगीकर यांनी आभार मानले.

२ जुलै २००९ :

म.सा.प. शाखा सोलापूर आणि डायमंड पब्लिकेशन्स, पुणे यांच्या विद्यमाने 'पुस्तके आणि आपण' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम सारस्वत क्लब सभागृहात झाला. आज आपण जे चांगले जीवन गजत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आहोत त्यामागे ग्रंथकर्त्यांचे, संतांचे, सत्पुरुषाचे, ऋषिमुनींनी लिहिलेल्या अक्षरवाङ्मयाचे आणि कल्याणकारी विचारधन आहे. पुस्तके ही समाजमनांचे आरसे आहेत. आमची जीवनपद्धती आणि दूरचित्रवाणी यामुळे वाचन कमी झाले आहे. पण वाचनाचा अर्थ ज्यांना समजतो अशा लोकांना पुस्तकं ही मित्रासारखी, वडीलधाऱ्या माणसांसारखी वाटतात. असा एकूण सूर या चर्चेत होता. सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, दत्ता हलसगीकर, डॉ. सुहास पुजारी, नितीन वैद्य, अवधूत भूमाणे आदि वाचक-रसिकांनी या चर्चेत भाग घेतला.

प्रा. प्रेमचंद मेने, कार्यवाह

❖❖❖

श्रीरामपूर शाखा

१ जून ते ३१ ऑगस्ट २००९ :

शाखाध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम झाले. कै. राम शेवाळकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शाखेचे प्रमुख ब, नामदेवराव देसाई, डॉ. कमलजितकौर बतरा, सौ. भाग्यश्री बडे, विजय नगरकर या वक्त्यांनी श्रद्धांजलीपर भाषणे केली.

अध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांनी विविध पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव कार्याध्यक्ष प्रा. डॉ. ध. ई. शेळके यांनी मांडला. सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांनी या अभिनंदन- ठरावात भाग घेतला. भाग्यश्री बडे यांनी आभार मानले. प्रमुख कार्यवाह डॉ. बाबुराव उपाध्ये उपस्थित होते.

❖❖❖

उल्हासनगर शाखा

शाखेची कार्यकारिणी खालीलप्रमाणेः- अध्यक्ष- शिवराम परब, उपाध्यक्ष- डॉ. जगदीश पवार, उपाध्यक्ष- शोभा टिकम, कार्यवाह- मधुकर भामरे, कोषाध्यक्ष- डॉ. मधुकर वाणी. अंतर्गत हिशोब तपासणीस- आण्णासाहेब पवार, कार्यकारिणी सदस्य- दिवाकर सोनवणे, प्रल्हाद कोल्हे, डॉ. संजय पवार, राजेंद्र पाटील, जगन्नाथ सावंत, सुधाकर सोनार, सुनंदा बोबडे, वासंती भंगाळे, विजया मोरे.

❖❖❖

पिंपरी-चिंचवड शाखा

२१ जून २००९ :

चिंचवड येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये कथा लेखन, शस्य/गझल काव्य प्रकाशन, रुबाया व हस्ताक्षर या विसयांवरील एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. डॉ. रजनीसेठ, रमेश वाकनीस, प्रदीप गांधालीकर, सुहास घुमरे, रघुनाथ पाटील, नितीन यादव, विवेक कुलकर्णी, अशोक कोठारी, राजेंद्र कोरे, विश्वास निकम, सुनंदा कुरकुरे, विनिता ऐनापुरे, प्रा. पांढरे यांनी उपस्थित सहभागींना विविथ साहित्य प्रकारांसंबंधी मार्गदर्शन केले. उद्घाटन पुणे मर्चंट को-ऑप बँकेचे अध्यक्ष विजय शेवाळे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक गुलाब बिरदवडे यांनी केले. प्रा. अलका शिराड यांनी सूत्रसंचालन व नेहा चौधरी, संगीता व्होरा, गीता सुतार यांनी संयोजन केले. अध्यक्ष संजय खानोलकर उपस्थित होते.

❖❖❖

भिवंडी शाखा

१ ऑगस्ट २००९ :

टिळक पुण्यतिथीनिमित्त 'मानवी हक्क व अधिकार' एक सामाजिक दृष्टिकोन या विषयावर उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. अनंत माने यांचे व्याख्यान झाले. म.सा.प., टिळक वाचन मंदिर व भगिनी मंडळ, भिवंडी या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.

❖❖❖

तळेगाव दाभाडे शाखा

१८ मे २००९ :

'ऐसी अक्षरे रसिके मेळवीन' हे ब्रीदवाक्य स्वीकारून या दिवशी शाखेची स्थापना करण्यात आली.

२५ जुलै २००९ :

'गो. नी. दांडेकर-वडील आणि मुलगी' याविषयावर डॉ. वीणा देव यांचे आप्पांच्या आठवणी सांगणारे व्याख्यान झाले. मसाप पुणेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे व वक्त्या सौ. वीणा देव यांच्या हस्ते प्रारंभी सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन झाले. नंतर सौ. वीणा देव यांनी थोर साहित्यिक गो. नी. दांडेकर यांच्या रेखाचित्राचे अनावरण केले. त्यावेळी चित्रकार श्री. फडके उपस्थित होते. श्रुती देशपांडे यांनी 'भवानी-स्तवन गाइले. कार्यवाह सतीश साठे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शाखाध्यक्ष

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

सुरेश अत्रे यांच्या हस्ते. डॉ. देशपांडे, ह. ल. निपुणगे, नंदा सुर्वे, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, स्वाती महाळंक, दीपक करंदीकर, महेंद्र मुंजाळ या मसाप पुणेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच तळेगावातील साहित्य क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. त्यात राम अत्रे, अशीष पाठक, राजस कुलकर्णी, डॉ. परांजपे हे होते. प्रास्ताविक कार्याध्यक्ष पांडुरंग भानुशाली यांनी केले. डॉ. वि. भा. देशपांडे व मावळ शाखेचे अध्यक्ष सुरेश अत्रे यांनी आपले विचार प्रकट केले. उपाध्यक्ष प्रा. शिरीष अबधाने यांनी वक्त्या सौ. देव यांचा परिचय करून दिला. सौ. मीनाक्षी भरड व सौ. पवार यांनी डॉ. वीणा देव यांचा सत्कार केला.

❖❖❖

वाळवा शाखा (इस्लामपूर)

३ मार्च २००९ : स्व. डॉ. विवेक दिगंबर देशपांडे यांच्या बाराव्या स्मृतीदिनानिमित्त डॉ. सुयोग्य दांडेकर यांचे 'स्वभाव रंजन' या विषयावर व्याख्यान झाले. प्रास्ताविक प्रा. दशरथ पाटील यांनी केले. स्वागत प्रा. शामराव पाटील यांनी केले. परिचय सौ. वृषाली आफळे यांनी करून दिला. धोंडीराम सलगर यांनी सूत्रसंचालन केले व भगवानराव मोरे यांनी आभार मानले.

१४ जुलै २००९ : प्रा. शरद भोसले स्मृतीप्रित्यर्थ प्रा. श्रीकांत सबनीस यांचे 'आध्यात्म व विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी शामरावआण्णा पाटील होते. स्वागत प्रास्ताविक दशरथ पाटील व पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपा देशपांडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन सौ. वृषाली आळे तर आभार प्रदर्शन वैजयंती पेटकर यांनी केले.

२२ ऑगस्ट २००९ : डॉ. शिवाजीराव घोरपडे स्मृतीदिन : 'अस्थिविकार' या विषयावर डॉ. जे. जी. कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. स्वागत, प्रास्ताविक सूत्रसंचालन सौ. वृषाली आफळे, दशरथ पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी शामरावआण्णा पाटील होते.

१५ मार्च २००९ : लोकनेते राजारामबापू पाटील स्मृतीप्रित्यर्थ १७वे साहित्य संमेलन कृष्णा खोत यांच्या अध्यक्षतेखाली झाले. आमदार भगवानराव साळुंखे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. वैजयंती पेठकर लिखित काही पुस्तके प्रकाशित झाली. द्वितीय सत्रात '१९८० नंतरची कविता हा परिसंवाद झाला. डॉ. रवींद्र ठाकूर यांचे बीजभाषण झाले. सुनिती लोंगडे, डॉ. दीपक स्वामी यांनी सहभाग घेतला. तृतीय सत्रात कविसंमेलन झाले.

कार्यवाह

❖❖❖

देणगीदार – १ जून २००८ ते ३१ ऑगस्ट २००९

क्र.	दिनांक	नाव	रक्कम	
१)	९-६-२००९	न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर	१,०००/-	न्या.म.गो. रानडे स्मृतिदिनासाठी देणगी (पुढील वर्षासाठी)
२)	११-६-२००९	अक्षरधारा	९,०००/-	योगक्षेमार्थ देणगी तळघरात इन्व्हर्टर बसविण्यासाठी
३)	१५-६-२००९	श्री. संजीव शां. सोनावणे	१,०००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
४)	१५-६-२००९	डॉ. बी. एम्. पानगे	१,०००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
५)	१६-६-२००९	श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, पुणे	१,००,०००/-	वाङ्मय इतिहास खंड २ च्या पुनर्मुद्रणासाठी देणगी
६)	१९-६-२००९	श्री. कृष्णकुमार ग. ठोकळ	१५,०००/-	ग. ल. ठोकळ जन्मशताब्दी व्याख्यानमालेसाठी
७)	२६-६-२००९	श्री. सुहासकुमार बोवडे	१००/-	ग्रंथालयासाठी देणगी
८)	१-७-२००९	दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टीज कंपनी प्रा. लि.	१०,०००/-	ग्रंथालयासाठी देणगी
९)	१३-७-२००९	श्री. रविप्रकाश कुलकर्णी	५०/-	ग्रंथालयासाठी देणगी
१०)	१६-७-२००९	प्रा. प्र. ना. परांजपे	१,०२०/-	वाङ्मयइतिहास खंड ७ साठी देणगी
११)	१७-७-२००९	श्री. सुहासकुमार बोबडे	४००/-	ग्रंथालयासाठी देणगी
१२)	२१-७-२००९	डॉ. एस्. के. पाटील	२,५००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
१३)	२३-७-२००९	सारस्वत को-ऑप बँक लि.	३,०००/-	योगक्षेमार्थ देणगी
१४)	७-८-२००९	दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्ट कं. प्रा. लि.	१,०००/-	का. र. मित्र व्याख्यानमालेसाठी देणगी
१५)	८-८-२००९	श्री. प्रकाश मिसाळ	१,००१/-	ग्रंथालयासाठी देणगी
१६)	११-८-२००९	सौ. संजीवनी श्री. पुरंदरे	१०००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
१७)	२१-८-२००९	श्री. रामचंद्र केशव जोशी (कै. कुसुम जोशी यांच्या स्मरणार्थ)	१,१००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
१८)	२७-८-२००९	श्रीअक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, पुणे	१,००,०००/-	वाङ्मय इतिहास खंड २च्या पुनर्मुद्रणासाठी देणगी

❖❖❖

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

ठोकळ साहित्य

काव्य :	**कथा :**
• मीठ भाकर ४०.००	• कडूसाखर ५०.००
कादंबरी :	• सुगंध ६०.००
• गावगुंड ४०.००	• पहिले चुंबन २५.००
• ठिणगी २५.००	• ठोकळगोष्टी भाग १ ते ५ . . ४००.००
• टेंभा ६०.००	• क्षितिजाच्या पलीकडे ५०.००
नाटक :	• मत्स्यकन्या ५०.००
• कशासाठी ? पोटासाठी ! . . २०.००	• निवडक ठोकळकथा . . . २००.००

निवडक ठोकळ प्रकाशने

	पुस्तकाचे नावं	लेखकाचे नाव	मूल्य
•	इंदूमतीराणी साहेब	कृ. गो. सूर्यवंशी	३०.००
•	सोनकी	र. वा. दिघे	२५.००
•	हिरवा सण	र. वा. दिघे	१५.००
•	वसंतराव आणि चाळीस चोर	र. वा. दिघे	२५.००
•	निसर्गकन्या रानजाई	र. वा. दिघे	२५.००
•	रुपाली	आनंदीबाई शिर्के	४०.००
•	जगन्नाथ पंडित	गो. नी. दांडेकर	२५.००
•	पाखरांची शाळा	ग. ह. पाटील	१५.००
•	ग्रामीण नृत्यगीते	संपादक-कृष्णदेव मुळगुंद	४०.००
•	पांडुरंग कांती	र. वा. दिघे	३०.००
•	बारा ज्योतिर्लिंगे	शं. रा. देवळे	२०.००
•	भगवान येशू ख्रिस्त	डी. पी. ॲन्ड्र्यूज	२०.००
•	चंमत-ग	अरुण शिंदे	२०.००
•	मिरच्यांच्या खळ्यावर	बाजीराव पाटील	२५.००
•	खाडिकलकरांच्या नाट्यकथा	डी.पी. ॲन्ड्र्यूज	२०.००

एकमेव विक्रेते

श्री लेखन वाचन भांडार

१०२७, शुक्रवार पेठ, 'कोंदण', टिळक रोड, पुणे ४११ ००२.
फोन : २४४७४४७९

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : July to September 2009
Registered with the register of Newspaper for India under No. 6398/57



प्रेषक
बुक-पोस्ट

प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे-४११०३०.
दूरभाष : ०२०-२४४७५९६३.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद